सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९**

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम

**(दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ पर्यंत सुधारित)**

# Bombay Act No. XXIX of 1950
# The Maharashtra Public Trusts Act

*(As modified up to 15th September 2015)*

२०१५

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१.

[ किंमत ००.०० रुपये ]

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम

## अनुक्रमणिका

उद्देशिका.

कलमे.

### प्रकरण एक

#### प्रारंभिक


१. संक्षिप्त नाव, व्याप्ती, अंमलात येणे आणि लागू होणे.

२. व्याख्या.

२-अ. (वगळण्यात आले.)


### प्रकरण दोन

#### आस्थापना


३. धर्मादाय आयुक्त.

३ अ. धर्मादाय सह-आयुक्त

४. धर्मादाय आयुक्त व धर्मादाय सह-आयुक्त म्हणून नेमणूक होण्यासाठी अर्हता.

५. धर्मादाय उप-आयुक्त आणि सहायक धर्मदाय आयुक्त.

६. दुय्यम अधिकारी.

६-अ. धर्मादाय आयुक्त व इतर अधिकारी हे, राज्य शासनाचे कर्मचारी असणे.

६-ब. धर्मादाय आयुक्त, वगैरे यांचे वेतन, निवृत्तिवेतन, वगैरेसंबंधीचा खर्च सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधीतून शासनाला देणे.

७. (वगळण्यात आले.)

८. प्रत्यायोजन.


### प्रकरण तीन

#### धर्मादायाची प्रयोजने व विवक्षित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची विधिग्राह्यता


९. धर्मादायाची प्रयोजने.

१०. अनिश्चिततेच्या कारणावरून सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

११. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही, धर्मादाय किंवा धार्मिक स्वरूपाच्या नसलेल्या प्रयोजनासाठी निरर्थक आहे या मुद्द्यावर ती निरर्थक न ठरणे.

१२. बंधनाच्या अभावी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

१३. विशिष्ट हेतू सफल न झाल्यास किंवा संस्था वगैरे अस्तित्वात असण्याचे बंद झाल्यास सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

## प्रकरण चार

### सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी


१४. प्रदेश व उप-प्रदेश.

१५. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी कार्यालये.

१५-अ. जिल्ह्यांमध्ये कार्यालये स्थापन करण्याचा अधिकार.

१६. धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हा, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयाचा प्रभारी अधिकारी असणे.

१७. पुस्तके, निर्देश सूची व नोंदवह्या.

१८. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी.

१९. नोंदणीसाठी चौकशी.

२०. धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचे निष्कर्ष.

२१. नोंदवहीतील नोंदी.

२२. बदल.

२२-अ. धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने आणखी चौकशी करणे.

२२-ब. ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची अगोदरच नोंदणी करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नावे विश्वस्त मालमत्तेची नोंदणी करणे, इत्यादी.

२२-क. विवक्षित अधिकारी व प्राधिकारी यांच्याकडे अगोदरच नोंदणी केलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेच्या तपशीलाची नोंदणी करणे.

२३. विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता अनेक प्रदेशांत किंवा उपप्रदेशांत असेल तेव्हा काम चालविण्याची पद्धती.

२४. चौकशी स्थगित करणे.

२५. एकापेक्षा अधिक धर्मादाय उप-आयुक्तांनी किंवा सहायक धर्मादाय आयुक्तांनी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी चौकशी न करणे.

२६. विवक्षित प्रकरणी नोंदवहीत करावयाच्या लागणा-या किंवा सुधारावयाच्या नोंदी.

२७. [निरसित करण्यात आले.]

२८. अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमान्वये पूर्वी नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था.

२८-अ. मालमत्तेच्या संबंधातील नोंदीची प्रत दुय्यम निबंधकाकडे पाठविणे.

२८-ब. [वगळण्यात आले.]

२९. मृत्युपत्रान्वये निर्माण झालेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था.

३०. नोंदवहीत दाखल केलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधीच्या तपशीलाची नोटीस.

३१. दाव्याची सुनावणी किंवा निर्णय करण्यास प्रतिबंध.

## प्रकरण पाच

### अर्थसंकल्प, लेखे आणि लेखापरीक्षा


३१-अ. विवक्षित विश्वस्तव्यवस्थांच्या विश्वस्तांनी धर्मादाय आयुक्ताकडे अर्थसंकल्प सादर करणे.

३२. लेखे ठेवणे.

३३. लेख्यांचे संतुलन व त्यांची लेखापरीक्षा.

३४. ताळेबंद तयार करणे आणि नियमबाह्यता, वगैरेसंबंधी कळविणे हे लेखापरीक्षकाचे कर्तव्य असणे.


## प्रकरण पाच-अ

### विश्वस्तांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांच्यावरील निर्बंध


३५. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा पैसा गुंतविणे.

३६. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा स्थावर मालमत्तेचे अन्यसंक्रामण.

३६-अ. विश्वस्तांचे अधिकार व कर्तव्ये व त्यांच्यावरील निर्बंध.

३६-ब. जंगम व स्थावर मालमत्तेची नोंदवही.


## प्रकरण सहा

### नियंत्रण


३७. निरीक्षण व देखरेख करण्याचा अधिकार.

३८. लेखापरीक्षकाच्या अहवालासंबंधी किंवा तक्रारीसंबंधी स्पष्टीकरण.

३९. धर्मादाय आयुक्तास प्रतिवृत्त पाठविणे.

४०. कलम ३९ अन्वये मिळालेल्या अहवालावर आदेश काढण्याचा किंवा प्रकरण परत पाठविणे, इत्यादीबाबतचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

४१. अधिकारासंबंधी आदेश.

४१-अ. विश्वस्तव्यवस्थेच्या योग्य प्रशासनासाठी निदेश देण्याबाबतच्या धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

४१-अअ. मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपचार करावयाच्या गरीब रुग्णाकरिता विवक्षित खाटा राखून ठेवण्यासाठी रूग्णालये, इ. ना. निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्ताचा व राज्य शासनाचा अधिकार.

४१-ब. चौकशी चालू करण्याचा अधिकार.

४१-क. धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनाकरिता पैसे, इत्यादि गोळा करणा-या (सार्वजनिक विश्वस्त-व्यवस्थेव्यतिरिक्त इतर) व्यक्तींनी असे पैसे, इत्यादि गोळा करण्याबद्दल धर्मादाय आयुक्तांस ताबडतोब कळविणे.

४१-ड. विश्वस्तांना निलंबित करणे, काढुन टाकणे आणि बडतर्फ करणे.

४१-ई. धर्मादाय संपत्तीच्या रक्षणार्थ कार्य करण्याचा अधिकार.


## प्रकरण सात

### धर्मादाय आयुक्तांची इतर कामे व अधिकार


४२. धर्मादाय आयुक्त हा एक निगम असणे.

४३. सन १८९० चा अधिनियम ६ या अन्वये महाराष्ट्र धर्मादाय आयुक्त हा, धर्मादाय दान-निधींचा कोषाध्यक्ष असणे.

४४. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.)

४५. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.)
४६. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.)
४७. विश्वस्तांची नियुक्ती करणे, त्यास निलंबित करणे, काढून टाकणे किंवा मुक्त करणे आणि मालमत्ता नवीन विश्वस्ताकडे निहित करणे याविषयीचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.
४७-अअ. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.)
४७-अ. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.)
४७-ब. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.)
४८. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.)
४९. (सन १९७१ चा महा. २०, कलम ३३ अन्वये वगळण्यात आले.)
५०. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा विश्वस्त किंवा इतर यांच्याकडून किंवा त्यांच्या विरुद्ध किंवा त्यांच्याशी संबंधित दावे.
५०-अ. योजना तयार करण्याचा, तिचे एकत्रीकरण करण्याचा किंवा तीत फेरबदल करण्याचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.
५१. दावा दाखल करण्याकरिता धर्मादाय आयुक्ताची संमती.
५२. दिवाणी प्रक्रिया संहितेची कलमे ९२ व ९३ ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत लागू नसणे.
५२-अ. किंमती मोबदल्यासाठी अभिहस्तांकितीवर केलेला दावा मुदतबाह्य न होणे.
५३. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या फायद्यासाठी मृत्युपत्रान्वये दिलेली देणगी.
५४. धर्मादा.
५५. सदृश हेतू.
५६. अर्जाची सुनावणी करण्याचा न्यायालयाचा अधिकार.
५६-अ. निदेश मिळविण्यासाठी अर्ज करण्याचे विश्वस्तांचे अधिकार.
५६-ब. सार्वजनिक धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनावर परिणाम करणारा प्रश्न अंतर्भूत असलेली कार्यवाही.


## प्रकरण सात-अ

**राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा ज्यांची व्यवस्था राज्य शासनाकडे निहित आहे अशा धार्मिक व धर्मादाय स्वरूपाच्या संस्था आणि दाननिधी यांच्या संबंधीतील विशेष तरतूद**


५६-क. प्रकरण ७-क च्या तरतुदी विवक्षित दाननिधींना लागू असणे.
५६-ड. विवक्षित दाननिधी निहित करणे किंवा त्यांचे व्यवस्थापन हस्तांतरित करणे.
५६-ई. व्यवस्थापन समित्या.
५६-फ. समितीच्या सदस्यांचा पदावधी.
५६-ग. सदस्यात्वासंबंधीची अनर्हता.
५६-ह. नवीन सदस्यांची नेमणूक करण्याचा शासनाचा अधिकार.
५६-आय. समितीची सभापती व कोषाध्यक्ष.
५६–ज. समितीची सभा व कार्यपद्धती.
५६-के. उप-समित्या नेमण्याचा समितीचा अधिकार.
५६-ल. समितीचे चिटणीस व इतर अधिकारी.
५६-म. चिटणीस व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.
५६-न. समितीची सामान्य कर्तव्ये.

५६-ओ. पद रिकामे झाल्याच्या किंवा दोष असल्याच्या कारणामुळे समितीचे कृत्य कायद्याअन्वये अग्राह्य न ठरणे.
५६-प. निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.
५६-क्यू. समितीची कर्तव्ये बजाविण्यास भाग पाडण्याचा व त्यासंबंधीचा खर्च समिती वगैरेच्या निधीतून देण्याविषयी निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्तांचा अधिकार.
५६-क्यूक्यू. व्यवस्थापन निधी.
५६-र. समिती निष्प्रभावित करण्याचा अधिकार.
५६-रर. समितीच्या सदस्यांना काढण्याचा व प्रशासकाची तात्पुरती नेमणूक करण्याचा अधिकार.
५६-स. विनियम करण्याचा अधिकार.
५६-ट. या अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी दाननिधीस लागू नसणे.

## प्रकरण आठ

### सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधी

५७. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधी.
५८. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांनी अंशदान देणे.
५९. अंशदानाच्या वसुलीदाखल शास्ती.
६०. सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीचे उपयोजन.
६१. अनुसूचीतील अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले निधी हे, या प्रकरणान्वये घटित करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीत जमा करण्याविषयी राज्य शासनाने निदेश देणे.

## प्रकरण नऊ [निर्धारक]

(वगळण्यात आले)

## प्रकरण दहा

### अपराध व शास्ती

६६. शास्ती.
६६-अ. कलम ३६ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.
६६-ब. कलम ४१ अअ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्त.
६७. इतर अपराध.
६७-अ. अपराध आपसात मिटवणे.

## प्रकरण अकरा

### धर्मादाय आयुक्ताची कामे, कार्यप्रद्धती, अधिकारिता व अपीले

६८. धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांची कर्तव्ये, कामे व अधिकार.
६९. धर्मादाय आयुक्ताची कर्तव्ये, कामे व अधिकार.
७०. धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचा निष्कर्षाविरुद्ध अपिले.
७०-अ. धर्मादाय आयुक्ताने धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडील अभिलेख व कामकाज मागविणे व ते तपासणे.
७१. विभागीय आयुक्ताकडे अपील करणे.

७२. कलमे ४०, ४१, ४१ क आणि ४३ (२) (अ) आणि क ५०-(अ), ७० किंवा ७०-अ वगैरे खालील धर्मादाय आयुक्तांच्या निर्णयाविरुद्ध अर्ज.
७३. चौकशी करणा-या अधिका-यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.
७३-अ. कार्यवाहीतील पक्षकार म्हणून व्यक्तींना दाखल करुन घेण्याचा चौकशी अधिका-याचा अधिकार.
७४. चौकशा, न्यायिक चौकशी असणे.
७४-अ. फौजदारी प्रक्रिया संहितेची कलमे ४८० व ४८२ यांच्या अर्थानुसार धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह-आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त, इ. दिवाणी न्यायालय असल्याचे मानणे.
७५. मुदत.
७६. न्यायालयापुढील या अधिनियमाखालील कार्यवाहीस दिवाणी प्रक्रिया संहिता लागू असणे.
७७. कलमे १८, २०, ४१, ७९- अ, ७९-क, किंवा ७९ कक अन्वये किंवा नियमान्वये येणे असलेल्या रकमांची वसुली.

## प्रकरण बारा

### **किरकोळ**

७८. धर्मादाय आयुक्त आणि इतर अधिकारी हे लोकसेवक असणे.
७९. एखादी मालमत्ता ही, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता म्हणून ठरविण्यासंबंधीचा निर्णय.
७९-अअ. पुनर्रचित अभिलेखांस अंतिम स्वरुप देण्याचा अधिकार.
७९-अ . धर्मादाय आयुक्त, इत्यादींनी न्यायालयीन कार्यवाहीवर केलेला खर्च आणि व्यय याची वसूली.
७९-ब. उच्च न्यायालय धरुन व इतर न्यायालयांपुढील कार्यवाहीचा खर्च.
७९-क. धर्मादाय आयुक्त, वगैरेपुढील कार्यवाहीचा खर्च.
७९-कक. धर्मादाय आयुक्त, वगैर यापुढे क्षुल्लक कारणावरुन किंवा त्रास देण्याच्या हेतूने दाखल केलेल्या कार्यवाहीबद्दल भरपाईदाखल खर्च देणे.
७९-ड. अनुसूची व अन्वये विहित केल्याप्रमाणे न्यायालय शुल्क देणे.
८०. अधिकारितेस आडकाठी.
८१. दावे व कार्यवाही यापासून क्षतिपूर्ती.
८२. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी.
८३. खटला दाखल करण्याकरिता धर्मादाय आयुक्तांची पूर्वमंजुरी आवश्यक असणे.
८४. नियम.
८५. निरसन.
८६. राज्याच्या इतर क्षेत्रात सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याचा प्रारंभ झाल्यामुळे इतर अधिनियमाचे निरसन व व्यावृत्ती.
८७. ज्यास सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २९ लागू असेल अशा विवक्षित वक्फांना किंवा सन १९५६ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ३७ द्वारे शासित अशा गुरूद्वारांना हा अधिनियम लागू नसणे.
८८. अडचणी दूर करण्याबाबत तरतूद.
अनुसूची–अ
अनुसूची–अअ
अनुसूची–ब

# सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९[१]

[महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, ]

[या अधिनियमाला दि. ३१ मे, १९५० रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली व ती अनुमती महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग ४ मध्ये दि. १४ ऑगस्ट १९५० रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये सुधारणा, अनुकूलन व फेरबदल करण्यात आले आहे.

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९.
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३.
मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (महामंडळाबाबत) आदेश, १९५९ †
सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ द्वारे विशोधीत.
मुंबई धर्मदाय आयुक्त (प्रादेशिक पुनर्रचना) आदेश, १९६० द्वारे अनुकूलीत व आपरिवर्तीत.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० द्वारे अनुकूलीत व आपरिवर्तीत.
कोषाध्यक्ष, धर्मदाय दाननिधी, मुंबई (पुनर्रचना) आदेश, १९६२* द्वारे अनुकूलीत व आपरिवर्तीत.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ द्वारे विशोधीत.
सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ द्वारे विशोधीत.
सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ द्वारे विशोधीत.
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२* * द्वारे विशोधीत.
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० द्वारे विशोधीत.
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० (१ नोव्हेंबर १९७३) § द्वारे विशोधीत.
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ (१ फेब्रुवारी १९७७) * * द्वारे विशोधीत.

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी मुंबई सरकारचे राजपत्र १९४९, भाग ५ पृष्ठे २३५-२३९ इंग्रजी पहा.

† हा आदेश, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एफ ८/१५/५७-एसआर-(आर)-५, दिनांक २१ मार्च १९५९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. तो दिनांक १ एप्रिल १९५९ रोजी अंमलात आला.

* हा आदेश, भारत सरकारच्या गृह मंत्रालयाचा क्रमांक ८/१२/६१-एसआर-(आर), दिनांक ३० जानेवारी १९६२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. तो दिनांक १ मार्च १९६२ रोजी अंमलात आला.

** सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याचे कलम ११ पुढीलप्रमाणे आहे.—

व्यावृत्ती " ११, या अधिनियमान्वये सुधारण्यात आलेल्या मुख्य अधिनियम व तरतुदी (त्याचे कलम ३ खेरीज करून) मुख्य अधिनियमाच्या कलम ६४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या ज्या कोणत्याही कार्यवाहीत यथास्थिती, धर्मादाय आयुक्त किंवा उप-आयुक्त, किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी आपल्याला सहाय्य व मदत करण्यासाठी म्हणून, आज्ञापत्राद्वारे किंवा उप-आयुक्त, किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी आपल्याला सहाय्य व मदत करण्यासाठी म्हणून, आज्ञापत्राद्वारे न्याय सहायकास बोलविले असेल आणि याअधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी चौकशी प्रारंभ केला असेल आणि उक्त दिनांक अशी जी कोणतीही कार्यवाही, अनिर्णीत असेल, त्या कार्यवाहीस लागू होणार नाहीत किंवा उक्त तरतुदीचा अशा कार्यवाहीवर परिणाम होणार नाही आणि हा अधिनियम संमत करण्यात आला नसल्याप्रमाणे अशी प्रत्येक कार्यवाही चालू ठेवण्यात येईल व ती निकालात काढण्यात येईल; परंतु वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल त्याशिवाय मुख्य अधिनियम आणि या अधिनियमान्वये त्यात केलेली सुधारणा (त्याचे कलम ३ खेरीज करून) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांक किंवा त्यानंतर दाखल करण्यात आले असेल अशा, उक्त कलम ६४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व कार्यवाहीस लागू होतील.

§ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ † ‡ (१-४-१९९७) * द्वारे विशोधीत.
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० ‡ द्वारे विशोधीत.
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ § (१ ऑगस्ट, १९८१) * द्वारे विशोधीत.
सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ @ (१७ मे, १९८३) * द्वारे विशोधीत.
सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ (१ ऑगस्ट, १९८६) * द्वारे विशोधीत.
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ (६ ऑगस्ट, १९९७) * द्वारे विशोधीत.
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९* (१६-९-२००५) ** द्वारे विशोधीत.
सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०# (१८-५-२००९) * द्वारे विशोधीत.
सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४# (२२-८-२०१२) * द्वारे विशोधीत.

---

* ही खूण अधिनियमाच्या प्रारंभची दिनांक दर्शविते.

† १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ९ द्वारे निरसित करण्यात आला.

‡ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५ ची कलमे ३ व ८ खालीलप्रमाणे आहेत.—

१ एप्रिल, १९७० पासून ३१ मार्च, १९७७ पर्यंतच्या विवक्षित कालावधीमध्ये बसविलेले किंवा न बसविलेले अंशदान विधिग्राह्य ठरविणे.

"§[3] (१) कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या किंवा यथास्थिती जमा झालेल्या किंवा मिळालेल्या स्थूल वार्षिक रकमेच्या पाच टक्के या दराने दिनांक १५ डिसेंबर १९७३ ते दि. १४ डिसेंबर १९७५ (दोन्ही दिवस धरून) या कालावधीसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांवर बसविलेले आणि त्यांच्याकडून वसूल केलेले, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमधील कोणतेही अंशदान हे, या अधिनियमाच्या निकटपूर्ववर्ती कलमाद्वारे नव्याने अधिनियमित केलेले, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम, १९५१ यातील नियम ३२ व अनुसूची नऊ-क याअन्वये कायदेशीर रीतीने बसविण्यात व वसूल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. उक्त कालावधीसाठी उक्त दराने कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेवर अंशदान बसविण्यासाठी, त्यांची मागणी करण्यासाठी किंवा ते वसूल करण्यासाठी केलेली कोणतीही कार्यवाही किंवा कृती ही, कायदेशीर रीतीने केलेली असल्याचे मानण्यात येईल व कोणताही विधिग्राह्य नियम अथवा अनुसूची केलेली नव्हती अथवा अंमलात नव्हती किंवा त्यात केलेल्या सुधारणा कायदेशीर रीतीने केलेल्या नव्हत्या अथवा अंमलात नव्हत्या किंवा सुधारणा नियमात अथवा अनुसूचीत योग्यरीत्या बसवलेल्या नव्हत्या अथवा त्या नियमाचा किंवा अनुसूचीचा भाग नव्हता. याच केवळ कारणावरून किंवा अशा अंतर कारणांवरून त्या कार्यवाहीवर वा कृतीवर कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर आक्षेप घेता येणार नाही.

(२) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याचे कलम ५८ किंवा त्याखाली तयार करण्यात आलेले किंवा नव्याने अधिनियमित करण्यात आल्याचे मानण्यात येणारे नियम, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, दि. १ एप्रिल, १९७० पासून दि. १४ डिसेंबर, १९७३ पर्यंतच्या (दोन्ही दिवस धरून) कालावधीमध्ये, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडून मिळालेल्या, जमा केलेल्या किंवा अर्जित झालेल्या रकमांच्या आधारावर कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडून सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीला कोणतेही अंशदान देय असणार नाही. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९.

(३) पोट-कलमे (१) व (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी दि. १ एप्रिल १९७० ते दि. ३१ मार्च १९७७ या कालावधीच्या कोणत्याही भागाकरीता किंवा भागांकरिता, अशा विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेल्या रकमेव्यतिरिक्त, वेळोवेळी त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडून सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीस काही अंशदान दिले असल्यास त्या अंशदानाचे, आवश्यक असेल त्यानुसार पुढील कालावधीसाठी त्या विश्वस्तव्यवस्थेकडून करण्यात येणा-या अंशदानामध्ये समायोजन करण्यात येईल.–

(अ) दि. ३१ मार्च, १९७० हा दिवस धरून त्या दिवसापर्यंतच्या कालावधीसाठी व कालावधींसाठी.

(ब) दि. १ एप्रिल, १९७० पासून दि. ३१ मार्च १९७७ चा दिवस धरून तोपर्यंत असणा-या कालावधीच्या भागासाठी किंवा भागांसाठी, किंवा

---

§ १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० हा, सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ कलम ४ द्वारे निरसित करण्यात आला.
@ १९८१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ हा, सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.
** २००५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा, सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.
# २००९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा, सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

(क) त्या प्रकरणात आवश्यकता असेल त्याप्रमाणे दिनांक १ एप्रिल, १९७७ पासून दिनांक ३१ मार्च, १९७८ चा दिवस धरुन तोपर्यंत असणा-या कालावधीसाठी असे समायोजन करण्यात आल्यानंतर कोणतीही रक्कम प्रमाणापेक्षा जास्त दिली असल्याचे आढळून आल्यास ती त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेला परत करण्यात येईल."

८. कोणत्याही व्यक्तीने, दिनांक १ एप्रिल, १९७७ पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, जर ती केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली गोष्ट या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणा व इतर तरतुदी वगळता, मुख्य अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये अपराध ठरत नसेल तर या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही अपराधाबद्दल खटला भरला जाण्यास किंवा सिद्धापराध ठरविली जाण्यास पात्र होणार नाही." व्यावृत्ती.

## मुंबई राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांचे नियमन करण्याबाबत आणि त्यांच्या कारभारासाठी अधिक चांगली तरतूद करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** मुंबई राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्तव्यवस्थाचे नियमन करणे आणि त्यांच्या कारभारासाठी अधिक चांगली तरतूद करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, [१][महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,] असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती, अंमलात येणे आणि लागू होणे.

[२][(२) तो, संपूर्ण [३][महाराष्ट्र राज्यास] लागू असेल] :

(३) हा अधिनियम, तात्काळ अंमलात येईल ; परंतु, त्याच्या तरतुदी पोट-कलम (४) खाली अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा सार्वजनिक विश्वस्तसंस्थेच्या कोणत्याही वर्गास लागू होतील.

(४) राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा [४][सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याही वर्गास ज्या दिनांकास लागू होतील तो दिनांक विनिर्दिष्ट करता येईल ; आणि निरनिराळ्या क्षेत्रातील अशा विश्वस्तव्यवस्थांसाठी निरनिराळे दिनांक विनिर्दिष्ट करता येतील] :

परंतु, राज्य शासनास तत्सम अधिसूचनेद्वारे, असाही निदेश देता येईल की, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून अशा कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याही वर्गास [५][अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदींपासून] सूट देण्यात यावी :

परंतु आणखी असे की, अशा रीतीने अधिनियम लागू करण्यासंबंधी किंवा अधिनियमातील तरतुदीपासून सूट देण्यासंबंधी अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, तिचा मसूदा, राजपत्रात तसेच तिच्यामुळे परिणाम होण्याचा संभव असलेल्या व्यक्तींचा माहितीसाठी विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने नोटिशीसह प्रसिद्ध करण्यात येईल ; उक्त नोटिशीत, ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी कोणताही आक्षेप किंवा सूचना स्वीकारल्या जातील तो दिनांक आणि ज्या दिनांकास किंवा दिनांकानंतर असा मसुदा विचारात घेतला जाईल तो दिनांक विनिर्दिष्ट करण्यात येईल.

---

१. सन २०१२ चा अधिनियम क्रमांक २४, अनुसूची, नोंद ४२ अन्वये विशोधीत, दिनांक १-५-१९६० पासून लागू.

२. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३ (ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

३. महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० अन्वये "मुंबई राज्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला :

४. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३ (ब) अन्वये "या सार्वजनिक विश्वस्तव्यस्थांच्या वर्गास" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यांच्या कलम २ अन्वये "या अधिनियमाच्या तरतुदींपासून" या मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

व्याख्या. **२.** विषय किंवा संदर्भ यात काही प्रतिकूल नसेल तर या अधिनियमात.—

[१]* * * * * *

(२) " सहायक धर्मादाय आयुक्त " याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त केलेला सहायक धर्मादाय आयुक्त, असा आहे.

(३) " धर्मादाय आयुक्त " याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्त केलेला धर्मादाय आयुक्त, असा आहे.

(४) " न्यायालय " याचा अर्थ, बृहन्मुंबईत नगर दिवाणी न्यायालय आणि इतरत्र जिल्हा न्यायालय, असा आहे.

(५) " धर्मादाय उप-आयुक्त " याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त केलेला धर्मादाय उप- आयुक्त, असा आहे.

[२][(५अ) " लेखा संचालक " आणि " सहायक लेखा संचालक " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये नियुक्त केलेला अनुक्रमे, लेखा संचालक आणि सहायक लेखा संचालक, असा आहे.]

(६) " हिंदू " या संज्ञेत, जैन, बौद्ध व शीख यांचा समावेश होतो ;

(७) " निरीक्षक " याचा अर्थ, कलम ६ अन्वये नियुक्त केलेला निरीक्षक, असा आहे.

[३][(७अ) " विश्वस्तव्यवस्था लेख " याचा अर्थ, ज्या लेखाद्वारे विश्वस्तव्यवस्थेच्या कर्त्याने, विश्वस्तव्यवस्था १८६०चा
निर्माण केली तो लेख, असा आहे, [ आणि त्यात, सक्षम प्राधिकरणाने तयार केलेल्या कोणत्याही योजनेचा २१.
किंवा महाराष्ट्र राज्यास लागू करताना, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदलेल्या संस्थेच्या कोणत्याही संस्थापन समयलेखाचा व नियमांचा व विनियमांचा समावेश होतो.] ] ;

(७ब) " धर्मादाय सह-आयुक्त " याचा अर्थ, कलम ३-क अन्वये नियुक्त केलेला धर्मादाय सह-आयुक्त, असा आहे.] ;

(८) " व्यवस्थापक " याचा अर्थ, जी व्यक्ती एकतर एकटीच किंवा इतर कोणाही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या समवेत, त्या-त्या वेळी कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त मालमत्तेचा कारभार पहात असेल अशी (विश्वस्ताव्यतिरिक्त इतर) व्यक्ती असा आहे व तीत.—

(अ) मठाच्या बाबतीत, अशा मठाचा प्रमुख ;

(ब) वक्फच्या बाबतीत, अशा वक्फचा मुतवल्ली ;

(क) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदलेल्या संस्थेच्या बाबतीत, [५][संस्थेची मालमत्ता विश्वस्ताकडे निहित करण्यात आलेली नाही किंवा कसे ], तिचे नियामक मंडळ यांचा समावेश होतो ;

(९) " मठ " याचा अर्थ, शिष्यवर्गास धार्मिक शिक्षण देणे किंवा त्यांच्यात आध्यात्मिक सेवा कार्य करणे, हे जिचे कर्तव्य आहे किंवा अशा शिष्यवर्गावर जी आधिपत्य चालविते किंवा असे आधिपत्य असल्याचा दावा सांगते, अशा व्यक्तीच्या आधिपत्याखालील, हिंदू धर्माच्या प्रचारासाठी असलेली संस्था, असा आहे आणि त्यामध्ये अशा संस्थेची संबद्ध असलेल्या धार्मिक पूजेच्या किंवा शिक्षणाच्या स्थानांचा समावेश होईल.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम २ अन्वये खंड (१) वगळण्यात आला.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ खंड (१) अन्वये खंड (५अ) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ३ खंड (२) अन्वये " आणि त्यात, सक्षम प्राधिकरणाने तयार केलेल्या " या मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ३ खंड (३) अन्वये " संस्थेची मालमत्ता निश्चित करण्यात आलेली असो वा नसो " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१०) "हितसंबंध असलेली व्यक्ती" [१][यात पुढील व्यक्तींचा समावेश होतो]—

(अ ) मंदिराच्या बाबतीत, ज्या व्यक्तीस मंदिरात पूजा किंवा उपासना करण्याचा हक्क आहे किंवा जी नेहमीच पूजा किंवा उपासना करते किंवा ज्या व्यक्तीस मंदिरांच्या देणग्यांच्या वाटणीत भाग घेण्याचा हक्क आहे किंवा जी नेहमी असा भाग घेते ती व्यक्ती,

(ब) मठाच्या बाबतीत, मठाचा शिष्य किंवा मठ ज्या धार्मिक पंथाचा असेल त्या धार्मिक पंथातील व्यक्ती,

(क) वक्फच्या बाबतीत, वक्फकडून कोणताही आर्थिक किंवा इतर लाभ मिळण्याचा हक्क असलेली व्यक्ती आणि त्यात, मशीद, इदगाह, इमामबारा, दर्गा, मकबरा यात किंवा वक्फशी संबंध असलेल्या इतर धार्मिक संस्थेत, उपासना किंवा इतर कोणताही धार्मिक विधी करण्याचा किंवा वक्फखालील कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादाय स्वरूपाच्या संस्थेत भाग घेण्याचा ज्या व्यक्तीस अधिकार असेल, त्या व्यक्तीचा समावेश होईल,

१८६० चा २१. (ड) संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदलेल्या संस्थेच्या बाबतीत, अशा संस्थेचा कोणताही सदस्य, आणि

(ई) इतर कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, [२][कोणताही विश्वस्त किंवा लाभाधिकारी ];

(११) " विहित " याचा अर्थ नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(१२) " सार्वजनिक रोखे " याचा अर्थ,–

(अ) केंद्र सरकारचे किंवा कोणत्याही राज्य शासनाचे रोखे ;

(ब) ज्यावरील व्याजाची किंवा लाभांशाची हमी केंद्र सरकारने किंवा कोणत्याही राज्य शासनाने घेतली आहे असे रेल्वेचे किंवा इतर कंपन्यांचे कर्ज रोखे, ऋणपत्रे किंवा शेअर्स ;

(क) केंद्र किंवा राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने पैशासाठी काढलेली ऋणपत्रे किंवा इतर रोखे ;

(ड) राज्य शासन याबाबत देईल अशा आदेशावरून स्पष्टरीत्या प्राधिकृत केलेला रोखा, असा आहे ;

(१३) " सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था " याचा अर्थ, सार्वजनिक स्वरूपाच्या धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी किंवा या दोन्ही प्रयोजनासाठी स्पष्ट किंवा गर्भित अर्थाने, असलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, असा आहे आणि त्यात, मंदिर, मठ, वक्फ [३][चर्च, सिनेगॉग, अग्यारी किंवा इतर सार्वजनिक स्वरूपाच्या धार्मिक पूजेचे स्थान ], [४][धर्मादा] किंवा इतर कोणतेही धार्मिक किंवा धर्मादाय स्वरूपाचा दाननिधी व धार्मिक किंवा धर्मादाय
१८६० चा २१. कार्यासाठी किंवा या दोन्ही कार्यासाठी बनविलेली आणि संस्था नोंदणी अधिनियम, १८६० या अन्वये नोंदलेली संस्था याचा समावेश होतो ;

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम २ अन्वये "याचा अर्थ " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ३ खंड (४) अन्वये " कोणताही लाभाधिकारी " या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ खंड (५) अन्वये हा मजकूर नेहमीकरता समाविष्ट करण्यात आला असल्याचे समजण्यात येईल.

[४] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(१४) "प्रदेश" किंवा "उप-प्रदेश" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये ज्या प्रदेशास असे नाव दिले आहे आणि ज्याकरिता सार्वजनिक विशवस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय स्थापन करण्यात आले असेल अशी क्षेत्रे, असा आहे ;

(१५) "नियम" याचा अर्थ, या अधिनियमाअन्वये केलेले नियम, असा आहे.

[1]* * * * *

(१७) "मंदिर" याचा अर्थ, सार्वजनिक धार्मिक उपासनेची जागा म्हणून कोणत्याही नावाने ओळखण्यात व वापरण्यात येणारी, किंवा सार्वजनिक (धार्मिक) उपासनेची जागा म्हणून हिंदू समाजास किंवा त्याच्या कोणत्याही वर्गास समर्पित केलेली किंवा त्यांचा हितार्थ वाहिलेली किंवा त्यांच्याकडून हक्काने वावरण्यात येणारी जागा, असा आहे ;

(१८) "विश्‍वस्त" याचा अर्थ, ज्या व्यक्तीकडे केवळ तिच्याकडेच किंवा इतर व्यक्तींच्या समवेत विश्‍वस्त मालमत्ता निहित असेल ती व्यक्ती, असा आहे आणि त्यात, व्यवस्थापकाचा समावेश होतो ;

(१९) "वक्फ" याचा अर्थ, [2][मुस्लीम कायद्याअन्वये] धर्मशील, धार्मिक किंवा धर्मादाय म्हणून मान्यता दिलेल्या कोणत्याही प्रयोजनसाठी, इस्लाम धर्म अनुसरणा-या व्यक्तीने, कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता कायम समर्पित करणे, असा आहे आणि त्यात वहिवाटीने चालत आलेल्या वक्फचा [3][आणि मुस्लीम कायद्याअन्वये धर्मशील, धार्मिक किंवा धर्मदाय म्हणून मान्यता दिलेल्या कोणत्याही प्रयोजनार्थ दिलेल्या अनुदानांचा (मशरुत-उल्‌खिदमतधरुन) व अशा रीतीने मान्यता दिलेल्या कोणत्याही प्रयोजनार्थ ज्या मर्यादेपर्यंत मालमत्ता समर्पित केलेली असेल त्या मर्यादेपर्यंत, वक्फ अल्‌अल औलादचा] समावेश होईल ; परंतु त्यात मुसलमान वक्फ वैधकरण अधिनियम, १९१३ मधील ज्या कलमान्वये वक्फ निर्माण करणा-या व्यत्तीस किंवा त्याच्या कुटुंबातील किंवा वंशातील कोणत्याही व्यक्तीस स्वतःसाठी कोणताही फायदा मिळण्याबद्दल त्या त्या वेळी दावा सांगता येतो. अशा कलम ३ मध्ये वर्णन केलेल्या वक्फचा समावेश होणार नाही ; १९१३ चा २.

(२०) या अधिनियमात उपयोगात आणलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या आणि भारतीय विश्‍वस्तव्यवस्था अधिनियम, १८८२ यात व्याख्या केलेल्या शब्दांना व शब्दप्रयोगांना त्या अधिनियमात त्यांना जे अर्थ दिले आहेत तेच त्यांचे अर्थ असतील. १८८२ चा २.

**२-अ.** [म्हैसूर राज्याच्या ज्या भागास हा अधिनियम लागू आहे, त्या भागास या अधिनियमातील विवक्षित उल्लेख लागू करतांना त्यांचा अर्थ लावणे] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ च्या कलम ५ अन्वये वगळण्यात आले.

## प्रकरण दोन

### आस्थापना

धर्मादाय आयुक्त.

**३.** [4][राज्य शासनाला] राजपत्रातील अधिसूचनेद्वारे धर्मादाय आयुक्त या अभिधानाचा एक अधिकारी नेमता येईल, आणि हा अधिकारी या अधिनियमाच्या तरतुदींनुसार किंवा त्या अन्वये त्याला प्रदान करण्यात आले असतील अशा अधिकारांचा वापर करील आणि त्याच्याकडे सोपविण्यात आली असतील अशी कर्तव्ये व कामे पार पाडील आणि तो, राज्य शासन देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, [5][संपूर्ण राज्यात] या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या कामावर देखरेख ठेवील आणि या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणील.

---

[1] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९ याचे, कलम २ पहिली अनुसूची या अन्वये खंड (१६) वगळण्यात आला.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याचे, कलम ३ खंड (६) उप-खंड (अ) अन्वये "इस्लाम कायदा" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३, खंड (६), उप-खंड (ब) अन्वये हा मजकूर व कंस समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९६० मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६(अ) अन्वये " मुंबई व म्हैसूर राज्य शासन यास प्रत्येकी" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये "अधिनियमाची व्याप्ति राज्याचा संपूर्ण भागात" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१] *         *         *         *         *

[२][**३-अ.** [३][(१)] राज्य शासनाला राजत्रातील अधिसूचनेद्वारे धर्मादाय सह-आयुक्त या अभिधानाने ओळखले जाणार एक किंवा अधिक अधिकारी नेमता येतील व ते, धर्मादाय आयुक्तांच्या नियंत्रणास व राज्य शासन देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, धर्मादाय आयुक्ताच्या अधिकारांपैकी सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करतील व धर्मादाय आयुक्तांची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये व कामे पार पाडतील.] धर्मादाय सह-आयुक्त.

[४][(२)] राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अधिक प्रदेशांच्या किंवा उप-प्रदेशांच्या प्रशासनावर धर्मादाय आयुक्तांच्या नियंत्रणाधीन देखरेख ठेवण्याकरिता धर्मादाय सह-आयुक्ताला विभागीय प्रमुख म्हणून घोषित करता येईल.]

धर्मादाय आयुक्त [७][व धर्मादाय सह-आयुक्त] म्हणून नेमणूक होण्यासाठी अर्हता.

[५][**४.** [६][धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय सह-आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती] पुढील अर्हता धारण करणारी व्यक्ती असली पाहिजे :—

(अ) जिल्हा न्यायाधीश किंवा मुंबई नगर दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश किंवा इलाखा शहर लघुवाद न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश यांच्या दर्जाहून कमी दर्जाचे नाही असे न्यायिक पद धारण करीत असेल किंवा तिने पद धारण केले होते अशी व्यक्ती ; [८][*   *   *] ;

[९][ परंतु, धर्मादाय सह-आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती ही, सहायक न्यायाधीशाच्या किंवा लघुवाद न्यायालय मुंबई, याच्या उपर मुख्य न्यायाधीशाच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसणारे न्यायिक पद जी धारण करीत असेल किंवा जिने धारण केले असेल [१०][किंवा कमीत कमी पाच वर्षांच्या कालावधीसाठी ज्या व्यक्तीने धर्मादाय उपआयुक्ताचे पद धारण केले असेल ] अशी व्यक्ती असेल, किंवा]

(ब) कमीत कमी दहा वर्षांच्या मुदतीसाठी—

१९२६ चा ३८. (एक) जी भारतीय बार कौसिल अधिनियम, १९२६ [११][किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१] खाली नोंदणी झालेली अधिवक्ता असेल अशी व्यक्ती,

१९६१ चा २५. (दोन) जी उच्च न्यायालयाचा न्यायप्रतिनिधी असेल अशी व्यक्ती, अथवा

१९२० चा मुंबई १७. (तीन) मुंबई वकिल अधिनियम, १९२० अन्वये नोंदणी झालेला वकील असेल अशा व्यक्ती असेल.

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २(१) अन्वये कलम ३ ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात देण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९५१ चा मुंबई अधिनियमाच्या क्रमांक १४ यांच्या कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ८ (अ) अन्वये "चॅरिटी कमिशनर म्हणून नेमावयाचा इसम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[८] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ च्या कलम २ (अ) अन्वये " किंवा " हा शब्द वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या ३२ च्या कलम २ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१०] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[११] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

धर्मादाय उप-आयुक्त आणि सहायक धर्मादाय आयुक्त.

**५.** (१) राज्य शासनाला [१][धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात किंवा] आवश्यक वाटतील त्या प्रदेशांसाठी किंवा उपप्रदेशांसाठी किंवा आवश्यक वाटेल अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकरिता किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या अशा वर्गांकरिता आवश्यक वाटतील इतके धर्मादाय उप-आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त देखील नेमता येतील.

[२][(२)] धर्मादाय उप-आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती ही, पुढील अर्हता धारण करणारी व्यक्ती असली पाहिजे :-

(अ) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) किंवा मुंबईच्या लघुवाद न्यायालयाचा न्यायाधीश याच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे न्यायिक पद किंवा राज्य शासनाच्या मते समतुल्य असेल असे कोणतेही पद धारण करीत असेल किंवा जिने ते धारण केले असेल अशी व्यक्ती, अथवा

(ब) जी व्यक्ती आठ वर्षापेक्षा कमी नाही एवढ्या कालावधीसाठी,—

(एक) भारतीय बार कौन्सिल अधिनियम, १९२६ [३][ किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१] अन्वये नोंदणी केलेला अधिवक्ता असेल अशी व्यक्ती ; १९२६ चा ३८. १९६१ चा २५.

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायप्रतिनिधी असेल अशी व्यक्ती, अथवा

(तीन) मुंबई वकील अधिनियम, १९२०, अन्वये नोंदणी केलेला वकील असेल अशी व्यक्ती ; [४][किंवा] १९२० चा १७.

[५][(क)] ज्या व्यक्तीने पाच वर्षापेक्षा कमी नसेल अशा कालावधीसाठी सहायक धर्मादाय आयुक्तांचे पद धारण केले असेल अशी व्यक्ती]

(२-अ) सहायक धर्मादाय आयुक्त म्हणून नेमावयाची व्यक्ती ही, पुढीलप्रमाणे अर्हता धारण करणारी व्यक्ती असली पाहिजे :—

(अ ) दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), याच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसेल असे न्यायिक पद [६][एक वर्षाहून कमी नाही अशा मुदतीसाठी] धारण करीत असेल किंवा जिने असे पद धारण केले असेल अशी व्यक्ती ; [६][अथवा]

(ब) [७][चार वर्षापेक्षा कमी नाही] असा कालावधीसाठी,—

(एक) जी भारतीय बार कौन्सिल अधिनियम, १९२६ [८][किंवा अधिवक्ता अधिनियम, १९६१] अन्वये नोंदणी केलेले अधिवक्ता असेल अशी व्यक्ती. १९२६ चा ३८.

(दोन) उच्च न्यायालयाचा न्यायप्रतिनिधी असेल अशी व्यक्ती, अथवा १९६१ चा २५.

(तीन) मुंबई वकिल अधिनियम, अन्वये नोंदणी केलेला वकील असेल अशी व्यक्ती [९][१९२० किंवा] १९२० चा मुंबई १७.

---

१. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ५(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या, कलम ९ अन्वये मूळ कलमऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

३. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ५(२) (अ) (एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियम क्रमांक ५(२) (अ) (दोन ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियम क्रमांक ५(२) (ब) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

६. सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ च्या, कलम ३(१) (अ) (एक) अन्वये “ किंवा कोणतेही कार्यालय या मजकुराने सुरु होणा-या “ व चार वर्षांहून कमी नाही किंवा या मजकुराने संपणा-या भागात मूळ मजकुराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियम क्रमांक ३(२) अन्वये “सात वर्षापेक्षा कमी नाही” या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ५, खंड (३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

९. सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या, कलम ३ अन्वये “१९२०” या ऐवजी हे आकडे व मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(क)] कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या भारतातील कोणत्याही विद्यापीठाची किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि [२][अशी पदवी प्राप्त केल्यानंतर धर्मादाय संघटनेत, अधीक्षक किंवा विधी सहायक याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशा पदावर, कमीत कमी पाच वर्षे काम केले असेल अशी व्यक्ती]

(३ ) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हे, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये ज्यांची तरतूद करण्यात येईल अशा अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये व कामे पार पाडतील.

दुय्यम अधिकारी.

**६.** [३][(या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी. राज्या शासनाला विहित अर्हता धारण करणारा लेखा संचालक व तशा अर्हता धारण करणारे सहायक लेखा संचालक, निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी नेमता येतील,] व त्यास आवश्यक वाटतील असे या अधिनियमाखालील अधिकार, कर्तव्ये व कामे त्यांना नेमून देता येतील :

[४][परंतु, राज्य शासनात सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे आणि त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल त्या शर्तीच्या अधीनतेने, धर्मादाय आयुक्त, [५][धर्मादाय सह-आयुक्त] आणि धर्मादाय उप-आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील असे दुय्यम अधिकारी व सेवक नेमण्याचे अधिकार सोपविता येतील.]

धर्मादाय आयुक्त व इतर अधिकारी हे, राज्य शासनाचे कर्मचारी असणे.

[६][ **६-अ.** या अधिनियमान्वये नेमलेले [७][धर्मादाय आयुक्त [८][धर्मादाय सह-आयुक्त], धर्मादाय उप-आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त] [८][लेखा संचालक, सहायक लेखा संचालक,] निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी व कर्मचारी हे, राज्य शासनाने कर्मचारी असतील आणि राज्याच्या एकत्रीकृत निधीतून त्यांचे वेतन व भत्ते देण्यात येतील. अशा अधिका-यांच्या सेवेच्या शर्ती राज्य शासन ठरवील त्याप्रमाणे असतील.]

धर्मादाय आयुक्त, वगैरे यांचे वेतन व निवृत्तिवेतन वगैरे, संबंधीचा खर्च, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधीतून शासनाला देणे.

**६-ब.** या अधिनियमान्वये नेमलेले धर्मादाय आयुक्त, [८][धर्मादाय सह-आयुक्त], धर्मादाय उप-आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त, [८][लेखा संचालक, सहायक लेखा संचालक,] निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी व सेवक यांचे वेतन, निवृत्तिवेतन, रजा व इतर भत्ते यादाखल राज्य शासन ठरवील इतकी खर्चाची रक्कम, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधीतून राज्य शासनाला प्रत्येक वर्षी देण्यात येईल.]

**७.** [न्यायसहायक] हे कलम, सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या, कलम ३ अन्वये खंड (क) जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या, कलम-४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०(अ) अन्वये धर्मादाय आयुक्ताच्या सहाय्यासाठी या सुरुवातीच्या भागासाठी व "असे पदनाम" या संपणा-या भागासाठी या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १० (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ३ अन्वये कलमे ६-अ व ६-ब समाविष्ट करण्यात आली.

[७] मुंबई धर्मादाय आयुक्त (प्रादेशिक पुनर्रचना) आदेश, १९६० च्या अनुसूचीद्वारे "चॅरिटी कमिशनर" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ११ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

प्रत्यायोजन.

८. (१) राज्य शासनास, या अधिनियमाखालील आपले कोणतेही अधिकार किंवा कामे त्यास योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन राहून धर्मादाय आयुक्त किंवा इतर कोणताही अधिकारी यांच्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

(२) राज्य शासनास, या अधिनियमान्वये नेमण्यात आलेल्या कोणत्या विशिष्ट अधिका-याने वापर करावयाचे कोणतेही अधिकार व पार पाडावयाची कोणतीही कर्तव्ये किंवा कामे, त्यास योग्य वाटतील अशा शर्तीस अधीन राहून, इतर कोणत्याही अधिका-यास वापरता किंवा पार पाडता येतील, असाही निदेश देता येईल.

## प्रकरण तीन

### धर्मादायाची प्रयोजने व विवक्षित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची विधिग्राह्यता

धर्मादायाची प्रयोजने.

**९.** [१][(१)] या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, धर्मादायाच्या प्रयोजनामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो—

(१) दारिद्र विमोचन किंवा दुःख विमोचन,

(२) शिक्षण,

[२][ (३) वैद्यकीय सहाय्य,

(३-अ) जर समाजकल्याण आणि सार्वजनिक हित यांच्या दृष्टीने सोयींची तरतूद करण्यात आलेली असेल तर, मनोरंजनासाठी किंवा फुरसतीच्या वेळेतील व्यवसायासाठी सोयींची तरतूद (अशा तरतुदींसाठीचे सहाय्य धरुन) आणि ; ]

(४) सर्वसाधारणपणे, सार्वजनिक उपयुक्ततेच्या इतर कोणत्याही हेतूची अभिवृद्धी परंतु त्यात पुढील गोष्टीसंबंधातील प्रयोजनाचा समावेश होणार नाही.

[३] * * * * *

(ब) केवळ धार्मिक शिक्षण किंवा उपासना यासंबंधी

[१][(२)] (अ) सोयी मुख्यतः ज्या व्यक्तीसाठी असाव्यात असा हेतू असेल त्या व्यक्तींच्या जीवनमानात सुधारणा करण्याच्या उद्देशाने त्या सोयी करण्यात आल्याखेरीज ; आणि

(ब) एकतर—

(एक) अशा व्यक्तींना, त्यांचे अल्पवय किंवा वार्धक्य किंवा विकलता किंवा विकलांगता, गरिबी किंवा सामाजिक व आर्थिक परिस्थिती या कारणास्तव उपरोक्त सोयींची आवश्यकता असल्याखेरीज, किंवा

(दोन) त्या सोयी सर्व जनतेस उपलब्ध करून देण्यात येणार असल्याखेरीज,–

समाजकल्याणाच्या हिताच्या दृष्टिने, या सोयी पुरविण्यात आल्या पाहिजेत ही या कलमान्वये घालून दिलेली आवश्यकता पूर्ण झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.

(३) उक्त आवश्यकतेच्या अधीन राहून, या कलमाचे पोट-कलम (१) विशेषतः ग्रामीण सभागृहे, सामूहिक केंद्रे आणि स्त्रियांसाठी असलेल्या संस्था या ठिकाणी सोयींची तरतूद करण्यासंबंधी आणि मनोरंजन व फुरसतीच्या वेळेतील उद्योग यासाठी वापरण्यात येणा-या मैदानांची व इमारतींची तरतूद करणे व त्यांची देखभाल करणे, यास लागू होईल आणि असे कोणतेही कार्य संघटित करून त्या प्रयोजनार्थ सोयी पुरविण्यासाठी ते लागू असेल. ]

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या, कलम ६ अन्वये कलम ९ ला पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) आणि (३) जादा दाखल करण्यात आली.

[२] वरील अधिनियम क्रमांक ६ (१) अन्वये खंड (३) च्या ऐवजी खंड (३ ) व (३अ) हे खंड दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियम क्रमांक ६ (२) अन्वये खंड (४) चा ऐवजी उपखंड (अ) वगळण्यात आले.

**१०.** कोणताही कायदा, रुढी किंवा वहिवाट यामध्ये काहीही असले तरी, एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, ज्या व्यक्तींच्या फायद्यांसाठी अगर ज्या उद्देशासाठी ती निर्माण केली असेल त्या व्यक्ती किंवा ते उद्देश अनिश्चित आहेत किंवा निश्चित न करता येण्याजोगे आहेत. याच केवळ कारणावरून निरर्थक ठरणार नाही.

अनिश्चिततेच्या कारणावरून सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

**स्पष्टीकरण**-धर्म, धर्मादा किंवा पुण्यकार्य, पुण्यदान अशा हेतूसाठी निर्माण करण्यात आलेली एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, ज्या उद्देशासाठी ती निर्माण करण्यात आली असेल ते उद्देश अनिश्चित आहेत किंवा निश्चित न करता येण्याजोगे आहेत, याच केवळ कारणांवरुन निरर्थक होते, असे मानण्यात येणार नाही.

**११.** ज्या प्रयोजनासाठी एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण केली असेल त्यांपैकी काही प्रयोजने धर्मादाय किंवा धार्मिक स्वरुपाच्या असून काही तशा स्वरुपाची नसतील तर, ती विश्वस्तव्यवस्था, धर्मादाय स्वरुपाच्या किंवा धार्मिक नसलेल्या प्रयोजनांच्या बाबतीत निरर्थक आहे. याच केवळ कारणावरून धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनाच्या संबंधात निरर्थक ठरते, असे मानण्यात येणार नाही.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही, धर्मादाय किंवा धार्मिक स्वरुपाच्या नसलेल्या प्रयोजनासाठी निरर्थक आहे या मुद्यावर ती निरर्थक न ठरणे.

**१२.** धार्मिक किंवा धर्मादाय स्वरुपाच्या हेतूसाठी मालमत्तेची जी कोणतीही व्यवस्था केली असेल त्या व्यवस्थेबरोबर, जिच्या वतीने ती व्यवस्था केली असेल त्या व्यक्तीवर अशी मालमत्ता एखाद्या धार्मिक किंवा धर्मादाय हेतूसाठीच धारण करण्यास त्यास भाग पाडण्यासंबंधी बंधन लादलेले नाही याच केवळ कारणास्तव उक्त व्यवस्था सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून निरर्थक आहे, असे मानण्यात येणार नाही.

बंधनाच्या अभावी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

**१३.** जर कोणतीही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था एखाद्या धर्मादाय किंवा धार्मिक स्वरुपाच्या विशिष्ट हेतूसाठी किंवा धर्मादाय किंवा धार्मिक हेतूसाठी स्थापण्यात आलेल्या एखाद्या संस्थेच्या किंवा परिसंस्थेच्या फायद्यासाठी निर्माण करण्यात आली असेल तर अशी विश्वस्तव्यवस्था ;

(अ) ज्या विशिष्ट हेतूसाठी विश्वस्तव्यवस्था निर्माण करण्यात आली होती ती पार पाडणे, अशक्य किंवा अव्यवहार्य झाले आहे, किंवा

(ब) एखाद्या सर्वसामान्य धर्मादाय किंवा धार्मिक हेतूसाठी विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा विनियोग करण्याचा हेतू नसला तरीही, ती संस्था किंवा परिसंस्था अस्तित्वात नाही किंवा अस्तित्वात असण्याचे बंद झाले आहे केवळ याच कारणावरून निरर्थक आहे, असे मानण्यात येणार नाही.

विशिष्ट हेतू सफल न झाल्यास किंवा संस्था वगैरे अस्तित्वात असण्याचे बंद झाल्यास, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निरर्थक न होणे.

## प्रकरण चार

### सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी

**१४.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता राज्य शासनास, प्रदेश व उप-प्रदेश तयार करता येतील व अशा प्रदेशाच्या व उप-प्रदेशाच्या हद्दी विहित करता येतील व त्यात फेरफार करता येतील.

प्रदेश व उप-प्रदेश

(२) या कलमान्वये तयार करण्यात आलेले प्रदेश व उप-प्रदेश व त्यांच्या हद्दी आणि अशा हद्दींत केलेला प्रत्येक बदल राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी कार्यालये.

**१५.** प्रत्येक प्रदेशात किंवा उप-प्रदेशात सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय असेल, परंतु दोन किंवा अधिक प्रदेशांसाठी किंवा उप-प्रदेशांसाठी एकच सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालय असू शकेल;

आणखी असे की, एका प्रदेशासाठी किंवा उप-प्रदेशासाठी एक किंवा अधिक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी संयुक्त कार्यालये असू शकतील.

जिल्ह्यांमध्ये कार्यालये स्थापन करण्याचा अधिकार.

[१][ **१५-अ.** प्रदेशांचे व उप-प्रदेशांचे प्रशासनिक काम सुकर होण्यासाठी राज्य शासनास, कोणत्याही प्रदेशाखालील किंवा उप-प्रदेशाखालील सर्व जिल्ह्यांमध्ये कार्यालये स्थापन करता येतील.]

धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हा. सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालयाचा प्रभारी अधिकारी असणे.

**१६.** राज्य शासनास, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याची, एक किंवा अधिक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालये किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी संयुक्त कार्यालये यांचा प्रभारी अधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

पुस्तके निर्देशसूची व नोंदवह्या.

**१७.** प्रत्येक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी संयुक्त कार्यालयात विहित करण्यात येतील अशी पुस्तके, निर्देशसूच्या व इतर नोंदवह्या ठेवणे व त्या सुस्थितीत राखणे हे, अशा कार्यालयाचा प्रभार असलेल्या धर्मादाय उप-आयुक्ताचे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताचे कर्तव्य असेल. अशी पुस्तके, निर्देशसूच्या व नोंदवह्या यांमध्ये विहित करण्यात येईल अशा तपशीलाचा अंतर्भाव असेल.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी.

**१८.** (१) हा अधिनियम जिला लागू केला आहे अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताने त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

(२) ज्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या हद्दीत, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी विश्वस्ताचे कार्यालय असेल [२][ किंवा, यथास्थिति, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा मोठा भाग असेल] त्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे असा अर्ज करण्यात येईल.

(३) असा अर्ज लेखी स्वरुपात असेल व तो विहित करण्यात येईल अशा नमुन्याप्रमाणे असेल व त्याच्याबरोबर विहित करण्यात येईल अशी फी असेल.

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ७ अन्वये कलम १५-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(४) असा अर्ज—

(अ) जी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था हा अधिनियम तिला लागू करण्यात येण्यापूर्वी निर्माण करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, हा अधिनियम लागू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल, आणि

(ब) जी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था हा अधिनियम अंमलात आल्यानंतर निर्माण करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, ती निर्माण झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत करण्यात येईल.

(५) अशा अर्जात, इतर गोष्टींबरोबर, पुढील तपशील अंतर्भूत असेल–

[१][ (अ-एक) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या नावाने ओळखण्यात येते किंवा येईल ते नाव (यात यापुढे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव असा निर्देश केला आहे)]

(एक) विश्वस्त व व्यवस्थापक यांची नावे व पत्ते ;

(दोन) विश्वस्ताच्या पदावर उत्तराधिकाराने येण्याची पद्धत ;

(तीन) विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर व जंगम मालमत्तेची यादी व ती ओळखण्यास पुरेसे होईल असे तिचे वर्णन व तपशील ;

(चार) स्थावर व जंगम मालमत्तेची अंदाचे किंमत ;

(पाच) अर्जाच्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षांतील किंवा विश्वस्तव्यवस्था निर्माण होऊन जो कालावधी लोटला असेल त्या कालावधीतील या दोहोंपैकी जी कमी असेल त्या मुदतीतील, उत्पन्नावरून अंदाज केलेले विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे स्थूल सरासरी वार्षिक उत्पन्न ;

(सहा) अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात, खंड (पाच) अन्वये दिलेला तपशील ज्या मुदतीसंबंधी असेल त्या मुदतीत झालेल्या खर्चावरून अंदाज केलेल्या सरासरी वार्षिक खर्चाची रक्कम ;

(सात) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी विश्वस्ताकडे किंवा व्यवस्थापकाकडे ज्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावयाचा तो पत्ता ;

(आठ) विहित करण्यात येईल असा इतर तपशील :

परंतु, कोणत्याही किंवा सर्व सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत, नियमात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा किंमतीच्या व अशा प्रकारच्या विश्वस्तव्यवस्थांच्या मालमत्तेचा तपशील देणे आवश्यक असणार नाही, अशी तरतूद नियमात करता येईल.

(६) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या प्रत्येक अर्जावर, विश्वस्त किंवा त्याने या बाबतीत विशेष रीतीने प्राधिकृत केलेला त्याचा अभिकर्ता विहित करण्यात येईल अशा रीतीने, सही करील व ती सत्यापित करील. विश्वस्तव्यवस्था लेख केलेला असेल व तो अस्तित्वात असेल तर, त्याची एक प्रत अर्जासोबत जोडण्यात येईल.

[२][ (६-अ) असा अर्ज मिळाल्यावर, जर असे निदर्शनास आले की, कोणत्याही तपशीलाबाबत अर्ज अपूर्ण आहे किंवा त्यात सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा पूर्ण तपशील दिलेला नाही तर, धर्मादाय उप-आयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास, विश्वस्ताकडे अर्ज परत करता येईल आणि सर्व तपशिलानिशी अर्ज पूर्ण करण्याबद्दल किंवा विश्वस्तव्यवस्थेचा संपूर्ण तपशील त्यात देण्याबद्दल विश्वस्तास निदेश देऊन, अशा निदेशात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, तो पुन्हा सादर करण्यास सांगता येईल आणि अशा निदेशाचे पालन करणे हे विश्वस्ताचे कर्तव्य असेल.]

---

[१]· सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम २ (१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२]· सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८ खंड (१) अन्वये पोट-कलम (६-अ) समाविष्ट करण्यात आले.

" पुढील अधिकारी आणि प्राधिकारी यांच्यासाठी " याने सुरू होणा-या भागासाठी व " मुंबई प्रादेशिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ स्थानिक अचल मालमत्ता स्थीत.

[१][ (७) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव आणि तिचे वर्णन यासहित तिच्या स्थावर मालमत्तेसंबंधी असलेला तपशील ज्यात असेल असे, विहित नमुन्यातील ज्ञापन [२][ भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ च्या कलम ८९ खालील पुस्तक क्रमांक एक मध्ये दाखल करण्याच्या प्रयोजनासाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्थाचे] [३][ अशी स्थावर मालमत्ता ज्या उप-जिल्ह्यामध्ये असेल त्या उप-जिल्ह्यासाठी सदर नोंदणी अधिनियमान्वये नेमलेल्या दुय्यम निबंधकाकडे पाठविणे, हे कर्तव्य असेल.] (१९०८ चा १६.)

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण करण्यात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत असे ज्ञापन पाठविण्यात येईल आणि त्यावर विश्वस्त किंवा त्याने या बाबतीत विशेष रीतीने प्राधिकृत केलेला अभिकर्ता. विहित करण्यात येईल अशा रीतीने सही करील व ते सत्यापित करील.]

नोंदणीसाठी चौकशी.

**१९.** कलम १८ अन्वये अर्ज मिळाल्यानंतर किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर किंवा स्वतः होऊन, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त पुढील गोष्टींची खात्री करुन घेण्याकरिता विहित करण्यात आलेल्या रीतीने चौकशी करेल :—

[४][ (एक) विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा कसे आणि अशी विश्वस्तव्यवस्था ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे,

(दोन) कोणतीही मालमत्ता अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे,

(तीन) विश्वस्तव्यवस्थेची विषयभूत असलेली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही मोठा भाग त्याच्या अधिकारितेत आहे किंवा कसे,

(चार) अशा विश्वस्तव्यवस्थेचे विश्वस्त व व्यवस्थापक यांची नावे व पत्ते,

(पाच) अशा विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्ताच्या पदावर उत्तराधिकाराने येण्याची पद्धत,

(सहा) अशा विश्वस्तव्यवस्थेचा उद्गम, स्वरुप व उद्देश,

(सात) अशा विश्वस्तव्यवस्थेच्या स्थूल सरासरी वार्षिक उत्पन्नाची व खर्चाची रक्कम, आणि

(आठ) कलम १८, पोट-कलम (५) अन्वये विहित करण्यात येईल असा इतर कोणताही तपशील.]

धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचे निष्कर्ष.

**२०.** कलम १९ अन्वये तरतूद करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाल्यावर, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, उक्त कलमात नमूद केलेल्या बाबीसंबंधीचे आपले निष्कर्ष, त्याबद्दलच्या कारणांसह, लिहून ठेवील. [५][ आणि त्यास, नोंदणी फी देण्याविषयी आदेश देता येईल.]

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम २ (२) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] हा मजकूर सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ८, खंड (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] हा मजकूर सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ६ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

**२१.** (१) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत कलम २० अन्वये त्यानी नमूद करून ठेवलेल्या निष्कर्षास अनुसरून किंवा या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, अपिले [1][किंवा अर्ज] करण्यात आले असतील तर, या अधिनियमान्वये तरतूद करण्यात आलेल्या सक्षम प्राधिका-याच्या अंतिम निर्णयास अनुसरून नोंदी करील. नोंदवहीतील नोंदी.

(२) अशा रीतीने केलेल्या नोंदी, या अधिनियमाच्या तरतुदींना आणि पुढील तरतुदीन्वये केलेल्या कोणत्याही बदलास अधीन राहून, अंतिम व निर्णायक असतील.

**२२.** (१) कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत केलेल्या नोंदीपैकी कोणत्याही नोंदीमध्ये कोणताही बदल घडून आल्यास, विश्वस्त अशा प्रकारचा बदल झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत किंवा अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनाच्या हिताच्या दृष्टीने अशा नोंदीमध्ये कोणताही बदल करणे इष्ट असेल त्या बाबतीत, जेथे नोंदवही ठेवण्यात आली आहे त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयाचा प्रभारी धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांना असा बदल किंवा प्रस्तावित बदल कळवील. असे प्रतिवृत्त विहित केलेल्या नमुन्यात देण्यात येईल. बदल.

[2][ (१-अ) पोट-कलम (१) अन्वये कळवावयाचा बदल कोणत्याही स्थावर मालमत्तेसंबंधी असेल त्याबाबतील, विश्वस्त, प्रतिवृत्ताबरोबर, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेतील कोणत्याही बदलासंबंधीचा तपशील (सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव व वर्णन यांसह) असलेले, विहित नमुन्यातील एक ज्ञापन, कलम १८, पोट-कलम (७) यात निर्देश केलेल्या दुय्यम निबंधकाकडे ते अग्रेषित करण्यासाठी म्हणून पाठवील.

अशा ज्ञापनावर विश्वस्त किंवा त्याने याबाबतीत विशेषरित्या प्राधिकृत केलेला त्याचा अभिकर्ता सही करील व ते सत्यापित करील.]

(२) कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील नोंदीचा बिनचूकपणा पडताळून पाहण्याच्या प्रयोजनासाठी किंवा नोंदवहीत नमूद केलेल्या तपशीलापैकी कोणत्याही तपशीलात कोणताही बदल झाला आहे किंवा कसे याची खात्री करून घेण्यासाठी धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास [3][ विहित रीतीने चौकशी करता येईल.]

(३) पोट-कलम (१) खालील प्रतिवृत्त मिळाल्यावर आणि पोट-कलम (२) खाली चौकशी करणे आवश्यक असल्यास अशी चौकशी केल्यानंतर किंवा केवळ उक्त पोट-कलम (२) अन्वये चौकशी केल्यावर, धर्मादाय उप-आयुक्त, किंवा यथास्थिति, सहायक धर्मादाय आयुक्त याची अशी खात्री होईल की, विशिष्ट सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नमूद केलेल्या नोंदपैकी कोणत्याही नोंदीमध्ये बदल घडून आला आहे. [4][ किंवा बदल झाल्यामुळे विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन कार्यालय आणि विश्वस्तव्यवस्थेची संपूर्ण मालमत्ता ही, राज्यात असण्याचे बंद झाले आहे व त्यामुळे विश्वस्तव्यवस्थेचे नाव नोंदवहीतून काढून टाकण्यात आले पाहिजे] तर, [5][ तो, तशा आशयाचा निष्कर्ष त्याबद्दलच्या कारणांसह नमूद करील ; आणि जर त्याची तशी खात्री झाली नाही तर, तो तद्नुसार निष्कर्षाची कारणे देऊन, निष्कर्षाची नोंद करील.

[5][ असा कोणताही निष्कर्ष] धर्मादाय आयुक्ताकडे अपील योग्य असेल. धर्मादाय उप-आयुक्त किंवा

---

[1] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३ (अ) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[3] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] हा मजकूर, सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम २ (अ) (१) अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९ (२) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सहायक धर्मादाय आयुक्त,[१][ ज्या निष्कर्षामुळे नोंदीमध्ये सुधारणा करणे किंवा त्या वगळणे आवश्यक असेल त्या निष्कर्षानुसार] आणि जर अशा कोणत्याही निष्कर्षाविरुद्ध अपिले [२][किंवा अर्ज] करण्यात आहे असतील तर, या अधिनियमानुसार तरतूद करण्यात आलेल्या सक्षम प्राधिका-याच्या अंतिम निर्णयानुसार उक्त नोंदवहीतील [३][ नोंदीमध्ये सुधारणा करील किंवा त्या वगळील] अशा रीतीने नोंदीमध्ये केलेल्या सुधारणा या नोंदीमध्ये [४][ एखादा बदल झाल्यास किंवा त्यापैकी कोणत्याही नोंदी रद्द झाल्यास] त्यात कोणतीही आणखी सुधारणा करण्याच्या अधीनतेने अंतिम व निर्णायक असतील.

[५][ (४) ज्या-ज्या वेळी पोट-कलम (३) अन्वये एखाद्या नोंदीमध्ये सुधारणा करण्यात येईल [६][किंवा नोंदवहीतून विश्वस्तव्यवस्था काढून टाकण्यात येईल ] त्या-त्या वेळी यथास्थिती, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, पोट-कलम (१-क) अन्वये त्याला पुरविण्यात आलेले ज्ञापन, सुधारलेली नोंद [७][किंवा नोंदवहीतून विश्वस्तव्यवस्था काढून टाकल्याचे] प्रमाणित करून [८][ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ याच्या कलम ८९ खालील पुस्तक क्रमांक एक मध्ये फाईल करण्याच्या प्रयोजनासाठी] कलम १८, पोट-कलम (७) यात निर्देश केलेल्या दुय्यम निबंधकाकडे पाठवील] १९०८ चा १६.

धर्मादाय उप-आयुक्तांने किंवा सहायक धर्मादाय आयुक्तानें आणखी चौकशी करणे.

[९][ **२२-अ.** जर कलम २१, [१०][२२ किंवा २८] अन्वये नोंदवहीत नोंदी केल्यानंतर, कोणत्याही वेळी धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास असे दिसून आले की, यथास्थिति, कलम १९ किंवा कलम २२, पोट-कलम (३) [११][२२ किंवा २८] खालील चौकशीचा विषय नसलेल्या कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही तपशिलाविषयी चौकशी करण्याचे राहून गेले आहे तर, धर्मादाय उप-आयुक्त किंवा यथास्थिति, सहायक धर्मादाय आयुक्त यास, विहित केलेल्या रीतीने आणखी चौकशी करता येईल, आपल्या निष्कर्षाची नोंद करता येईल आणि घेतलेल्या निर्णयानुसार किंवा या अधिनियमाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे अपिले किंवा अर्ज करण्यात आले असतील तर, या अधिनियमाद्वारे तरतूद केलेल्या सक्षम प्राधिका-याच्या निर्णयानुसार नोंदवहीमध्ये नोंदी करता येतील. कलमे १९, २०, २१ आणि २२ यांच्या तरतुदी, शक्य होईल तेथवर, या कलमाखालील चौकशी, निष्कर्षाची नोंद व नोंदवहीमध्ये नोंदी करणे यांच्याबाबतीत लागू होतील.]

---

१. वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम २(अ) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) (तीन) अन्वये "मात्र फेरबदल घडून आल्यास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १३ (ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

६. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम २(ब) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ९(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

१०. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १०(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

११. वरील अधिनियमाच्या कलम १० (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][ **२२-ब.** (१) (अ) कलम २८ अन्वये ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी या अधिनियमाखाली करण्यात आली आहे असे मानण्यात येत असेल किंवा,

ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची अगोदरच नोंदणी करण्यात आली असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नावे विश्वस्त मालमत्तेची नोंदणी करणे. इत्यादी.

१९५५ चा मुंबई २३. (ब) कलम १८ अन्वये अर्ज केल्यावर, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९५५ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी (ज्याचा यात यापुढे "उक्त दिनांक" असा निर्देश करण्यात आला आहे) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी, या अधिनियमान्वये करण्यात आली असेल, किंवा

(क) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात कलम १८ अन्वये नोंदणीसाठी अर्ज करण्यात आला असेल आणि असा अर्ज उक्त दिनांकास अनिर्णीत असेल ;

त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त उक्त दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची अशा विश्वस्तव्यवस्थेच्या नावे नोंदणी करण्यासाठी लेखी अर्ज करील आणि अर्जामध्ये विश्वस्तव्यवस्थेचे नाव नमूद करील.

(२) अशा अर्जावर, विश्वस्त किंवा या बाबतीत त्याने विशेष रीतीने प्राधिकृत केलेला त्यांचा अभिकर्ता विहित केलेल्या रीतीने, सही करील व तो सत्यापित करील आणि ज्या धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात नोंदी दाखल केल्या असतील किंवा, यथास्थिति, त्यांच्याकडे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज अनिर्णीत राहिला होता त्या धर्मादाय उपआयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे तो अर्ज करेल.

(३) असा अर्ज मिळाल्यानंतर, धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त.—

(अ) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची कलम २८ अन्वये नोंदणी करण्यात आल्याचे समजण्यात येत असेल किंवा उक्त दिनांकापूर्वी या अधिनियमान्वये जिची नोंदणी करण्यात आली असेल, त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात केलेल्या नोंदीसमोर, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव विनिर्दिष्ट करील, आणि

(ब) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीबद्दलचा अर्ज उक्त दिनांकास अनिर्णीत होता त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात कलम २१ अन्वये नोंदी करण्याच्या वेळी अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव विनिर्दिष्ट करेल.

**२२-क.** [2][(१)] (अ) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी या अधिनियमाखाली [3][कलम व अनुसूची क अन्वये ] करण्यात आल्याचे मानण्यात येत असेल ; अथवा

विवक्षित अधिकारी व प्राधिकारी यांच्याकडे अगोदरच नोंदणी केलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेच्या तपशीलाची नोंदणी करणे.

(ब) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी, कलम १८ अन्वये अर्ज केल्यावर, मुंबई सार्वजनिक
१९५५ चा मुंबई २३. विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९५५ हा अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी (ज्याचा यात यापुढे "उक्त दिनांक" असा निर्देश करण्यात आला आहे). करण्यात आली असेल ; अथवा

(क) ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात, कलम १८ अन्वये अर्ज करण्यात आला असेल आणि असा अर्ज, उक्त दिनांकास, अनिर्णीत असेल ;

त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतील, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त, उक्त दिनांकापासून
१९०८ चा १६. तीन महिन्यांच्या आत, [4][भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ८९ अन्वये पुस्तक क्रमांक एक मध्ये दाखल करण्याच्या प्रयोजनासाठी]

---

[1] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३ याच्या कलम ३ अन्वये कलम-२२-ब आणि २२-क समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४ (१) अन्वये कलम २२-क यास त्याच कलमाचे पोट-कलम (१) असा नविन क्रमांक देण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ११ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर हा दाखल करण्यात आला.

[1][कलम १८, पोट-कलम (७) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिका-याकडे] सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव, व वर्णन यांसह, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेसंबंधी, तपशील असलेले, विहित नमुन्यातील एक ज्ञापन पाठवील.

अशा ज्ञापनावर विश्वस्त किंवा याबाबतीत त्याने विशेष रीतीने प्राधिकृत केलेला त्याचा अभिकर्ता विहित केलेल्या रीतीने सही करील व, ते सत्यापित करेल.

[2][ (२) कलम २८ व अनुसूची कक अन्वये ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी झाल्याचे मानण्यात येत असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, पोट-कलम (१) च्या तरतुदी पुढील फेरफारासह, म्हणजेच उक्त दिनांकासंबंधीचा निर्देश हा, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकसूत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९ हा ज्या दिनांकास अंमलात आला त्या दिनांकासंबंधीचा निर्देश आहे. या फेरफारासह लागू होतील. ] ] १९६० चा मुंबई ६.

विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता अनेक प्रदेशांत किंवा उपप्रदेशात असेल तेव्हा काम चालविण्याची पद्धती.

**२३.** जर कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा कोणताही भाग एकापेक्षा अधिक प्रदेशांच्या किंवा उप-प्रदेशांच्या हद्दीत असेल तर, ज्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या हद्दीमध्ये त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंद करण्यात आली असेल त्या प्रदेशाचा किंवा उप-प्रदेशाचा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, त्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा असा भाग ज्या प्रदेशाच्या, किंवा उप-प्रदेशाच्या हद्दीत असेल त्या प्रदेशांच्या किंवा उप-प्रदेशाचा धर्मादाय उप-आयुक्ताला किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताला नोंदीची एक प्रत पाठवेल. अशा प्रदेशाचा किंवा उप-प्रदेशाचा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, या प्रयोजनासाठी विहित करण्यात येईल अशा पुस्तकात नोंद करेल. धर्मादाय उप-आयुक्त, किंवा यथास्थिति, सहायक धर्मादाय आयुक्त ज्या पोट-जिल्ह्याच्या हद्दीत अशी मालमत्ता किंवा तिचा भाग असेल त्या पोट-जिल्ह्यासाठी, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नेमण्यात आलेल्या दुय्यम निबंधकांकडे अशा नोंदीची एक प्रत पाठवेल. १९०८ चा १६.

चौकशी स्थगित करणे.

**२४.** कोणताही धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची पूर्वीच दुस-या कोणत्याही प्रदेशात किंवा उप-प्रदेशात नोंद केलेली असेल तिच्यासंबंधी कलम १९ किंवा २२ अन्वये चौकशी करणार नाही.

एकापेक्षा अधिक धर्मादाय उप-आयुक्तांनी किंवा सहायक धर्मादाय आयुक्तांनी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी चौकशी न करणे.

**२५.** (१) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीची कलम १९ किंवा २२ खालील चौकशी एकापेक्षा अधिक धर्मादाय आयुक्तांसमोर—मग ते धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त असोत–प्रलंबित असेल तर, धर्मादाय उपआयुक्त असा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींपैकी कोणत्याही व्यक्तीचा किंवा ज्या धर्मादाय उपआयुक्तांसमोर किंवा सहायक धर्मादाय उपआयुक्तांसमोर अशी चौकशी प्रलंबित असेल त्या धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताचा अर्ज आल्यानंतर किंवा स्वतः होऊन, अशा विश्वस्तव्यवस्थेसंबंधीची चौकशी अशा धर्मादाय उपआयुक्तापैकी किंवा सहायक धर्मादाय आयुक्तापैकी कोणी करावयाची ते ठरवील.

(२) पोट-कलम (१) अन्वये धर्मादाय आयुक्ताने दिलेला निर्णय अंतिम व निर्णायक असेल; आणि असा निर्णय दिल्यानंतर, धर्मादाय आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेला धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याच्याशिवाय दुस-या कोणताही धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, कलम १९, किंवा यथास्थिति, कलम २२ अन्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी चौकशी करणार नाही.

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४ (१) (ब) अन्वये कलम-२८-ब अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत या शब्दांनी सुरू होणा-या व कलम १८ पोट-कलम (७) यात निर्दिष्ट केलेल्या अधिका-यांकडे व प्राधिका-यांकडे या शब्दांनी संपणा-या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आली.

[2] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४ (२) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

**२६.** [१][ (१) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही प्रश्नांचा निर्णय देण्यास ज्यास स्पष्टपणे किंवा गर्भितार्थाने प्रतिबंध करण्यात आला नसेल असे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करणारे सक्षम अधिकारिता असणारे कोणतेही न्यायालय, अशा निर्णयाची एक प्रत, धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील, आणि धर्मादाय आयुक्त कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत, अशा निर्णयास अनुसरून, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधी नोंदी करण्याची किंवा त्या सुधारण्याची व्यवस्था करील. सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाने अपिलात किंवा पुनरीक्षणात असा निर्णय बदलला असेल त्या व्यतिरिक्त इतर बाबतीत [२][ अशा रीतीने केलेल्या किंवा सुधारलेल्या नोंदीमध्ये] फेरफार करण्यात येणार नाहीत. अशा रीतीने [३][ केलेल्या किंवा सुधारलेल्या नोंदी], अशा फेरफारास अधीन राहून, अंतिम व निर्णयक असतील.

[१][विवक्षित प्रकरणी नोंदवहीत करावयाच्या किंवा सुधारावयाच्या नोंदी.]

[५][ (२) धर्मादाय आयुक्त, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या संबंधातील कोणत्याही प्रश्नाच्या संबंधी कोणताही निर्णय करील किंवा त्यासंबंधी कोणताही आदेश देईल त्याबाबतीत, त्याने दिलेल्या अशा निर्णयास किंवा आदेशास अनुसरुन, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या संबंधातील अशा नोंदवहीमध्ये नोंदी करण्याची किंवा त्यात सुधारणा करण्याची व्यवस्थाही तो करील, आणि त्यानंतर पोट-कलम (१) च्या तरतुदी न्यायालयाच्या निर्णयास किंवा आदेशास अनुसरून केलेल्या किंवा सुधारण्यात आलेल्या नोंदीच्या संबंधात जशा लागू होतात त्याचप्रमाणे त्या, अशा प्रकारे केलेल्या किंवा सुधारलेल्या नोंदीच्या संबंधात लागू होतील.]

**२७.** (स्क्रिप मुद्रांकित करणे) सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३९, कलम २, पहिली अनुसूची या अन्वये हे कलम निरसित करण्यात आले.

**२८.** (१) [६][अनुसूची-अ)] [७][आणि अनुसूची अअ] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीन्वये नोंदणी केलेल्या सर्व सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था या, हा अधिनियम ज्या दिनांकास त्यांना लागू करता येईल त्या दिनांकापासून या अधिनियमान्वये नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहेत असे मानण्यात येईल. ज्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या हद्दीत [८][उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी करण्यात आली असेल] त्या प्रदेशाचा किंवा उप-प्रदेशाचा धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत अशा विश्वस्तव्यवस्थे-संबंधीच्या नोंदी दाखल करण्याच्या प्रयोजनासाठी, अशा विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तास नोटीस देईल आणि विश्वस्ताचे म्हणणे ऐकून घेतल्यावर आणि [९][विहित करण्यात येईल] अशी

अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमान्वये पूर्वी नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था.

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम १२ (१) अन्वये कलम २६ यास त्याच कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियम कलम १२ (१) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियम कलम १२ (१) (अ) अन्वये समासटीपेऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियम कलम १२ (२) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्र. १४ याच्या कलम ८ (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्र. ६ याच्या कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्र. १४ कलम ८ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम १३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

चौकशी केल्यावर तो, आपले निष्कर्ष त्यासोबत त्यांची कारणे देऊन लिहून ठेवेल. असे निष्कर्ष, उक्त अधिनियमान्वये नोंदवहीत पूर्वीच केलेल्या नोंदीना अनुसरून आणि आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा फेरबदलांस अधीन असतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये लिहून ठेवलेल्या कोणत्याही निष्कर्षांमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, धर्मादाय आयुक्ताकडे अपील करता येईल.

(३) या प्रकरणाच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीतील नोंदी करण्याच्या बाबतीत लागू होतील आणि अशा रीतीने केलेल्या नोंदी अंतिम व निर्णायक असतील.

मालमत्तेच्या संबंधातील नोंदीची प्रत दुय्यम निबंधकाकडे [४]*** पाठविणे.

[१][ **२८ अ.** धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव व वर्णन या नोंदीसहीत अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेच्या संबंधात त्याने केलेल्या नोंदी अंतर्भूत असलेले एक ज्ञापन, विहित केलेल्या नमुन्यात :—

(एक) ज्या पोट-जिल्ह्यात अशी स्थावर मालमत्ता असेल त्या पोट-जिल्ह्याच्या, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नेमलेल्या दुय्यम निबंधकाकडे पाठवील. १९०८ चा १६.

[२] * * * * * *

**२८ ब.** [ विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेच्या नोंदवह्या ठेवण्याचे विवक्षित अधिका-यांचे व प्राधिका-यांचे कर्तव्य] हे कलम सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १७ अन्वये वगळण्यात आले.]

मृत्यूपत्रान्वये निर्माण झालेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था.

**२९ .** मृत्यूपत्रान्वये निर्माण झालेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, अशा मृत्यूपत्राचा व्यवस्थापक ज्या दिनांकास मृत्यूपत्र प्रमाणित करण्यात येईल त्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, किंवा मृत्यूपत्रकर्त्याच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांच्या आत, [४][या दोहोपैकी जी आधीची असेल त्या मुदतीत] कलम १८ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने नोंदणीसाठी अर्ज करील आणि या प्रकरणाच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, अशा विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीच्या बाबतीत लागू होतील :

[५][ परंतु असे की, नोंदणीसाठी अर्ज करण्याकरिता यात विहित केलेली मुदत, पुरेशा कारणास्तव, धर्मादाय उपआयुक्तास किंवा सहाय्यक धर्मादाय उपआयुक्तास वाढविता येईल.]

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्र. २३ याच्या कलम ४ अन्वये २८-अ आणि २८-ब ही कलमे दाखल करण्यात आली.

[२] सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६ याच्या कलम १६ अन्वये खंड (दोन) व (तीन) हे वगळण्यात आले.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम १४ अन्वये ''महसूल प्राधिकारी व स्थानिक प्राधिकारी'' हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९५१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १४ याच्या कलम ९ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९ (दोन) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आला.

**३०.** या प्रकरणान्वये नोंदलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता [१]***** किंवा अशा मालमत्तेचा [२]**** कोणताही भाव किंवा कोणताही भाग किंवा त्यातील कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करणा-या कोणत्याही व्यक्तीस, अशा विश्वस्तव्यवस्थेसंबंधातील [३][ कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत दाखल केलेल्या किंवा भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८, महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्याच्या कलम ८९ खालील पुस्तक क्रमांक एक मध्ये दाखल केलेल्या] संबद्ध तपशिलाची माहिती आहे असे मानण्यात येईल. नोंदवहीत दाखल केलेल्या स्थावर मालमत्तेसंबंधीच्या [१]**** तपशिलाची नोटीस. १९०८ चा १६.

[४][ **स्पष्टीकरण :–**या कलमाच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीस,

(१) जेव्हा तिला उक्त तपशील प्रत्यक्ष माहीत असेल तेव्हा, किंवा तिने करावयास पाहिजे होती अशी कोणतीही चौकशी किंवा शोध करण्याचे जाणूनबुजून टाळले नसले तर, किंवा अक्षम्य हयगय केली नसती तर, तिला उक्त तपशिलाची माहिती झाली असती, तेव्हा ;

(२) असा तपशील ज्या कामकाजाच्या संबंधात महत्त्वाचा भाग असेल, त्या कामकाजाच्या ओघात जर तिच्या अभिकर्त्यास तिच्या वतीने काम करताना, त्याबद्दल माहिती मिळाली असेल तेव्हा नोंदवहीतील कोणत्याही तपशिलाची माहिती आहे असे मानण्यात येईल.

**३१.** (१) या अधिनियमान्वये जिची नोंदणी झाली नाही अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने एखाद्या अधिकाराची अंमलबजावणी करण्याबाबत केलेल्या कोणत्याही दाव्याची कोणत्याही न्यायालयात सुनावणी किंवा निर्णय करण्यात येणार नाही. दाव्याची सुनावणी किंवा निर्णय करण्यास प्रतिबंध.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदी अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने केलेल्या वजावटीसंबंधीचा दावा किंवा एखाद्या अधिकाराची अंमलबजावणी करण्यासंबंधीचे अन्य कामकाज यास लागू होतील.

---

## प्रकरण पाच

### [५][अर्थसंकल्प, लेखे आणि लेखापरीक्षा]

[६][ **३१अ.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे वार्षिक उत्पन्न विहित रकमेपेक्षा अधिक असेल अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त, प्रत्येक लेखावर्ष सुरू होण्याच्या कमीत कमी एक महिना अगोदर, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात किंवा नमुन्यांमध्ये, पुढील वर्षातील विश्वस्तव्यवस्थेचे संभाव्य उत्पन्न व वितरणाच्या रकमा दर्शविणारा अर्थसंकल्प तयार करील व तो धर्मादाय आयुक्तकडे सादर करील. विवक्षित विश्वस्तव्यस्थांच्या विश्वस्तांनी धर्मादाय आयुक्ताकडे अर्थसंकल्प सादर करणे.

(२) अशा प्रत्येक अर्थसंकल्पात विश्वस्तव्यवस्थेचे उद्देश पार पाडण्यासाठी आणि विश्ववस्तव्यवस्थेची मालमत्ता सुस्थितीत ठेवण्यासाठी व तिचे जतन करण्यासाठी पुरेशा तरतुदी करण्यात येतील.]

---

[१] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्र. ३९ याचे कलम २ पहिली अनुसूची या अन्वये " किंवा स्क्रिपचा " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ पहिली अनुसूची या अन्वये "आणि स्क्रिपसंबंधीच्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम १५ अन्वये "मूळ मजकुराऐवजी" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्र. २३ याच्या कलम ५ (२) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम अन्वये " मूळ " या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

**३२.** (१) [1][ * * * * ] सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा प्रत्येक विश्वस्त नियमितपणे लेखे ठेवेल.

(२) असे लेखे, धर्मादाय आयुक्ताकडून मंजूर करण्यात येईल अशा नमुन्यात ठेवण्यात येतील आणि त्यात विहित करण्यात येईल असा तपशील असेल.

लेख्यांचे संतुलन व त्यांची लेखापरीक्षा.

**३३.** (१) कलम ३२ अन्वये ठेवलेले लेखे, प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या ३१ दिनांकास किंवा धर्मादाय आयुक्त निश्चित करील अशा इतर दिनांकास संतुलित करण्यात येतील.

(२) अशा लेख्यांची, दरवर्षी, [2][ * * * *] [3][सनदी लेखापाल अधिनियम, १९४९ याच्या अर्थानुसार जो सनदी लेखापाल आहे] त्याच्याकडून किंवा [4][ राज्य शासन, कोणत्याही शर्तीस अधीन राहून, याबाबत प्राधिकार देईल अशा व्यक्तींकडून] लेखापरीक्षा करण्यात येईल : १९४९ चा ३८.

[4][परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीचा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत कोणत्याही प्रकारे हितसंबंध असणार नाही किंवा तो तिच्याशी संबंधित असणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये काम करणा-या प्रत्येक लेखापरीक्षकाला विश्वस्ताच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले लेखे व सर्व पुस्तके, प्रमाणके व इतर दस्तऐवज आणि अभिलेख पहावयास मिळतील; [5][आणि लेखापरीक्षकाच्या उपयोगासाठी ते उपलब्ध करून देणे, हे विश्वस्ताचे कर्तव्य असेल.]

(४) मागील पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

[6][ (अ) धर्मादाय आयुक्तास, त्याच्या मते कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या लेख्यांची खास लेखापरीक्षा करणे जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्‌व्हा, अशा रीतीने लेख्यांची खास लेखापरीक्षा करण्याबद्दल निदेश देता येईल. पोट-कलम (२) व (३) च्या तरतुदी, जेथवर लागू करता येतील तेथवर, अशा खास लेखापरीक्षेला लागू होतील, अशा खास लेखापरीक्षेसाठी विहित करण्यात येईल अशी फी देण्याबद्दल धर्मादाय आयुक्ताला निदेश देता येईल; [7][ आणि

(ब) राज्य शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या कक्षेतून वगळता येईल].

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १८ “ ह्या अधिनियमान्वये नोंदलेल्या” हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १९ (१) (अ) अन्वये “विहित करण्यात येईल अशा रीतीने” व आणि हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम १० अन्वये “ मूळ मजकूराऐवजी” हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १९(१) (ब) अन्वये “मूळ” मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १९ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ४ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) अन्वये हा शब्द आणि खंड (ब) जादा दाखल करण्यात आला.

**३४.** (१) ताळेबंद आणि उत्पन्न व खर्च लेखे तयार करणे आणि त्याची एक प्रत [1][आपल्या प्रतिवृत्ताच्या एका प्रतीसह विश्वस्त आणि] त्या प्रदेशाचा किंवा उप-प्रदेशाच्या धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांजकडे किंवा धर्मादाय उपआयुक्त तसे करण्यात त्यास भाग पाडील तर धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे हे, कलम ३३ खाली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा लेख्यांची लेखापरीक्षा करणा-या प्रत्येक लेखापरीक्षकाचे कर्तव्य असेल.

ताळेबंद तयार करणे आणि नियमबाह्यता वगैरे संबंधी कळविणे, लेखापरीक्षकाचे कर्तव्य असणे.

[2][ (१-अ) लेखापरीक्षकाने पाठविलेला ताळेबंद आणि उत्पन्न व खर्च यांचा लेखा याची प्रत त्या प्रदेशाचा किंवा उप-प्रदेशाच्या धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे किंवा धर्मादाय आयुक्त तसे करण्यास त्यास भाग पाडील तर धर्मादाय आयुक्ताकडे दाखल करणे हे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताचे कर्तव्य असेल.]

(२) लेखापरीक्षक आपल्या प्रतिवृत्तात, नियमबाह्य, बेकायदेशीर अथवा अयोग्य खर्च, किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा मालकीचा पैसा, व इतर मालमत्ता वसूल करण्यात झालेली कसुरी किंवा अकृती किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या पैशाचे किंवा इतर मालमत्तेचे झालेले नुकसान किंवा अपव्यय या संबंधीच्या सर्व बाबीं विनिर्दिष्ट करील, आणि असा खर्च, कसुरी, अकृती, नुकसान किंवा अपव्यय हे, विश्वस्तांनी किंवा कोणत्याही इतर व्यक्तीने विश्वासघात केल्यामुळे किंवा उपयोजन केल्यामुळे किंवा इतर कोणतेही गैरवर्तन केल्यामुळे घडले किंवा कसे हे ही त्यात नमूद करील.

## [3][ प्रकरण पाच-अ

## विश्वस्तांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांच्यावरील निर्बंध]

**३५.** [4][ (१)] जेव्हा विश्वस्त मालमत्ता ही पैशाच्या स्वरूपात असेल आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कारणांसाठी त्या मालमत्तेचा ताबडतोब किंवा कोणत्याही निकटवर्ती दिनांकास विनियोग करता येणे शक्य नसेल तेव्हा [5][ विश्वस्तव्यवस्थेच्या लेखात कोणताही निदेश असला तरीही, तो पैसा, भारताच्या रिझर्व्ह
१९३४ बँकेबाबत अधिनियम, १९३४ यात व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे कोणत्याही अनूसूचित बँकेत, डाक बचत
चा २. बँकेत किंवा राज्य शासनाने त्या प्रयोजनासाठी मान्यता दिलेल्या सहकारी बँकेत ठेव म्हणून ठेवणे किंवा तो सरकारी रोख्यांत गुंतविणे ] हे विश्वस्तांस बंधनकारक असेल :

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा पैसा गुंतविणे.

परंतु, ती मालमत्ता अनेक वर्षांच्या मुदतीच्या पट्ट्यावर देण्यात आलेली नसल्यास अणि त्या मालमत्तेचे मूल्य हे गहाणावर दिलेल्या पैशाच्या निम्म्या रकमेपेक्षा अधिक असल्यास असा पैसा [6][ भारताच्या कोणत्याही भागात ] असलेल्या स्थावर मालमत्तेच्या प्रथम गहाणांवर गुंतविता येईल :

परंतु आणखी असे की, धर्मादाय आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या किंवा अशा विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गाच्या विश्वस्तास, तो पैसा इतर कोणत्याही रीतीने, गुंतविण्यास परवानगी देता येईल.

---

१. सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २० याच्या कलम २० (१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम २० (२) अन्वये पोट-कलम (१ क) समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम २१ (२) अन्वये हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, याच्या कलम ३ अन्वये कलम ३५ यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम (३) (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकव्यक्तिभूत संस्था) आदेश, १९५९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (२) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९५४ अंमलात येण्यापूर्वी विश्वस्तव्यवस्थेच्या लेखात अंतर्भूत असलेल्या निदेशानुसार आधीच केलेल्या गुंतवणुकीवर किंवा ठेवीवर पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही : १९५४ चा मुंबई ५९.

परंतु, अशा गुंतवणुकीवर किंवा ठेवीवर, उक्त अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकास किंवा त्यानंतर जे कोणतेही व्याज किंवा जो लाभांश मिळेल किंवा उपर्जित होईल उक्त गुंतविलेल्या किंवा ठेव म्हणून ठेवलेल्या रकमा परत मिळण्याची मुदत संपल्यावर [२][ अशा रीतीने गुंतविलेल्या किंवा ठेव म्हणून ठेवलेल्या] कोणत्याही रकमेचा, पोट-कलम (१) मध्ये विहित केलेल्या रीतीने विनियोग करण्यात येईल किंवा त्या गुंतविण्यात येतील.]

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थावर मालमत्तेचे अन्यसंक्रामण.

**३६.** [३][ (१)] [४][ विश्वस्तव्यवस्था लेखात काही अंतर्भूत असले तरी ], धर्मादाय आयुक्ताच्या पूर्वमंजुरीशिवाय पुढील गोष्टी करणे विधिग्राह्य असणार नाही—

(अ) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या कोणत्याही स्थावर मालमत्तेची विक्री, [५]* * * * अदलाबदल करणे किंवा ती देणगी म्हणून देणे, आणि

(ब) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या शेतजमिनीच्या बाबतीत, अशा जमिनी दहा वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी पट्ट्याने देणे किंवा कृषीतर जमिनीच्या बाबतीत किंवा इमारतीच्या बाबतीत अशी जमीन किंवा इमारत तीन वर्षापेक्षा अधिक मुदतीसाठी पट्ट्याने देणे. [६][विश्वस्तव्यवस्थेचे हितसंबंध, तिला मिळणारे लाभ किंवा तिचे संरक्षण या गोष्टी लक्षात घेऊन, धर्मादाय आयुक्तास जी शर्त लादणे योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून, मंजुरी देता येईल ;

(क) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने, तिच्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचा विनियोग करण्यात आला पाहिजे याबद्दल धर्मादाय आयुक्ताची खात्री झाल्यास, अर्ज करण्यात आल्यावर, विश्वस्तव्यवस्थेचे हितसंबंध किंवा तिला मिळणारे लाभ किंवा तिचे संरक्षण या गोष्टी लक्षात घेऊन, त्यास ज्या शर्ती लादणे योग्य वाटेल अशा शर्तीच्या अधीन राहून, अशा मालमत्तेचा विनियोग करण्यासाठी कोणत्याही विश्वस्तास प्राधिकृत करता येईल.

(२) धर्मादाय आयुक्तास, पोट-कलम (१) चा खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये दिलेली मंजुरी, अशी मंजुरी, आपल्याशी लबाडी करून, किंवा आपली गैरसमजूत करून देऊन किंवा मंजुरी मिळण्यासाठी महत्त्वाची असेल अशी वस्तुस्थिती आपल्यापासून लपवून मिळविण्यात आल्याच्या कारणांवरून, रद्द करता येईल; आणि मंजुरी केल्याच्या दिनांकापासून एकशेऐंशी दिवसांच्या आत (किंवा धर्मादाय आयुक्त वेळोवेळी ठरवील अशा एकूण एक वर्षापेक्षा अधिक नसणा-या आणखी मुदतीत,) मालमत्ता परत मिळविण्यासंबंधी निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपाययोजना करण्याबद्दल विश्वस्तास निदेश देता येईल.

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम ५९ याच्या कलम ३ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम ६ याच्या कलम १९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियमाच्या २० याच्या कलम २२ अन्वये कलम ३६ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम ६ याच्या कलम २० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २२ अन्वये मूळ मजकुर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २२ अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

(३) ज्या व्यक्तीच्या नावे मंजुरी देण्यात आली असेल त्या व्यक्तीस, मंजुरी का रद्द करण्यात येऊ नये याबद्दलचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, या कलमान्वये कोणतीही मंजुरी रद्द करण्यात येणार नाही.

(४) धर्मादाय आयुक्ताच्या मते, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत, विश्वस्ताने परिणामकारक उपाययोजना करण्यात कसूर केली असेल किंवा वाजवी प्रयत्नांनी किंवा खर्चाने मालमत्ता परत मिळविणे शक्य नसेल तर, त्यास, विश्वस्ताला होणा-या लाभाचे निर्धारण करता येईल व त्याने विश्वस्त निधीमध्ये अशा प्रकारे निर्धारण केलेल्या लाभाइतकी भरपाई करावी असा निदेश त्यास देता येईल].

विश्वस्तांचे अधिकार व कर्तव्ये व त्यांच्यावरील निर्बंध.

[१][**३६-अ.** (१) प्रत्येक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त हा, विश्वस्तव्यवस्थेच्या अटी, त्या संस्थेचा परिपाठ व धर्मादाय आयुक्त किंवा न्यायालय त्याबाबतीत जे कायदेशीर निदेश देईल त्यास अनुसरून, त्या विश्वस्तव्यवस्थेचा कारभार पाहील व तिचा निधी व मालमत्ता यांचा विनियोग त्या विश्वस्तव्यवस्थेची प्रयोजने व उद्दिष्ट यांसाठी करील, आणि असे व्यवहार, निधी किंवा अशी मालमत्ता जर सर्वसाधारण सुजाण माणसाची स्वतःची असती तर त्याने ती हाताळताना जी काळजी घेतली असती तशीच काळजी त्यासंबंधी तो घेईल.

(२) विश्वस्तास, या अधिनियमाच्या तरतुदींना आणि विश्वस्तव्यवस्थेच्या लेखास अधीन राहून, विश्वस्तव्यवस्थेच्या दूरदर्शी व लाभप्रद व्यवस्थापनास आनुषंगिक असतील अशा सर्व अधिकारांचा वापर करण्याचा आणि त्याच्यावर लादण्यात आलेल्या कर्तव्यांचे यथायोग्य पालन करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी करण्याचा हक्क असेल.

(३) धर्मादाय आयुक्तांच्या पूर्वमंजुरीने असेल त्याशिवाय, आणि विश्वस्तव्यवस्थेच्या हिताच्या दृष्टीने किंवा तिच्या संरक्षणार्थ धर्मादाय आयुक्तांच्याकडून लादण्यात येतील अशा शर्तीस व मर्यादांस अधीन राहून असेल त्या व्यतिरिक्त, कोणताही विश्वस्त तो जिचा विश्वस्त असेल त्या विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनाकरिता किंवा तिच्या वतीने, पैसा (गहाण ठेवून किंवा अन्य प्रकारे) उसना घेणार नाही.

(४) कोणताही विश्वस्त, तो ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही मालमत्तेमधून, स्वतःच्या उपयोगासाठी पैसे उसने घेणार नाही :

परंतु, एखादा विश्वस्त त्याच्या व्यापारातील किंवा उद्योगातील ऋणपत्रे किंवा कोणतीही ठेव यांचे दान करील त्या बाबतीत, त्या विश्वस्ताने विश्वस्तव्यवस्थेकडून स्वतःच्या उपयोगासाठी पैसे उसने घेतल्याचे समजण्यात येणार नाही.

जंगम व स्थावर मालमत्तेची नोंदवही.

**३६-ब.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, अशा विश्वस्तव्यवस्थेच्या (क्षुल्लक किंमतीची नसेल अशा) सर्व जंगम व स्थावर मालमत्तेची, धर्मादाय आयुक्त विहित करील अशा नमुन्यात किंवा नमुन्यांमध्ये, तो विहित करील अशी सर्व माहिती देणारी नोंदवही तयार करील आणि ती सुस्थितीत ठेवील.

(२) अशा नोंदवहीमध्ये विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीचे जडजवाहीर, सोने, चांदी, रत्ने भांडी आणि पात्रे व इतर सर्व जंगम मालमत्ता, तिचे वर्णन, वजन व अंदाजित मूल्य यांसह, दर्शविण्यात येईल.

१९७१ चा महा. ३८.

(३) अशी नोंदवही, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या प्रारंभानंतर, लेखा वर्ष संपल्यापासून तीन महिन्यांच्या आत तयार करण्यात येईल.

(४) अशा नोंदवहीच्या अचूकपणाची पडताळणी केल्यानंतर, तिच्यावर सर्व विश्वस्त किंवा विश्वस्ताने याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, सही करील आणि या अधिनियमाच्या तरतुदींन्वये लेखापरीक्षा करणे आवश्यक असल्यास, लेखापरीक्षेच्या प्रयोजनार्थ ती लेखापरीक्षकास

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियमाच्या २० याच्या कलम २३ अन्वये कलम ३६-अ व ३६-ब समाविष्ट करण्यात आली.

उपलब्ध करून देण्यात येईल. लेखापरीक्षा करणे आवश्यक नसेल त्याबाबतीत, विश्वस्त यथोचितरीत्या सही करून व सत्यापित करून अशा नोंदवहीची एक प्रत त्या प्रदेशाच्या धर्मादाय उपआयुक्तांकडे किंवा सहायक धर्मादाय उपआयुक्तांकडे दाखल करील.

(५) लेखापरीक्षक, लेखापरीक्षेच्या प्रतिवृत्तात अशी नोंदवही योग्यरीत्या ठेवण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबत आणि उक्त नोंदवहीमध्ये कोणताही दोष किंवा चूक असल्यास त्याबाबत उल्लेख करील आणि लेखापरीक्षकाने केलेल्या सूचनांचे विश्वस्त पालन करतील व विश्वस्तांकडे ज्या दिनांकास प्रतिवृत्त पाठविण्यात आले असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, लेखापरीक्षा प्रतिवृत्तात नमूद केलेले दोष किंवा चुका दुरूस्त करील.

(६) दरवर्षी लेख्यांचे संतुलन केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, विश्वस्त किंवा त्याने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती,अशा नोंदवहीचे परिनिरीक्षण करील, व त्या नोंदवहीमध्ये, करण्यात आलेला फेरफार, वगळण्यात आलेल्या गोष्टी किंवा भर घातलेल्या गोष्टी दर्शवून, ती अद्ययावत ठेवील, आणि असे फेरबदल, कलम २२ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने धर्मादाय उपआयुक्तांकडे किंवा सहायक धर्मादाय उपआयुक्त यास कळविण्यात येतील.]

## प्रकरण सहा

### नियंत्रण

निरीक्षण व देखरेख करण्याचा अधिकार.

**३७.** [१][(१)] धर्मादाय आयुक्तांकडे किंवा धर्मादाय उपआयुक्तांस, अथवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा राज्य शासनाने सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिका-यास—

(अ) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेत प्रवेश करण्याचा आणि तिचे निरीक्षण करण्याचा किंवा तीत प्रवेश करविण्याचा व तिचे निरीक्षण करविण्याचा अधिकार असेल ;

[२][(ब) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताचे कोणतेही कामकाज आणि विश्वस्तांच्या किंवा त्या विश्वस्तव्यवस्थेची संबंधित अशा कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले कोणतेही लेखा पुस्तक किंवा दस्तऐवज मागविण्याचा व त्याचे निरीक्षण करण्याचा अधिकार असेल ;]

(क) विश्वस्तांकडून किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून त्यास योग्य वाटेल असे कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखा किंवा प्रतिवृत्त मागविण्याचा अधिकार असेल ;

[३][(ड) विश्वस्तांकडून किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून स्पष्टीकरण घेण्याच्या आणि त्याने केलेल्या कोणत्याही निवेदनाची लेखी नोंद घेण्याचा किंवा करवून घेण्याचा अधिकार असेल :]

परंतु, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेत प्रवेश करताना, प्रवेश करणारे अधिकारी विश्वस्तांना वाजवी नोटीस देतील आणि विश्वस्तव्यवस्थेच्या धार्मिक प्रथा किंवा परिपाठ विचारात घेतील.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २१ अन्वये कलम ३७ यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम २४ (१) (अ) अन्वये खंड (ब) दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २४ (१) (ब) अन्वये खंड (ड) समाविष्ट करण्यात आला.

[१][(२) पोट-कलम (१) खालील कोणत्याही अधिकारांचा वापर करणा-या कोणत्याही अधिका-यास सर्व वाजवी सवलती देणे हे, प्रत्येक विश्वस्ताचे कर्तव्य आणि विश्वस्त किंवा [२][सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेली कोणतीही व्यक्ती], अशा अधिका-याने पोट-कलम (१) द्वारे किंवा तद्न्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिलेला कोणताही आदेश किंवा काढलेला निदेश याचे पालन करील].

[३][(३) या कलमान्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कारभाराने निरीक्षण केल्यावर विश्वस्ताची किंवा विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अक्षम्य हयगय, विश्वासघात, अपयोजन किंवा गैरवर्तणूक यामुळे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची हानी झालेली आहे, असे धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी यास दिसून आले तर, धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास, धर्मादाय आयुक्ताकडे आणि अशाप्रकारे प्राधिकृत केलेल्या अधिका-यास, धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे, त्याबाबतचे प्रतिवृत्त सादर करता येईल.]

**३८.** कलम ३४ अन्वये लेखापरीक्षकाचा अहवाल मिळाल्यावर, [४][ किंवा कलम ३७ अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिका-याने कोणताही अहवाल सादर केले असल्यास, ते मिळाल्यावर,] [५][किंवा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेसंबंधी तक्रार आल्यावर] ज्यास अहवाल सादर करण्यात आला असेल [६][किंवा ज्याच्याकडे तक्रार करण्यात आली असेल] तो धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, विश्वस्तांस किंवा इतर कोणत्याही संबंधित व्यक्तीस त्यास योग्य वाटेल अशा मुदतीच्या आत त्यासंबंधी स्पष्टीकरण सादर करण्यास फर्मावील. लेखापरीक्षकाच्या अहवालासंबंधी [७][किंवा तक्रारीसंबंधी] स्पष्टीकरण.

[८][ **३९.** कलम ३८ मध्ये निर्दिष्ट केलेला अहवाल, विश्वस्ताने किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीने सादर केलेले लेखे किंवा स्पष्टीकरण कोणतेही असल्यास, ते विचारात घेतल्यानंतर आणि विहित रीतीने चौकशी केल्यानंतर, धर्मादाय उपआयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, विश्वस्त किंवा त्या विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेली व्यक्ती, विश्वस्तव्यवस्थेस झालेल्या हानीस कारणीभूत झालेल्या अक्षम्य हयगयीबद्दल, विश्वासघाताबद्दल, दुर्विनियोगबद्दल किंवा गैरवर्तणुकीबद्दल दोषी आहे किंवा नाही या प्रश्नावरील निष्कर्षाची नोंद करील आणि त्याबाबतचा अहवाल धर्मादाय आयुक्तास पाठवील.] धर्मादाय आयुक्तास प्रतिवृत्त पाठविणे.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम ६ याच्या कलम २१ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम २४ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २४ (३) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम २५ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २५ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २५ (क) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[१][कलम ३९ अन्वये मिळालेल्या अहवालावर आदेश काढण्याचा किंवा प्रकरण परत पाठविणे, इत्यादीबाबतचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार].

**४०.** धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याच्या अहवालावर विचार केल्यानंतर, संबंधित व्यक्तीस,संधी देऊन आणि आपणास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर,

[२][ (१) ] [३][ धर्मादाय आयुक्तास पुढील गोष्टी निश्चित करता येतील :—]

(अ) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस झालेल्या हानीची रक्कम ;

(ब) अशी हानी ही कोणत्याही व्यक्तीने [४][ अक्षम्य हयगय, ] विश्वासघात, अपयोजन किंवा गैरवर्तन केल्यामुळे झाली आहे किंवा कसे ;

(क) विश्वस्तांपैकी कोणताही विश्वस्त किंवा [५][ त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेली कोणतीही व्यक्ती ] अशा नुकसानीसाठी उत्तरदायी होती किंवा कसे ;

(ड) विश्वस्तांपैकी कोणताही विश्वस्त किंवा [६][ सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेली कोणतीही व्यक्ती ] अशा हानीबद्दल सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस जी कोणतीही रक्कम [७][ भरण्यास पात्र असेल ती रक्कम ;— किंवा ].

[८][ (२) धर्मादाय आयुक्तास, ज्याने प्रतिवृत्त तयार केले असेल त्या अधिका-याकडे किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर अधिका-याकडे, पुढील चौकशीसाठी ती बाब परत पाठविता येईल किंवा कलम ५० अन्वये हिशेब घेण्याचा निदेश दिला जावा यासाठी हुकूमनामा मिळविण्याकरिता दावा दाखल करण्यात आला असेल तर, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून, प्रकरण तडजोडीने मिटविता येईल किंवा ती बाब सोडून देता येईल.]

अधिकारासंबंधी आदेश.

**४१.** (१) [९][जर विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असलेली कोणतीही व्यक्ती ], सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस झालेल्या हानीबद्दल त्या विश्वस्तव्यवस्थेस कोणतीही रक्कम देण्यास पात्र आहे असे धर्मादाय आयुक्त ठरवील तर, धर्मादाय आयुक्तास त्या व्यक्तीवर उक्त रक्कम अधिभार म्हणून आकारण्यात यावी असा निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) खालील धर्मादाय आयुक्ताने दिलेला आदेश, हा कलम ७२ च्या तरतुदींना अधीन राहून, अंतिम व निर्णायक असेल.

---

[१] सन १९७१ चा अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २७ (ग) अन्वये मूळ सामासिक टीपेऐवजी ही टीप दाखल करण्यात आली.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २७ ब अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २७ (अ) अन्वये "चॅरिटी कमिश्नरने पुढील गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २७ (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २७ (ड) अन्वये " इतर कोणताही इसम अशा नुकसानीस जबाबदार होता किंवा कसे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २७ (ई) (एक) अन्वये " इतर कोणताही इसम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २७ (ई) (दोन) अन्वये " भरण्यास पात्र असेल ती रक्कम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २७ (फ) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम २८ " जर कोणताही इसम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ **४१अ.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, धर्मादाय आयुक्तास, विश्वस्तव्यवस्थेचा कारभार यथोचितरीत्या चाललेला आहे आणि तिच्या उत्पन्नाचा यथोचितरीत्या लेखा ठेवण्यात येत आहे किंवा विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे आणि प्रयोजने याकरिता उत्पन्नाचा यथोचितरीत्या विनियोग व वापर करण्यात येत आहे हे सुनिश्चित करण्यासाठी, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विश्वस्तास किंवा तिच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, वेळोवेळी निदेश देता येतील. तसेच जर धर्मादाय आयुक्तास असे आढळून येईल की, विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही मालमत्तेचा अपव्यय, तिचे नुकसान, तिचे अन्य संक्रामण होण्याचा किंवा तिची गैरविक्री होण्याचा, ती काढून नेण्याचा किंवा तिची विल्हेवाट लागण्याचा धोका आहे तर, त्यास, विश्वस्तास किंवा अशा व्यक्तीस निदेश देता येतील.

[२][विश्वस्तव्यवस्थेच्या योग्य प्रशासनासाठी] निदेश देण्याबाबतचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशांचे पालन करणे हे, प्रत्येक विश्वस्ताचे किंवा अशा व्यक्तीचे कर्तव्य असेल.

[३][ **४१अअ.** (१) त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही लेखात किंवा कोणत्याही करारात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या धर्मादाय आयुक्तांच्या किंवा इतर सक्षम प्राधिकरणाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याचा वार्षिक खर्च पाच लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासन, गरीब वर्गास अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादेपेक्षा, अधिक असेल अशा, राज्य सहाय्यित कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, धर्मादाय आयुक्ताने किंवा राज्य शासनाने, रुग्णालय (कोणतेही शुश्रूषालय, किंवा प्रसूतिगृह यांसह), दवाखाना किंवा वैद्यकीय सहाय्यासाठी असणारे कोणतेही इतर केंद्र (यात यापुढे ज्याचा निर्देश "वैद्यकीय केंद्र" असा करण्यात आला आहे) चालवणा-या अशा कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांस किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तीस पुढीलपैकी सर्व किंवा कोणतेही निर्देश देणे विधिसंगत असेल :—

मोफत किंवा सवलतीच्या दरांनी उपचार करावयाच्या गरीब रुग्णांकरिता विवक्षित खाटा राखून ठेवण्यासाठी रुग्णालये इ. ना. निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्ताचा व राज्य शासनाचा अधिकार.

(अ) उपलब्ध जागा व सुविधा लक्षात घेऊन कोणत्याही व्यक्तीला धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुषभेद, जन्मस्थळ, भाषा या किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव भेदभाव न करता, वैद्यकीय केंद्रातील प्रवेश कोणत्याही व्यक्तीस खुला असेल :

परंतु, एखादे वैद्यकीय केंद्र केवळ महिलांसाठीच असेल त्याबाबतीत, अशा केंद्रात कोणत्याही पुरुषावर उपचार करण्याची सक्ती केली जाणार नाही ;

(ब) ज्यांची यथास्थिती वैद्यकीयदृष्ट्या विनामूल्य तपासणी करण्यात येईल आणि ज्यांच्यावर उपचार करण्यात येतील व ज्यांना रुग्णालयात दाखल करून घेण्यात येईल अशा दाखल होऊ इच्छिणा-या किंवा उपचार घेऊ इच्छिणा-या निर्धन रुग्णांसाठी निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्राच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रांवर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांच्या एकूण संख्येच्या १० टक्के आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे आणि राखून ठेवणे.

(क) राज्य शासन आपल्याकडून चालविण्यात येणा-या तत्सम वैद्यकीय केंद्रावर आकारलेले दर विचारात घेऊन वेळोवेळी सामान्य किंवा विशेष आदेशांद्वारे ठरवील असे दर ज्यांना आकारण्यात येतील आणि वैद्यकीय तपासणी करण्यासाठी आणि उपचार करून घेण्यासाठी रुग्णालयात प्रवेश घेऊ इच्छिणा-या अशा समाजातील दुर्बल घटकांतील लोकांसाठी, निदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने वैद्यकीय केंद्राच्या प्रत्येक विभागात वैद्यकीय तपासणी आणि उपचार यासाठी अशा वैद्यकीय केंद्रावर उपचार करण्यात यावयाच्या रुग्णांसाठीच्या खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आणि वापरातील खाटांच्या एकूण संख्येच्या १० टक्के खाटा आरक्षित ठेवणे व राखून ठेवणे.

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २९ अन्वये कलमे ४१-अ, ४१-ब, ४१-क, ४१-ड व ४१-ई ही समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(ड) निदेशांमध्ये किंवा तद्न्वये काढलेल्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर आनुषंगिक किंवा पूरक आवश्यक गोष्टींचे अनुपालन करणे :

परंतु, वर उल्लेखिलेला कोणतेही निदेश देताना, धर्मादाय आयुक्त, कोणत्याही वैद्यकीय केंद्रावर यापूर्वीच उपलब्ध असलेल्या सोयी विचारात घेईल आणि अशा सोयींची उपलब्धता विचारात घेऊन, जर एखादी सोय खंड (ब) आणि (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या टक्केवारीशी सुसंगत असल्यास तिच्या अधीन राहून, योग्य ते निदेश देईल.

(२) (अ) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशांच्या अंमलबजावणी खात्री करुन घेण्यासाठी, राज्य शासनाने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या अधिका-याने किंवा धर्मादाय आयुक्ताने किंवा त्याने याबाबतीत यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीमार्फत कोणत्याही वैद्यकीय केंद्राला भेटी देणे, त्याचे निरीक्षण करणे आणि त्यांच्याकडून नियतकालिक अथवा अन्य विवरणपत्रे मागविणे हे विधिसंमत असेल.

(ब) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या निदेशांचे पालन करणे आणि खंड (अ) अन्वये अशा निदेशांच्या अंमलबजावणीची पडताळणी करण्यासाठी उक्त अधिका-यास किंवा धर्मादाय आयुक्तास किंवा त्यांच्या प्रतिनिधीस आवश्यक असलेल्या योग्य त्या, सर्व सोयी पुरविणे, उपलब्ध करून देणे आणि सहकार्य देणे आणि त्याखाली गरजांचे अनुपालन करणे हे, अशा केंद्राच्या प्रत्येक विश्वस्ताचे किंवा अशा वैद्यकीय केंद्राशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.

(क) पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या एखाद्या निदेशांच्या संबंधात निर्वचन, अंमलबजावणी किंवा इतर कोणत्याही बाबीसंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी, धर्मादाय आयुक्तांमार्फत राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(३) ज्या शर्तीस अधीन राहून, अशा राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेने पोट-कलम (४) च्या खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही अनुदान, सूट किंवा सवलत, इत्यादिची तरतूद केली असेल किंवा ती तिला अन्यथा मिळाली असेल, अशा शर्तीच्या आधारे राज्य सहाय्यित विश्वस्तव्यवस्थेने ज्या सोयींची तरतूद केली आहे अशा कोणत्याही स्वरूपाच्या वैद्यकीय सोयींना प्रतिकूल होईल अशा त-हेने कलमे (१) व (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे बाधा येणार नाही आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९८४ च्या प्रारंभाच्या दिनांकास अंमलात असलेल्या वैद्यकीय सोयी जरी त्या आरक्षित केलेल्या आणि राखून ठेवलेल्या प्रकाराच्या टक्केवारीपेक्षा अधिक असल्या तरी त्या पूर्वीप्रमाणेच चालू राहतील. १९८५ चा महा. आठ.

(४) या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(अ) " राज्य सहाय्यित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था " म्हणजे, केवळ वैद्यकीय सहाय्यासाठी, असलेली किंवा वैद्यकीय सहाय्य व इतर धर्मादाय प्रयोजनासाठी असलेली आणि जी (कोणतेही शुश्रूषालय किंवा प्रसूतिगृह यांसह) एखादे रुग्णालय, दवाखाना किंवा अन्य एखादे वैद्यकीय उपचार केंद चालवीत असेल आणि जिला—

(एक) राज्य शासनाकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून नाममात्र किंवा सवलतीच्या दराने, एखादी जमीन किंवा इमारत, मालकीहक्काच्या तत्त्वावर किंवा भाडेपट्ट्याने किंवा संमती-नि-परवाना तत्त्वावर मिळालेली आहे ; किंवा

(दोन) राज्य शासनाकडून नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६, याच्या कलम २० किंवा २१ खाली कोणतीही रिकामी जमीन धारण करणे चालू ठेवण्यात सूट किंवा चालू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे, किंवा १९७६ चा ३३.

(तीन) जिला कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनार्थ, विकास नियंत्रण नियम यात भरपूर सवलत किंवा त्यातून सूट दिलेली आहे किंवा ते शिथिल केलेले आहेत ; किंवा

(चार) जिला राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतेही कर्ज किंवा हमी किंवा कोणतेही अनावर्ती सहायक अनुदान किंवा अन्य कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले आहे अथवा कोणतेही आवर्ती सहायक अनुदान किंवा अन्य वित्तीय सहाय्य मिळत आहे ;

अशी विश्वस्तव्यवस्था ;

(ब) " निर्धन व्यक्ती " म्हणजे, तिचे एकूण वार्षिक उत्पन्न तीन हजार सहाशे रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा अन्य मर्यादाहून अधिक नसेल अशी व्यक्ती.

(क) " समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती " म्हणजे, जी निर्धन नाही, परंतु, तिचे उत्पन्न दरसाल पंधरा हजार रुपयांहून किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी, विनिर्दिष्ट करील अशा मर्यादेहून अधिक नसेल अशी व्यक्ती.

(ड) पोट-कलम (१) अन्वये आरक्षित केलेल्या किंवा राखून ठेवलेल्या टक्केवारीतील रुग्ण म्हणून रुग्णाला प्रवेश देण्यापूर्वी किंवा त्यांच्यावर उपचार करण्यापूर्वी, त्याप्रयोजनार्थ ठेवलेल्या नोंदवहीमधील विहित नमुन्यामध्ये, यथोचितरित्या पडताळणी केलेल्या आणि नोंद केलेल्या रुग्णाच्या प्रकाराची नोंद घेणे हे, प्रत्येक वैद्यकीय केंद्राच्या नियामक मंडळाचे (मग त्यास कोणत्याही नावाने संबोधण्यात येत असो) कर्तव्य असेल. जर रुग्णाच्या प्रकाराविषयी वाद निर्माण झाल्यास ते प्रकरण योग्य निदेशांसाठी धर्मादाय आयुक्ताकडून राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(५) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीला नसबंदी शस्त्रक्रिया किंवा नेत्रांतर्गत (इंट्रा ऑक्युलर) शस्त्रक्रिया करून घ्यावयाची आहे किंवा ज्या व्यक्तीला राज्य शासनाने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेली कोणतीही शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचार करून घ्यावयाचे आहेत, अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही रुग्णालयात किंवा अन्य वैद्यकीय उपचार केंद्रात, या कलमान्वये, आरक्षित केलेल्या किंवा वेगळ्या किंवा राखून ठेवलेल्या खाटांसंबंधात दाखल करून घेण्याचा हक्क असणार नाही आणि तिला तशी परवानगी असणार नाही.]

चौकशी चालू करण्याचा अधिकार.

**४१ ब.** (१) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधी हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून लेखी तक्रार आल्यानंतर किंवा धर्मादाय आयुक्तास किंवा धर्मादाय उप-आयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास, स्वतःहून धर्मादाय संस्था किंवा विशिष्ट धर्मादाय संस्था किंवा धर्मादाय संस्थांचा वर्ग यांच्याबाबतीत, एकतर सर्वसाधारणपणे किंवा विशिष्ट प्रयोजनांकरिता चौकशी चालू करता येईल.

(२) पूर्वोक्त अधिका-यांना एकतर स्वतःच चौकशी करता येईल किंवा कलम, ३७, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकृत केलेल्या अधिका-यांकडे अशा चौकशीचे काम सोपविता येईल.

(३) अशा कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनांकरिता, चौकशी करणा-या अधिका-यास, नोटिशीद्वारे, कोणत्याही व्यक्तीस विनिर्दिष्ट वेळी आणि जागी उपस्थित राहण्यास आणि पुरावा सादर करण्यास किंवा चौकशीत विचाराधीन असलेल्या कोणत्याही बाबीशी संबंधित असेल त्या व्यक्तीच्या ताब्यातील किंवा नियंत्रणाखालील दस्तऐवज सादर करण्यास फर्माविता येईल.

(४) अशा कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनाकरिता, शपथेवर साक्ष घेता येईल आणि चौकशी करणा-या व्यक्तीस, त्या प्रयोजनाकरिता भारताचा शपथांबाबत अधिनियम,१८७३ या अन्वये शपथ देता येईल किंवा शपथ देण्याऐवजी त्या व्यक्तीस, ज्या बाबीविषयी तिची तपासणी करण्यात येत असेल त्या बाबीच्या खरेपणाबद्दल गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञाकथन करण्यास आणि त्यावर स्वाक्षरी करण्यास भाग पाडता येईल. १८७३ चा १०.

(५) चौकशीच्या प्रयोजनार्थ, कोणत्याही व्यक्तीस साक्ष देण्यास किंवा दस्तऐवज सादर करण्यास, उपस्थित राहण्यासाठी आवश्यक असलेला खर्च विहित रीतीने देण्यात येईल/आला पाहिजे.

(६) चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी करणारी व्यक्ती (धर्मादाय आयुक्त नसलेल्या), आपला अहवाल, ज्याने अशी चौकशी करण्याचे काम तिच्यावर सोपविले असेल त्या अधिका-यास सादर करेल.

(७) संबंधित प्रदेशाच्या धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त आपला स्वतःचा अहवाल किंवा या कलमान्वये त्याला मिळालेला अहवाल धर्मादाय आयुक्तास सादर करील किंवा आवश्यक असल्यास, त्यास कलम ३८ अन्वये कार्यवाही करता येईल किंवा अहवालाची एक प्रत त्यावरील आपल्या शे-यासह धर्मादाय आयुक्ताकडे पाठविता येईल. धर्मादाय आयुक्ताची जर अशी खात्री होईल की विश्वस्तांविरूद्ध सकृतदर्शनी प्रकरणात तथ्य दिसते तर, त्यास या अधिनियमाच्या तरतुदीन्वये आवश्यक असेल अशी उपाययोजना करता येईल.

(८) या कलमान्वये केलेल्या कोणत्याही चौकशीचे कामकाज, धर्मादाय आयुक्तास स्वतः त्यास योग्य वाटेल अशा कार्यवाहीसाठी मागविता येईल.

धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनाकरिता पैसे, इत्यादी गोळा करणा-या (सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थे-व्यतिरिक्त इतर) व्यक्तींनी असे पैसे, इत्यादी गोळा करण्याबद्दल धर्मादाय आयुक्तास ताबडतोब कळविणे.

**४१ क.** (१) धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनांकरिता, कोणताही पैसा, वर्गणी, देणगी किंवा इतर मालमत्ता गोळा करणारी कोणतीही व्यक्ती (या अधिनियमान्वये नोंदविलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नसलेल्या) अशा वसुलीबद्दल आणि ज्या प्रयोजनाकरिता अशी वसुली करण्यात येत असेल त्या प्रयोजनाबद्दल धर्मादाय आयुक्तास ताबडतोब लेखी कळवील.

(२) अशी माहिती मिळाल्यावर धर्मादाय आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशा शर्तीस अधीन राहून, अशी वसुली चालू ठेवण्यास परवानगी देता येईल किंवा त्या बाबतीतील आपल्या कारणांची लेखी नोंद केल्यानंतर अशा व्यक्तीस अशी वसुली ताबडतोब थांबविण्याबद्दल निदेश देता येईल आणि तिने केलेल्या वसुलीसंबंधातील हिशेब देण्यास अशा व्यक्तीस, भाग पाडता येईल.

(३) धर्मादाय आयुक्ताने पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या निदेशांचे किंवा कोणत्याही आदेशाचे पालन करणे, हे अशा प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य असेल.

विश्वस्तांना निलंबित करणे, काढून टाकणे आणि बडतर्फ करणे.

**४१ ड.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विश्वस्ताने.-

(अ) लेखे, अहवाल किंवा विवरण सादर करण्यास सतत कसूर केली असेल ;

(ब) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये किंवा राज्य शासनाने तद्न्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये, धर्मादाय आयुक्ताने काढलेल्या कोणत्याही कायदेशीर आदेशांची बुद्धिपुरःसर अवज्ञा केली असेल;

(क) आपल्या कर्तव्याकडे सतत दुर्लक्ष केले असेल किंवा कोणतेही दुष्कर्म किंवा अपकार्य किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात विश्वासघात केला असेल;

(ड) तो ज्या विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त असेल त्या विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची त्याने अफरातफर केली असेल किंवा त्या मालमत्तेसंबंधी अनुचित व्यवहार केला असेल; किंवा

(ई) विश्वस्त म्हणून त्याच्या पदाशी विसंगत असेल असे, विश्वस्तव्यवस्थेसंबंधात कोणतेही पद त्याने स्वीकारले असेल;

(फ) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल तो सिद्धापराध ठरला असेल तर, धर्मादाय आयुक्तास, एकतर, विश्वस्ताकडून किंवा विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अर्ज करण्यात आल्यावर, किंवा कलम ४१-ख अन्वये अहवाल मिळाल्यावर किंवा स्वतःहून, त्यास निलंबित करता येईल, काढून टाकता येईल किंवा बडतर्फ करता येईल.

(२) धर्मादाय आयुक्त पोट-कलम (१) अन्वये कार्यवाही करण्याचे ठरवील तेव्हा तो, ज्या विश्वस्ताच्या किंवा व्यक्तीच्याविरूद्ध कार्यवाही करण्याचे योजिले असेल त्या विश्वस्ताविरूद्ध किंवा व्यक्तीविरूद्ध आरोपपत्र तयार करील आणि त्यास अशा आरोपास प्रत्युत्तर देण्याची, त्याच्याविरूद्ध दाखल केलेल्या पुराव्याची छाननी करण्याची आणि आपल्या बाजूने पुरावा दाखल करण्याची संधी देईल. विश्वस्ताच्या निलंबनाच्या, त्यास काढून टाकण्याच्या किंवा त्याच्या बडतर्फीच्या आदेशात, विश्वस्ताविरूद्ध तयार केलेले आरोपपत्र, त्याचे स्पष्टीकरण व प्रत्येक आरोपावरील निष्कर्ष, कारणांसहित नमूद करण्यात येईल.

(३) विश्वस्ताविरूद्ध तयार केलेले आरोपपत्र निकालात काढेपर्यंत, धर्मादाय आयुक्तास विश्वस्ताला निलंबनाधीन ठेवता येईल.

(४) धर्मादाय आयुक्ताने, कोणत्याही विश्वस्ताला निलंबित करणारा, काढून टाकणारा किंवा बडतर्फ करणारा आदेश दिला असेल आणि असा विश्वस्त हा एकमेव विश्वस्त असेल किंवा एकापेक्षा जास्त विश्वस्त असतील आणि विश्वस्तव्यवस्थेच्या लेखानुसार, उर्वरित विश्वस्तांना, रिकामी झालेली जागा भरण्यात आल्याशिवाय काम करणे शक्य नसेल किंवा ते विश्वस्तव्यवस्थेचा कारभार पाहू शकत नसतील अशा बाबतीत, धर्मादाय आयुक्त विश्वस्तव्यवस्थेसंबंधातील कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यासाठी योग्य अशा व्यक्तीची नियुक्ती करील आणि अशा व्यक्तीने, विश्वस्तव्यवस्थेच्या लेखाच्या तरतुदींनुसार, एखाद्या विश्वस्ताची यथोचितरीत्या नियुक्ती करण्यात येईपर्यंतच केवळ पद धारण करील.

(५) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या विश्वस्तास, निलंबनाचा, काढून टाकल्याचा किंवा बडतर्फीचा आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, अशा आदेशाविरूद्ध न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

(६) पोट-कलम (५) खालील न्यायालयाच्या निर्णयाविरूद्ध, जणू असा निर्णय ज्याविरूद्ध सामान्यतः अपील सादर करता येते असा हुकूमनामा होता असे समजून, उच्च न्यायालयाकडे अपील सादर करता येईल.

(७) धर्मादाय आयुक्ताचा आदेश हा, न्यायालयाच्या कोणत्याही किंवा अपिलातील कोणत्याही आदेशास अधीन राहून अंतिम असेल.

**४१ ई.** (१) धर्मादाय उप-आयुक्ताच्या किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या अहवालावरून, किंवा हितसंबंध असलेल्या निदान दोन व्यक्तींनी, प्रतिज्ञालेखाद्वारे पुष्टी दिलेल्या अर्जाद्वारे,– धर्मादाय संपत्तीच्या रक्षणार्थ कार्य करण्याचा अधिकार.

(अ) कोणत्याही विश्वस्ताकडून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडून, विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही मालमत्तेचा अपव्यय होण्याचा, तिचे नुकसान होण्याचा, किंवा अनुचितरित्या ती अन्यसंक्रामित होण्याचा धोका आहे, किंवा

(ब) असा विश्वस्त किंवा अशी व्यक्ती ती काढून नेण्याची किंवा तिची विल्हेवाट लावण्याची धमकी देत आहे किंवा मालमत्ता हलविण्याचा किंवा तिची विल्हेवाट लावण्याचा तिचा हेतू आहे,

असे धर्मादाय आयुक्ताच्या नजरेस आणून दिल्यास, त्यास, आदेशाद्वारे तात्पुरता मनाईहुकूम देता येईल किंवा अशा मालमत्तेचा अपव्यय, तिची नुकसानी, तिचे अन्यसंक्रामण, विक्री, ती (मालमत्ता) काढून नेणे किंवा तिची विल्हेवाट लावणे या गोष्टी स्थगित करण्याच्या व त्यास प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनार्थ, मनाई हुकूमाची मुदत, हिशेब ठेवणे, तारण देणे, मालमत्ता सादर करणे किंवा अन्य गोष्टीसंबंधी त्यास योग्य वाटतील अशा अटींवर इतर आदेश देता येईल.

(२) अशा सर्व प्रकरणी धर्मादाय आयुक्त, मनाईहुकूम देण्यापूर्वी, त्याच्या निदर्शनास आणून दिलेल्या गोष्टीसंबंधीची नोटीस विश्वस्तास किंवा संबंधित व्यक्तीस देईल. मात्र विलंबामुळे मनाईहुकूमाचे उद्दिष्ट निष्फळ होईल असे आढळून आल्यास अशी नोटीस देण्याची आवश्कता नाही.

(३) विश्वस्त किंवा संबंधित व्यक्ती यांचे म्हणणे ऐकूण घेतल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, धर्मादाय आयुक्तास, मनाईहुकूम कायम करता येईल, तो काढून टाकता येईल किंवा त्यात बदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल किंवा इतर कोणताही समुचित आदेश देता येईल.

(४) कोणत्याही मनाई हुकूमाचा किंवा त्यातील कोणत्याही अटींचा किंवा या कलमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचा भंग झाल्यास किंवा त्या न पाळल्यास, धर्मादाय आयुक्तास, न्यायालयाकडे अर्ज करता येईल. धर्मादाय आयुक्त आणि बाधित पक्षकार यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयास, अशा भंगाबद्दल किंवा अवज्ञेबद्दल दोषी असलेल्या अशा व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्याचा आणि त्याचप्रमाणे अशा व्यक्तीस, सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता, तुरुंगामध्ये अटकावून ठेवण्याचा आदेश देता येईल. या पोट-कलमाखाली कोणतीही जप्ती एका वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी अंमलात राहणार नाही आणि असा कालावधी संपल्यानंतर अशा आदेशाचा भंग किंवा अवज्ञा करणे चालू राहिल्यास, जप्त केलेली मालमत्ता विकता येईल आणि न्यायालयास, त्यास योग्य वाटेल अशी भरपाई त्या उत्पादनातून देता येईल आणि शिल्लक रक्कम राहिल्यास ती, ती मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीस न्यायालयाने दिली पाहिजे आणि त्यानंतर, धर्मादाय आयुक्ताने या कलमान्वये दिलेला तात्पुरता मनाईहुकूम किंवा दिलेला कोणताही आदेश, अंमलात असेल तर, तो विलोपित किंवा रद्द होईल.

(५) या कलमान्वये ज्या विश्वस्ताच्या किंवा व्यक्तीच्याविरूद्ध मनाईहुकूम किंवा इतर कोणताही आदेश काढण्यात आला असेल, त्यास, किंवा तिला, असा आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, अशा आदेशाविरूद्ध, न्यायालयाकडे अपील करता येईल.

(६) अशा व्यक्तीची मालमत्ता जप्त करण्यासंबंधीचा किंवा अशा व्यक्तीस दिवाणी तुरूंगात ठेवण्यासंबंधीचा न्यायालयाचा आदेश हा, ज्याविरूद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करता येते असा हुकूमनामा असेल.

(७) धर्मादाय आयुक्ताचा आदेश न्यायालयाच्या किंवा अपीलातील कोणत्याही आदेशास अधीन राहून अंतिम असेल.]

## प्रकरण सात

### धर्मादाय आयुक्ताची इतर कामे व अधिकार

धर्मादाय आयुक्त हा एक निगम असणे.

**४२.** [१][प्रत्येक धर्मादाय आयुक्त] हा एक निगम असेल, त्याची एक अखंड परंपरा असेल आणि त्याचा एक सामाईक शिक्का असेल ; त्याच्या संस्थापित नावाने, त्यास दावा लावता येईल तसेच त्याच्यावर दावा लावता येईल.

---

[१] " चॅरिटी कमिश्नर " या मजकुराऐवजी मुंबई धर्मादाय आयुक्त (प्रादेशिक पुनर्रचना) आदेश, १९६० याच्या अनुसूचीअन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][४३. [२][१] [३][* * * *] सन १८९० चा अधिनियम ६ या अन्वये महाराष्ट्र धर्मादाय आयुक्त हा धर्मादाय दाननिधीचा कोषाध्यक्ष असणे.

[२][(२) धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९०, यात काहीही अंतर्भूत असले तरी, धर्मादाय आयुक्तास पुढील अधिकार असतील :— १८९० चा ६.

(अ) कलम ५०-क अन्वये राज्य शासनाचे आणि प्रशासकाचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० अन्वये स्थापन केलेल्या कोणत्याही धर्मादाय दाननिधीच्या प्रशासनासंबंधीच्या योजनेमध्ये फेरफार करणे किंवा त्या योजनेऐवजी दुसरी योजना तयार करणे ; १८९० चा ६.

(ब) कलम ३७ खालील अधिकारांचा वापर करणे ; आणि

(क) दाननिधीचे प्रशासन योग्यरित्या होत नसेल तर, प्रशासकाचे म्हणणे एकूण घेऊन आणि राज्य शासनाशी विचार-विनिमय करून, प्रशासक बदलणे.].]

**४४.** [धर्मादाय आयुक्त सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांचा विश्वस्त म्हणून काम करून शकेल] हे कलम सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम २० याच्या कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.

**४५.** [दात्यास, त्याने केलेल्या व्यवस्थेचा विश्वस्त, म्हणून धर्मादाय आयुक्ताची त्याच्या संमतीने नियुक्ती करता येईल] हे कलम १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम २० याच्या कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.

**४६.** [धर्मादाय आयुक्ताची मृत्युपत्रान्वये विश्वस्त म्हणून नियुक्ती] हे कलम सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम २० याच्या कलम ३१ अन्वये वगळण्यात आले.

विश्वस्ताची नियुक्ती करणे, त्यास निलंबित करणे, काढून टाकणे, किंवा मुक्त करणे आणि मालमत्ता नवीन विश्वस्ताकडे निहित करणे याविषयीचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

[४][**४७.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा विश्वस्तव्यवस्थेसाठी कोणताही विश्वस्त नसेल किंवा रिकामे पद भरण्यात येईपर्यंत विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालू ठेवणे शक्य नसेल त्याबाबतीत नवीन विश्वस्ताच्या नियुक्तीसाठी किंवा जर अशा विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त,—

(अ) हक्क सोडली अथवा मृत्यू पावेल ;

(ब) धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी, याच्या परवानगीखेरीज, सतत ६ महिन्यांच्या कालावधीकरिता भारताबाहेर असेल ;

---

[१] मुंबई धर्मादाय स्थायीदान कोषाध्यक्ष (पुनर्रचना) आदेश, १९६२ या अन्वये कलम ४३ दाखल करण्यात आले.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३० अन्वये कलम ४३ ला त्याच कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३० अन्वये कलम ४३ ला त्याच कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ चे कलम ३ पुढीलप्रमाणे आहे :—

१९९० चा अधिनियम ६ अन्वये धर्मादाय आयुक्त हा, धर्मादाय स्थायीदानांचा कोषाध्यक्ष असण्याचे बंद होणे ; सन १९५० चा मुंबई अधिनियम २९ याच्या कलम ४३ ची सुधारणा.

१९७५ महा. ३२. "[१] मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभानंतर धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र हा महाराष्ट्र राज्याच्या ज्या भागास मुख्य अधिनियम लागू आहे त्या भागात धर्मादाय दाननिधींचा कोषाध्यक्ष असण्याचे बंद होईल आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये धर्मादाय दाननिधींचा कोषाध्यक्ष म्हणून धर्मादाय आयुक्ताकडे जी मालमत्ता निहित असेल ती त्याच्याकडे निहित असण्याचे बंद होईल आणि ती धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० अन्वये नेमलेल्या धर्मादाय दाननिधीच्या कोषाध्यक्षाकडे निहित होईल आणि त्यानुसार मुख्य अधिनियमाचे कलम ४३, पोट-कलम (१) वगळलेले असेल." १८९० चा ६.

[४] कलम ४७ हे सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३२ अन्वये मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

(क) परदेशात राहण्याच्या प्रयोजनार्थ, भारत सोडून जाईल ;

(ड) नादार म्हणून घोषित करण्यात आला असेल ;

(ई) विश्वस्तव्यवस्थेकडून मुक्त होण्याची त्याची इच्छा असेल ;

(फ) विश्वस्त म्हणून कार्य करण्यास नकार देईल ;

(ग) धर्मादाय आयुक्ताच्या मते, तो अयोग्य ठरेल किंवा विश्वस्तव्यवस्थेमध्ये कार्य करण्यास शारीरिकदृष्ट्या असमर्थ होईल किंवा विश्वस्त म्हणून असलेल्या त्याच्या दर्जाशी विसंगत असेल असे कोणतेही पद स्वीकारील ;

(ह) प्रकरण ३ मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही बाबतीत, तो विश्वस्तव्यवस्थेचा कारभार चालविण्यासाठी उपलब्ध नसेल ; किंवा

(आय) या अधिनियमान्वये शिक्षा पात्र असेल अशा गुन्ह्याबद्दल किंवा ज्यात अधोगतीचा अंतर्भाव होईल अशा अपराधाबद्दल सिद्धापराध ठरला असेल ;

तर, त्या विश्वस्तास, निलंबित करण्यासाठी, त्यास काढून टाकण्यासाठी किंवा कार्यमुक्त करण्यासाठी धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करता येईल.

(२) धर्मादाय आयुक्तास, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीची विश्वस्त म्हणून नियुक्ती करता येईल किंवा पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणासाठी कोणत्याही विश्वस्तास काढून टाकता येईल किंवा त्यास कार्यमुक्त करता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये विश्वस्ताची नियुक्ती करताना धर्मादाय आयुक्त, पुढील गोष्टी विचारात घेईल,–

(अ) त्या विश्वस्तव्यवस्थेच्या कर्त्याची इच्छा ;

(ब) नवीन विश्वस्ताची नियुक्ती करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्ती असतील तर त्यांच्या इच्छा ;

(क) या नियुक्तीमुळे विश्वस्तव्यवस्थेच्या अंमलबजावणीचे काम पुढे चालू राहील किंवा त्यास व्यत्यय येईल किंवा कसे हा प्रश्न ;

(ड) ज्यांचा विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असेल त्या लोकांचा किंवा त्याच्या एखाद्या वर्गाचा हितसंबंध आणि ;

(ई) विश्वस्तव्यवस्थेची रूढी आणि परिपाठ.

(४) पोट-कलम (२) अन्वये नवीन विश्वस्ताच्या नियुक्तीचा आदेश काढल्यानंतर त्याच आदेशाद्वारे किंवा त्यानंतरच्या कोणत्याही आदेशाद्वारे, विश्वस्तव्यवस्थेच्या अधीन असलेली कोणतीही मालमत्ता, अशा प्रकारे नियुक्त केलेल्या व्यक्तीकडे निहित होईल असा निदेश धर्मादाय आयुक्ताने देणे हे कायदेशीर असेल आणि त्यानंतर ती त्या प्रकारे निहित होईल.

(५) धर्मादाय आयुक्ताचा पोट-कलम (२) खालील आदेश हा, न्यायालयाचा हुकूमनामा असल्याचा मानण्यात येईल आणि त्याविरूद्ध उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल.]

४७ अअ, ४७ अ, ४७ ब, ४८ आणि ४९ ही कलमे सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३३ अन्वये वगळण्यात आली.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा विश्वस्त किंवा इतर यांच्याकडून किंवा त्यांच्याविरुद्ध किंवा त्यांच्याशी संबंधित दावे.

[१] [**५०.** कोणत्याही बाबतीत—

(एक) जर एखाद्या विश्वस्ताकडून किंवा विश्वस्तांकडून सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा भंग झाला आहे किंवा त्याने किंवा त्यांनी हयगय किंवा अपयोजन किंवा गैरवर्तणूक केली आहे असे म्हणणे असेल ;

(दोन) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या किंवा मालकीची म्हणून सांगण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा परत मिळविण्यासाठी किंवा तिचा पाठपुरावा करण्यासाठी किंवा तिचे उत्पन्न वसूल करण्यासाठी किंवा विश्वस्त, माजी विश्वस्त, अन्यसंक्रामिती, अपप्रवेशी किंवा भाडेकरी किंवा लायसन्सधारी नसेल अशी, त्या विश्वस्तव्यवस्थेत प्रतिकूल रीतीने कब्जा धारण करणारी एखादी व्यक्ती धरून, इतर कोणतीही व्यक्ती यांच्याकडून अशा मालमत्तेचा किंवा तिच्या उत्पन्नाचा हिशेब मागणे याकरिता निदेश किंवा हुकूमनामा आवश्यक असेल त्याबाबतीत ;

(तीन) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कारभारासाठी न्यायालयाचा निदेश आवश्यक असल्याचे मानण्यात येईल त्याबाबतीत किंवा ;

(चार) एखाद्या सार्वजनिक विश्वस्तव्यवथेच्या किंवा तिच्या विश्वस्ताच्या किंवा विश्वस्तांच्या किंवा हिताधिका-यांच्या बाजूने किंवा त्यांच्याविरुद्ध कोणत्याही अधिकार घोषणेसाठी किंवा मनाई हुकुमासाठी असेल तेव्हा ;

धर्मादाय आयुक्तास, त्याला आवश्यक वाटेल अशा चौकशी केल्यानंतर, किंवा उप-खंड (एक) ते (तीन) अन्वये दावा दाखल केला असेल त्याबाबतीत, हितसंबंध असलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींना किंवा उप-खंड (चार) अन्वये दावा दाखल केला असेल त्या बाबतीत कलम ५१ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे धर्मादाय आयुक्तांची लेखी संमती मिळविल्यानंतर, अशा एका किंवा अधिक व्यक्तींना खालीलपैकी कोणतीही दाद मिळविण्याकरिता हुकूमनामा मिळविण्यासाठी, विश्वस्तव्यवस्थेचीं संपूर्ण विषयवस्तु किंवा तिचा भाग ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत येत असेल अशा न्यायालयात दावा दाखल करता येईल मग असा दावा विवादात्मक असो अगर नसो—

(अ) अशी मालमत्ता किंवा तिचे उत्पन्न यांचा ताबा परत मिळविण्यासाठी आदेश ;

(ब) कोणत्याही विश्वस्तास किंवा व्यवस्थापकास काढून टाकणे ;

(क) नवीन विश्वस्ताची किंवा व्यवस्थापकाची नियुक्ती ;

(ड) कोणतीही मालमत्ता विश्वस्ताकडे निहित करणे ;

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक. २० याच्या कलम ३४ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५० हे कलम दाखल करण्यात आले.

(ई) हिशेब घेण्यासाठी व विवक्षित चौकशी करण्यासाठी निदेश ;

(फ) विश्वस्त किंवा इतर व्यक्ती यांनी विश्वासघात केल्यामुळे, हयगय केल्यामुळे, उपयोजन केल्यामुळे, त्यांच्या गैरवर्तणुकीमुळे किंवा बुद्धिपुरःस्सर कसूर केल्यामुळे विश्वस्तव्यवस्थेची झालेली हानी त्या विश्वस्ताने किंवा इतर व्यक्तींनी भरून देण्याबद्दल त्यांना निदेश देणारा आदेश काढणे ;

(ग) विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विशिष्ट उद्दिष्टासाठी विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचा किंवा तीमधील हितसंबंधाचा कोणता भाग देण्यात यावा याविषयीची घोषणा ;

(ह) या कलमात उल्लेखिलेल्या कोणत्याही इतर सहाय्याबरोबरच या सहाय्याची मागणी केलेली असेल तर, शक्यतो कलम ५६ च्या धर्तीवर विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा तिचे उत्पन्न सदृश्य हेतूप्रित्यर्थ लागू करण्यासाठी निदेश ;

(आय) न्यायालयास आवश्यक वाटेल अशा अटीवर व शर्तीवर, विश्वस्तव्यवस्थेची संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग, भाड्याने देण्यासाठी, विकण्यासाठी, गहाण ठेवण्यासाठी किंवा तिची अदलाबदल करण्यासाठी किंवा कोणत्याही रीतीने ती अन्यसंक्रामित करण्यासाठी प्राधिकृत करणारा निदेश ;

(ज) योजना निश्चित करणे किंवा पूर्वीच निश्चित केलेल्या योजनेमध्ये बदल किंवा फेरफार करणे.

(के) दोन किंवा अधिक विश्वस्तव्यवस्थांसाठी एक सामाईक योजना तयार करून त्यांचे एकत्रीकरण करण्यासाठी आदेश ;

(ल) कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेचे समापन करण्यासाठी आणि तिचा निधी इतर धर्मादाय प्रयोजनासाठी वापरण्याकरिता आदेश ;

(म) एखादी विश्वस्तव्यवस्था दुस-या एखाद्या विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताकडे सोपविण्यासाठी व अशा विश्वस्तव्यवस्थेची नोंदणी रद्द करण्यासाठी आदेश ;

(न) तांत्रिक उल्लंघन इत्यादीबद्दल विश्वस्तांना दोषमुक्त करण्यासाठी आदेश ;

(ओ) विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही लेखामध्ये बदल करण्याचा, त्यात फेरफार करण्याचा त्यात सुधारणा करण्याचा किंवा त्याचे अधिक्रमण करण्याचा आदेश ;

(प) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या किंवा तिच्या विश्वस्ताच्या किंवा विश्वस्तांच्या किंवा तिच्या हिताधिका-याच्या बाजूने किंवा विरूद्ध असा कोणताही अधिकार असल्याचे जाहीर करणे किंवा तो नाकारणे आणि समुचित प्रकरणात मनाई हुकूम देणे, किंवा ;

(क्यू) त्या-त्या प्रकरणाच्या स्वरूपानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, जे इतर कोणतेही सहाय्य पूर्वोक्त सहाय्यापैकी कोणत्याही सहाय्यांसाठी, पूर्वशर्त असेल किंवा त्याच्या परिणामस्वरूप असेल किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या हिताच्यादृष्टीने आवश्यक असेल, असे इतर कोणतेही सहाय्य मिळवून देणे :

परंतु असे की, या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबीपैकी कोणत्याही बाबीची मागणी करणारा कोणताही दावा, त्या कलमाच्या तरतुदींशी अनुरूप असल्याखेरीज, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात दाखल करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, धर्मादाय आयुक्तास दावा दाखल करण्याऐवजी, पूर्वीच निश्चित केलेल्या योजनेमध्ये बदल किंवा फेरफार करण्यासाठी न्यायालयाकडे अर्ज करता येईल :

परंतु आणखी असे की, या कलमाच्या तरतुदी आणि इतर परिणामरूप तरतुदी सर्व सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांना लागू होतील—मग त्या नोंदलेल्या असोत किंवा नसोत—किंवा कलम १, पोट-कलम (४) अन्वये या अधिनियमाच्या तरतुदींपासून त्यांना सूट देण्यात आलेली असो व नसो ;]

[1] [**५० अ.** (१) कलम ५० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, धर्मादाय आयुक्तास सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या उचित व्यवस्थापनासाठी किंवा तिच्या उचित कारभारासाठी, एक योजना निश्चित करण्यात येईल असे सकारण वाटेल, किंवा एखाद्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असणा-या दोन किंवा अधिक व्यक्तींनी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या उचित व्यवस्थापनासाठी किंवा तिच्या उचित कारभारासाठी एक योजना निश्चित करावी म्हणून त्याजकडे, विहित केलेल्या रीतीने, लेखी अर्ज केला असेल त्याबाबतीत, धर्मादाय आयुक्तास अशा विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे याबद्दल त्यांची खात्री होईल तर, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या व्यवस्थापनासाठी किंवा कारभारासाठी एक योजना तयार करता येईल.

योजना तयार करण्याचा, तिचे एकत्रीकरण करण्याचा किंवा तीत फेरबदल करण्याचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

(२) उचित व्यवस्थापनासाठी किंवा कारभारासाठी, दोन किंवा अधिक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांसाठी एक सामाईक योजना तयार करून, त्यांचे एकत्रीकरण करता येईल असे धर्मादाय आयुक्ताचे मत होईल तर, त्यास—

(अ) राजपत्रात आणि तसेच आवश्यक असल्यास विश्वस्तव्यवस्थेची ज्या विभागात नोंदणी करण्यात आली असेल त्या विभागात मोठ्या प्रमाणात खप असलेल्या [2][ज्या कोणत्याही वर्तमानपत्रामुळे, धर्मादाय आयुक्ताच्या मते, विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असण्याचा संभव असलेल्या व्यक्तीच्या निदर्शनास येण्याची सर्वात जास्त शक्यता असेल अशा वर्तमानापत्रात] नोटीस प्रसिद्ध करून, आणि

(ब) अशा विश्वस्तव्यवस्थांचे विश्वस्त आणि हितसंबंध असलेल्या इतर सर्व व्यक्ती यांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन,

त्या विश्वस्तव्यवस्थांसाठी एक सामाईक योजना तयार करता येईल.

(३) धर्मादाय आयुक्तास, कोणत्याही वेळी विश्वस्तांची बाजू ऐकून घेतल्यानंतर, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये त्याने तयार केलेल्या योजनेत फेरबदल करता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये तयार केलेली किंवा पोट-कलम (३) अन्वये फेरबदल करण्यात आलेली योजना ही, सक्षम न्यायालयाच्या कलम ७२ खालील निर्णयास अधीन राहून, न्यायालयाच्या कलम ५० खालील हुकूमनाम्यान्वये निश्चित केलेल्या किंवा बदल केलेल्या योजनेप्रमाणे अंमलात येईल.]

**५१.** (१) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तींचा कलम ५० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरुपाचा दावा दाखल करण्याचा इरादा असेल तर, त्या व्यक्ती धर्मादाय आयुक्ताची संमती मिळविण्यासाठी त्यांच्याकडे लेखी अर्ज करतील. [3][पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी चौकशी (तशी चौकशी करावी लागल्यास) केल्यानंतर, त्या प्रकरणात प्रथम दर्शनी तथ्य आहे अशी जर धर्मादाय आयुक्तांची खात्री झाली तर त्यास] अर्ज केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या मुदतीत, असा दावा दाखल करण्यासाठी आपली संमती देता येईल किंवा ती देण्याचे नाकारता येईल. ज्या आदेशाद्वारे संमती देण्याचे नाकारण्यात आले असेल असा धर्मादाय आयुक्तांचा आदेश लेखी असला पाहिजे आणि नकार दिल्याबद्दलची कारणे त्यात नमूद केलेली असली पाहिजेत.

दावा दाखल करण्याकरिता धर्मादाय आयुक्ताची संमती.

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २७ अन्वये हे कलम जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३५ अन्वये "(एक इंग्रजी भाषेत व त्या विभागाच्या इतर भाषेतील) अशा किमान दोन वर्तमानपत्रात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये "चॅरिटी कमिशनरास, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर व त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

(२) धर्मादाय आयुक्त पोट-कलम (१) अन्वये दावा दाखल करण्यास आपली संमती देण्याचे नाकारील तर, अशी संमती मिळविण्याकरिता अर्ज करणा-या व्यक्तीस, [1][विभागीय आयुक्ताकडे ] या अधिनियमान्वये तरतूद केलेल्या रीतीने, अपील करता येईल.

(३) कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी कलम ५० अन्वये दाखल केलेल्या प्रत्येक दाव्यात धर्मादाय आयुक्त हा एक आवश्यक पक्षकार असेल.

(४) कलम ७१ खालील अपिलातील [2][ विभागीय आयुक्ताच्या ] निर्णयास अधीन राहून, धर्मादाय आयुक्ताकडे पोट-कलम (१) खाली दिलेला निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल.

दिवाणी प्रक्रिया संहितेची कलमे ९२ व ९३ ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत लागू नसणे.

**५२.** (१) [3][ (१) ] दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त संहितेतील कलमे ९२ व ९३ यांच्या तरतुदी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत लागू होणार नाहीत. १९०८ चा ५.

[4][ [5][ (२) ] जर ] कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवथेस हा अधिनियम लागू करण्यात आल्याच्या दिनांकास [6][ सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही दिवाणी न्यायालयासमोर ] अशा विश्वस्तव्यवस्थेसंबंधी कोणतीही, न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित असेल आणि जर महाअधिवक्ता किंवा महाअधिवक्त्याच्या अधिकारांचा वापर करणारा जिल्हाधिकारी हा त्यातील एक पक्षकार असेल तर, त्या कार्यवाहीत महाअधिवक्ता, किंवा यथास्थिति, जिल्हाधिकारी यांच्याऐवजी धर्मादाय आयुक्त हा पक्षकार असल्याचे मानण्यात येईल आणि अशी कार्यवाही अशा न्यायालयाकडून निकालात काढण्यात येईल.]

[7][ (३) उक्त तारखेपूर्वी किंवा त्यानंतर सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही लेखात किंवा योजनेत, आदेशात किंवा हुकूमनाम्यात महाअधिवक्त्यासंबंधीचा कोणताही निर्देश हा धर्मादाय आयुक्तासंबंधीचा निर्देश असल्याप्रमाणे त्यांचा अन्वयार्थ लावण्यात येईल.]

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम १४ (१) अन्वये " मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७ या अन्वये रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] " महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १० (१) अन्वये कलम ५२ ला त्याच कलमाचे पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[4] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, कलम १३ अन्वये या भागाची भर घालण्यात आली.

[5] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १० (१) अन्वये " परंतु जर " या मजकुराऐवजी " (२) जर " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियम कलम १० (२) अन्वये " उच्च न्यायालयामधील कोणतेही न्यायालय " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियम कलम १० (३) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

१९०८ चा ९. [1][ **५२-अ.** भारतीय मुदत अधिनियम, १९०८ यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची ह्या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आली असेल किंवा नोंदणी झाल्याचे मानण्यात येत असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या किंमती मोबदल्यासाठी अभिहस्तांकितीवर त्याच्या हाती असलेल्या अशा मालमत्तेचा किंवा तिच्या उत्पन्नाचा छडा लावण्यासाठी किंवा अशा मालमत्तेचा किंवा तिच्या उत्पन्नाचा हिशेब मिळविण्यासाठी करण्यात आलेला कोणताही दावा मुदतबाह्य ठरणार नाही.]

किंमती मोबदल्यासाठी अभिहस्तांकितीवर केलेला दावा मुदतबाह्य न होणे.

**५३.** (१) जेव्हा कोणत्याही मृत्युपत्रान्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसाठी देणगी देण्यात आली असेल किंवा जेव्हा अशा देणगीमुळेच सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण होत असेल तेव्हा ज्या प्रदेशात किंवा उप-प्रदेशात [2][अशा विश्वस्तव्यवस्थेची ] नोंदणी करण्यात आली असती किंवा तिची नोंदणी करणे आवश्यक असेल त्या प्रदेशाच्या किंवा उप-प्रदेशाच्या धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे त्याची एक प्रत पाठविणे हे मृत्युपत्रान्वये नेमलेल्या मृत्युपत्र व्यवस्थापकाचे कर्तव्य असेल.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या फायद्यासाठी मृत्युपत्रान्वये दिलेली देणगी.

(२) मृत्युपत्राची एक प्रत पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे पाठविण्यात आल्याविषयी न्यायालयाची खात्री झाल्याशिवाय, अशा कोणत्याही न्यायालयाने असे मृत्युपत्र जोडलेले असे कोणतेही मृत्यूपत्राप्रमाणे किंवा प्रबंधपत्र देता कामा नये.

**५४.** (१) जेव्हा कोणत्याही धंद्यातील किंवा व्यापारातील रूढीनुसार किंवा परिपाठानुसार किंवा कोणत्याही व्यवहाराशी संबंधित असलेल्या उभय पक्षांमध्ये करारानुसार, धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनार्थ वापरावयाच्या उद्देशाने कोणतीही रक्कम उक्त व्यवहाराच्या कोणत्याही पक्षकारावर आकारण्यात आली असेल किंवा कोणत्याही नावाखाली गोळा करण्यात आली असेल तेव्हा, अशाप्रकारे आकारलेली किंवा गोळा केलेली रक्कम [3][ (तिला ह्या अधिनियमांत "धर्मादा" असे म्हटले आहे) ] ज्या व्यक्तीने ती आकारली किंवा गोळा केली असेल त्या व्यक्तीकडे विश्वस्त या नात्याने निहित होईल. धर्मादा.

(२) अशा रकमा आकारणारी किंवा गोळा करणारी कोणतीही व्यक्ती, ज्या वर्षांकरिता साधारणपणे तिचे लेखे् ठेवण्यात येतात त्या वर्षाच्या समाप्तीपासून तीन महिन्यांच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यांत, धर्मादाय उप-आयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास लेखा सादर करील.

(३) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास, त्यास सादर केलेल्या लेख्याचा बिनचूकपणा पडताळून पाहण्याकरिता, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी करण्याचा अधिकार असेल आणि त्यास विहित केलेल्या रीतीने रकमेचा विनियोग करण्यासंबंधी आदेश देता येईल.

[4][ (४) प्रकरण ४ च्या तरतुदी धर्मादास लागू असणार नाहीत. ]

---

[1] सन १९५५ चा मुंबई अधिनियम, क्रमांक २३, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ११ अन्वये "अशा मृत्युपत्राची" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, कलम १४ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १४ (२) अन्वये या मजकुराची भर घालण्यात आली.

सदृश हेतू.

**५५.** (१) [१][ धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करण्यात आला असता किंवा अन्यथा जर ] धर्मादाय आयुक्ताचे असे मत होईल की—

(अ) ज्या उद्देशासाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण केली होती तो मूळ उद्देश निष्फळ झाला आहे,

(ब) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न किंवा कोणतीही अतिरिक्त शिल्लक रक्कम वावरण्यात आलेले नाही किंवा ती वापरली जाण्याचा संभव नाही,

(क) [२][धार्मिक प्रयोजनासाठी निर्माण केलेल्या विश्वस्तव्यवस्थेव्यतिरिक्त इतर सार्वजनिक विशवस्तव्यवस्थेच्या बाबतीत, सार्वजनिक हिताच्यादृष्टीने ] सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण करणा-या व्यक्तीचा मूळ हेतू किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या उद्देशाने निर्माण करण्यात आली होती तो उद्देश सर्वस्वी किंवा अंशतः पार पाडणे इष्ट, व्यवहार्य, वांच्छनीय, आवश्यक किंवा योग्य नसेल आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा उत्पन्न किंवा त्याचा कोणताही भाग इतर कोणताही धर्मादाय किंवा [३][ धार्मिक उद्देशासाठी उपयोगात आणणे इष्ट असेल, किंवा ]

(ड) कलमे १० ते १३ यात नमूद केलेल्या कोणत्याही बाबतीत किंवा कलम ५४ अन्वये विश्वस्त म्हणून धारण केलेल्या धर्मादाय रकमांच्या विनियोजनासंबंधी न्यायालयाचे निदेश आवश्यक आहेत ;

तर धर्मादाय आयुक्त [४][ उक्त विश्वस्तव्यवस्थेचा विषय असलेली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा भाग ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत असेल त्या न्यायालयाकडे, निदेशांसाठी विहित केलेल्या मुदतीत अर्ज करण्यास विश्वस्तांना फर्माविल. [५][ आणि विश्वस्त अशा रीतीने फर्माविण्यात आलेल्या गोष्टीचे पालन करील.]

(२) पोट-कलम (१) अन्वये फर्माविण्यात आल्याप्रमाणे अर्ज करण्यात विश्वस्त कसूर करतील किंवा धर्मादाय आयुक्त स्वतःच विश्वस्त असेल किंवा सार्वजनिक विशवस्तव्यवस्थेसाठी कोणीही विश्वस्त नसेल तर, धर्मादाय आयुक्त न्यायालयाकडे अर्ज करील.

अर्जाची सुनावणी करण्याचा न्यायालयाचा अधिकार.

**५६.** (१) असा अर्ज करण्यात आल्यानंतर न्यायालय पक्षकारांचे [६][ आणि धर्मादाय आयुक्ताचे ] म्हणणे ऐकून घेऊन व चौकशी करून, उक्त बाबीवर निर्णय देईल व निदेश देईल. निदेश देताना न्यायालय सार्वजनिक हिताच्यादृष्टीने जेथवर इष्ट, व्यवहार्य, वांच्छनीय [७][ आवश्यक किंवा योग्य ] असेल तेथवर सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण करणा-या व्यक्तीच्या मूळ हेतूची किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या उद्देशास्तव निर्माण करण्यात आली असेल त्या उद्देशाची पूर्तता करील. जर न्यायालयाच्या मते, असा हेतू किंवा उद्देश पार पाडणे सार्वजनिक हिताच्यादृष्टीने सर्वस्वी किंवा अंशतः इष्ट, व्यवहार्य, वांच्छनीय, [७][ आवश्यक किंवा योग्य ] नसेल तर, न्यायालयास, त्या सर्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा उत्पन्न किंवा त्यांचा कोणताही भाग सदृश हेतूच्या तत्त्वावर इतर, कोणत्याही धर्मादाय किंवा धार्मिक उद्देशासाठी उपयोगात आणण्याविषयी निदेश देता येईल. असे करताना, न्यायालयाने पूर्वी निश्चित करण्यात आलेली कोणतीही योजना बदलणे किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात पूर्वी देण्यात आलेला कोणताही हूकूमनामा किंवा आदेश याच्या अटींमध्ये किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या लेखात असलेल्या शर्तीमध्ये फेरफार करणे हे कायदेशीर असेल.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १२ (एक) अन्वये " जर कोणत्याही वेळी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, कलम ५ अन्वये " हे सार्वजनिक हिताचे नसेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] " धार्मिक उद्देशाकडे लावणे इष्ट असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ३७ (१) अन्वये दाखल करण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १२ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३७ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, कलम ६ अन्वये " किंवा आवश्यक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) अन्वये न्यायालयाने दिलेला कोणताही निर्णय किंवा आदेश हा, अशा न्यायालयाचा हूकूमनामा असल्याचे मानण्यात येईल आणि त्याविरूद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

निदेश मिळविण्यासाठी अर्ज करण्याचे विश्वस्तांचे अधिकार.

[1] [**५६-अ.** (१)] ह्या अधिनियमात यापूर्वी जी तरतूद केलेली असेल त्या व्यातिरिक्त, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही विश्वस्तास, विश्वस्तव्यवस्थेचा विषय असलेली संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा भाग ज्या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीत असेल त्या न्यायालयाकडे, विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची किंवा तिच्या उत्पन्नाची व्यवस्था किंवा कारभार या संबंधीच्या कोणत्याही प्रश्नावर अभिप्राय, सल्ला किंवा निदेश मिळविण्यासाठी अर्ज करता येईल आणि न्यायालय त्यावर आपला अभिप्राय, सल्ला किंवा यथास्थिति निदेश देईलः

परंतु, न्यायालयाच्या मते जो प्रश्न संक्षिप्त रीतीने चौकशी करून निकालात काढणे योग्य नसेल त्या प्रश्नावर असा अभिप्राय, सल्ला, निदेश देणे न्यायालयावर बंधनकारक असणार नाही.

(२) न्यायालयास, पोट-कलम (१) खाली अर्ज आल्यावर, धर्मादाय आयुक्तास नोटीस देऊन त्यावर आपला अभिप्राय, सल्ला किंवा निदेश देता येईल, कोणताही अभिप्राय, सल्ला किंवा निदेश देण्यापूर्वी, न्यायालय, उक्त अर्जाच्या संबंधात हजर होणा-या सर्व व्यक्तींना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या अर्जात विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही बाबीच्या तथ्यांविषयी सद्भावनापूर्वक निवेदन करणा-या व त्यावर न्यायालयाने दिलेला अभिप्राय, सल्ला व निदेश यानुसार, वागणा-या विश्वस्ताने, जेथवर त्याच्या स्वतःच्या जबाबदारीचा संबंध असेल तेथवर, ज्या बाबीसंबंधी अर्ज करण्यात आला होता त्या बाबीसंबंधात असा विश्वस्त म्हणून आपले कर्तव्य पार पाडले आहे असे मानण्यात येईल.

(४) ह्या कलमान्वये दिलेला कोणताही अभिप्राय, सल्ला किंवा निदेश याविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही.

सार्वजनिक धर्मादाय किंवा धार्मिक प्रयोजनावर परिणाम करणारा प्रश्न अंतर्भूत असलेली कार्यवाही.

**५६-ब.** (१) ज्या कोणत्याही दाव्यात किंवा न्यायालयीन कार्यवाहीत एखाद्या सार्वजनिक धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनावर परिणाम करणारा कोणताही प्रश्न अंतर्भूत [2] [असेल] त्या दाव्यात किंवा न्यायालयीन कार्यवाहीत, धर्मादाय आयुक्ताला नोटीस देण्यात येईपर्यंत, न्यायालयाने अशा प्रश्नाचा निर्णय करण्याचे काम हाती घेता कामा नये.

(२) अशी नोटीस मिळाल्यावर किंवा अन्यथा धर्मादाय आयुक्त त्याबाबतीत कोणताही अर्ज करील तर, त्यास अशा दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यात पक्षकार म्हणून दाखल करून घेण्यात येईल.

(३) ह्या कलमात "न्यायालय" याचा अर्थ [ महाराष्ट्र राज्यातील ] सक्षम अधिकारिता असलेले कोणतेही दिवाणी न्यायालय, असा असेल.]

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १३ अन्वये कलमे ५६-अ आणि ५६-ब समाविष्ट करण्यात आली.

[2] हा शब्द सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलमे ३९ अन्वये "आहे असे न्यायालयास वाटेल" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[3] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्यातील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## [१][प्रकरण सात-अ]

### राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा ज्यांची व्यवस्था राज्य शासनाकडे निहित आहे अशा धार्मिक व धर्मादाय स्वरूपाच्या संस्था आणि दाननिधी यांच्या संबंधातील विशेष तरतूद

प्रकरण ७-अ च्या तरतुदी विवक्षित दाननिधींना लागू असणे.

**५६-क.** (१) या प्रकरणाच्या तरतुदी राज्य शासनाकडे निहित असलेल्या किंवा ज्यांचे व्यवस्थापन राज्य शासनाकडे निहित आहे अशा, आणि

(अ) या अधिनियमाच्या तरतुदींन्वये ज्याची नोंदणी झालेली आहे किंवा,

(ब) राज्य शासनाने, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि पूर्वप्रसिद्धीनंतर **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, ज्यास सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून घोषित केले असेल अशा, प्रत्येक देवळास, मशिदीस किंवा सार्वजनिक, धार्मिक किंवा धर्मादाय स्वरूपाच्या प्रयोजनाकरिता निर्माण केलेल्या दाननिधीस (यापुढे या प्रकरणात ज्याचा "दाननिधी" असा निर्देश केला आहे) लागू असतील.

अशी घोषणा करण्यात आल्यानंतर, असा दाननिधी हा, या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता नोंदणी केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था असल्याचे मानण्यात येईल ; आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी संबंधीच्या प्रकरण ४ च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदणीवहीत नोंदी करण्यास लागू होतील. मात्र अशा नोंदी, या प्रकरणाच्या तरतुदींनुरुप असतील अशा प्रकारे केलेल्या नोंदी अंतिम व निर्णायक असतील.

(२) या प्रकरणाच्या प्रारंभानंतर, राज्य शासनाने, शक्य असेल तितक्या लवकर, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदणी केलेल्या किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था असल्याचे जाहीर केलेल्या, दाननिधीची एक यादी **राजपत्रात** प्रसिद्ध करील ; व राज्य शासनास, तशाच अधिसूचनेद्वारे आणि तशाच रीतीने, अशा यादीत कोणत्याही दाननिधीची भर घालता येईल किंवा नोंदलेला कोणताही दाननिधी अशा यादीतून वगळता येईल.

विवक्षित दाननिधी निहित करणे किंवा त्यांचे व्यवस्थापन हस्तांतरित करणे.

**५६-ड.** राज्य शासन, ते ठरवील त्या तारखेपासून, आणि यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने एखाद्या समितीकडे (यात यापुढे 'समिती' असा जिचा निर्देश केला आहे,) उक्त दाननिधी, किंवा त्याचे व्यवस्थापन हस्तांतरित करील आणि त्यानंतर असा दाननिधी, तत्संबद्ध सर्व स्थावर किंवा जंगम मालमत्तेसह, किंवा यथास्थिति त्याचे व्यवस्थापन अशा समितीच्या सदस्यांकडे निहित होईल ; आणि उक्त समितीचे सदस्य, या अधिनियमाच्या अर्थानुसार आणि त्या प्रयोजनार्थ, अशा दाननिधीचे विश्वस्त असतील.

व्यवस्थापन समित्या.

**५६-ई.** (१) कलमे ४७ व ५० यांत काहीही अंतर्भूत असले तरी, या प्रकरणाच्या तरतुदींन्वये समितीकडे दाननिधीचे व्यवस्थापन निहित करण्याच्या किंवा हस्तांतरित करण्याच्या प्रयोजनाकरिता, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, (अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने) [२][राज्य शासनाला योग्य वाटेल त्याप्रमाणे एक किंवा अधिक जिल्ह्यांकरिता एक किंवा अधिक समित्या] नेमील.

(२) समितीस, विहित करण्यात येतील अशा शर्तीस व निर्बंधास अधीन राहून, मालमत्ता संपादन करता येईल, धारण करता येईल आणि तिचा विनियोग करता येईल आणि समितीच्या सर्व सदस्यांच्या नावाने, तिला व तिजवर दावा लावता येईल.

---

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्र. ६ याच्या कलम २९ अन्वये प्रकरण समाविष्ट करण्यात आले.

[२] हा मजकूर सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम २ अन्वये " प्रत्येक जिल्ह्याकरिता एक किंवा अनेक समित्या " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

(३) समितीत कमीत कमी पाच व जास्तीत जास्त सात सदस्य असतील, आणि धार्मिक दाननिधीच्या बाबतीत अशा सदस्यांची नेमणूक, ज्या व्यक्ती आपण त्या धर्माच्या आहोत असे उघडपणे कबूल करीत असतील, किंवा ज्या व्यक्ती, ज्या धार्मिक संप्रदायाच्या प्रयोजनाकरिता किंवा ज्यांच्या फायद्याकरिता दाननिधी, स्थापन करण्यात आला होता किंवा त्याचा कारभार पाहण्यात येत आहे त्या धार्मिक संप्रदायाच्या (किंवा त्याच्या कोणत्याही पंथाचे) असतील त्या व्यक्तींमधून केली पाहिजे आणि इतर दाननिधीच्या बाबतीत, अशा प्रकारे नियुक्ती करता येईल. अशा सदस्यांची नियुक्ती, शक्य असेल तेथवर, आणि अशा दाननिधीच्या कारभाराबद्दल आस्था असलेल्या व्यक्तींची सर्वसाधारण इच्छा काय आहे याची खात्री करून घेता येईल तेथवर, त्यांच्या इच्छेनुसार केली पाहिजे.

समितीच्या सदस्यांचा पदावधी.

**५६-फ.** (१) एखाद्या सदस्याची पाच वर्षे मुदतीसाठी समितीवर नियुक्ती करण्यात येईल, परंतु तो, पुन्हा नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

(२) एखाद्या सदस्यास, स्वतःच्या सहीनिशी राज्य शासनास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे समितीच्या सदस्यत्वाचा राजीनामा देता येईल :

परंतु, राज्य शासनाकडून असा राजीनामा स्वीकारण्यात येईपर्यंत तो अंमलात येणार नाही.

सदस्यात्वा-संबंधीची अनर्हता.

**५६-ग.** (१) जर एखादी व्यक्ती,—

(अ) अवयस्क असेल ;

(ब) तिला फौजदारी न्यायालयात, नैतिक अधःपाताचा अंतर्भाव होणा-या कोणत्याही अपराधाबाबत सिद्धापराध ठरविण्यात आले असेल ;

(क) ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने ती तशी असल्याबद्दल जाहीर केले असेल ;

(ड) अमुक्त नादार असेल ;

(ई) समितीकडे निहित असलेल्या मालमत्तेसंबंधीच्या पट्ट्यात किंवा कोणत्याही इतर व्यवहारात, तिचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध असेल ;

(फ) समितीची वेतनी कर्मचारी असेल किंवा दाननिधीच्या संबंधात समितीला मालाचा पुरवठा करण्यासाठी किंवा समितीने हाती घेतलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी किंवा कोणतीही सेवा देण्यासाठी केलेल्या करारात तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल ;

(ग) गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे राज्य शासनास आढळून आले असेल ;

(ह) धार्मिक दाननिधीच्या बाबतीत, तिने, आपण त्या धर्माचे आहोत असे कबूल करण्याचे किंवा ज्या धार्मिक संप्रदायासाठी समिती नेमण्यात आली असेल त्या धार्मिक संप्रदायाची असण्याचे बंद झाले असेल ; किंवा

(आय) अन्यथा अयोग्य असेल ;

तर, ती व्यक्ती समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती केली जाण्यास किंवा सदस्य असण्यास अनर्ह ठरेल.

(२) एखादा सदस्य पूर्वोक्त गोष्टीपैकी कोणत्याही गोष्टीमुळे अनर्ह ठरला आहे असे राज्य शासनास वाटेल, तर, त्यास, अशा सदस्यास कारण दर्शविण्याची संधी दिल्यानंतर आणि दर्शविण्यात आलेले कोणतेही असे कारण विचारात घेतल्यानंतर, अशा व्यक्तीचे सदस्यत्व काढून घेता येईल आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

(३) त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, समितीचा एखादा सदस्य, तो अशा समितीचा सदस्य आहे याच केवळ कारणास्तव [१][महाराष्ट्र] विधानसभेचा किंवा [१][महाराष्ट्र] विधानपरिषदेचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास आणि सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरणार नाही.

---

[१] " मुंबई " या शब्दाऐवजी हा शब्द महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये दाखल करण्यात आला.

नवीन सदस्याची नियुक्ती करण्याचा शासनाचा अधिकार.

**५६-ह.** जर समितीचा एखादा सदस्य,—

(अ) राजीनामा देईल किंवा मरण पावेल ;

(ब) धर्मादाय आयुक्ताच्या परवानगीवाचून सतत सहा महिन्यांच्या मुदतीत भारतात नसेल ;

(क) परदेशात राहण्याच्या प्रयोजनाकरिता भारत सोडून जाईल ;

(ड) मुक्त होण्याची इच्छा व्यक्त करील ;

(ई) काम करण्याचे नाकारील ; किंवा

(फ) राज्य शासनाकडून त्यास पदावरून दूर करण्यात येईल ;

तर राज्य शासनास नवीन सदस्यांची नेमणूक करता येईल.

समितीचा सभापती व कोषाध्यक्ष.

**५६-आय.** (१) समितीच्या सदस्यांमधून राज्य शासन, सभापतीची नियुक्ती करील आणि त्याचप्रमाणे कोषाध्यक्षाचीही नियुक्ती करील.

(२) राज्य शासनास समितीच्या सभापतीस, कोषाध्यक्षास व इतर सदस्यांस [१] [कलम ५६-क्यू क्यू, अन्वये स्थापन केलेल्या व्यवस्थापन निधीतून] विहित करण्यात येईल इतके व विहित करण्यात येईल अशा रीतीने मानधन किंवा फी व भत्ते देण्यात यावेत असा निदेश देता येईल.

समितीची सभा व कार्यपद्धती.

**५६-ज.** (१) समिती विहित करण्यात येईल अशा कालांतरांनी सभा बोलावील व तिच्या अधिकारांचा वापर करताना आणि तिची कर्तव्ये व कामे पार पाडताना विहित करण्यात येईल अशी कार्यपद्धती अनुसरील; परंतु, दैनंदिन व नित्याचे कामकाज तिने केलेल्या व राज्य शासनाची मान्यता मिळालेल्या विनिमयांनुसार उरकण्यात येईल.

उप-समित्या नेमण्याचा समितीचा अधिकार.

**५६-के.** समितीस, ठराव करून, तिला योग्य वाटतील अशा उप-समित्या नेमता येतील आणि तिला ती ठरावात विनिर्दिष्ट करील असे अधिकार व कर्तव्ये त्याच्याकडे सोपविता येतील ; आणि समितीला किंवा उपसमितीला सामान्यपणे किंवा कोणत्याही विशिष्ट प्रयोजनाकरिता सदस्य नसलेल्या परंतु जिचे सहाय्य किंवा सल्ला घेण्याची तिची इच्छा असेल अशा कोणात्याही व्यक्तीला विनियमांद्वारे ठरविण्यात येईल अशा रीतीने सहयोगी करून घेता येईल ; आणि पूर्वोक्तप्रमाणे सहयोगी करून घेण्यात आलेल्या व्यक्तीस, त्या प्रयोजनाशी संबद्ध अशा, समितीच्या किंवा उपसमितीच्या चर्चेत भाग घेण्याचा अधिकार असेल परंतु तिला समितीच्या किंवा उपसमितीच्या कोणत्याही सभेत मत देण्याचा अधिकार असणार नाही.

समितीचे चिटणीस व इतर अधिकारी.

**५६-ल.** (१) राज्य शासनास समितीचा चिटणीस नेमता येईल :

(२) समितीस, या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमरीत्या पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (चिटणिसाव्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नियुक्ती करता येईल;

परंतु समिती, राज्यशासनाची पूर्वमान्यता घेतल्याशिवाय ज्याला दरमहा शंभर रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा देण्यात यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक करणार नाही.

चिटणीस व इतर कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती.

**५६-म.** (१) चिटणीस, अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती समितीने केलेल्या नियमाद्वारे किंवा यथास्थिती, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा सेवेच्या अटींवर व शर्तीवर करण्यात येईल.

(२) समितीचा चिटणीस, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते [२] [व्यवस्थापन निधीतून] देण्यात येतील.

---

[१] हा मजकूर सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६ याच्या कलम ३ अन्वये " विहित करण्यात येईल अशा निधीतून " हा मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[२] हा मजकूर सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६ याच्या कलम ४ अन्वये " विहित करण्यात येईल अशा निधीतून " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

**५६-न.** (१) राज्य शासनाच्या सामान्य आणि विशेष आदेशास अधीन राहून, जो दाननिधी समितीकडे निहित असेल किंवा ज्याचे व्यवस्थापन तिच्याकडे निहित झाले असेल अशा दाननिधीची व्यवस्था पाहणे व त्याचा कारभार चालविणे हे समितीचे सर्वसामान्य कर्तव्य असेल. असा दाननिधी योग्य रीतीने सांभाळला जाईल, त्यावर योग्य नियंत्रण राहील आणि त्याचा चोख कारभार चालेल आणि ज्या उद्देशांकरिता व प्रयोजनाकरिता तो निर्माण करण्यात आला असेल, योजिला असेल किंवा त्याचा कारभार चालविण्याचा हेतू होता या उद्देशांसाठी व प्रयोजनांसाठी त्याच्या उत्पन्नाचा यथोचित विनियोग केला जातो याची खात्री करून घेण्यासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा अशा दाननिधीच्या संबंधात त्यावेळी अंमलात असलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही लेखान्वये किंवा योजनेन्वये समितीला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणे आणि तिच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये व काम पार पाडणे हे समितीचे कर्तव्य असेल. समितीची सामान्य कर्तव्ये.

(२) विशेषकरून, परंतु पूर्ववर्ती तरतुदीच्या सामान्यतेस बाध न आणता समिती,—

(अ) अशा प्रत्येक दाननिधीचा उगम, त्याचे उत्पन्न, त्याचा हेतू व त्याचे लाभाधिकारी यांच्या संबंधीची माहिती असलेला अभिलेख ठेवील ;

(ब) तिचे उत्पन्न व खर्च यांचे अंदाजपत्रक तयार करील ;

(क) [1][व्यवस्थापन निधीतून] समितीचा चिटणीस, अधिकारी व कर्मचारी यांस द्यावयाचे वेतन व भत्ते आणि इतर देय रकमा नियमितपणे देईल ;

(ड) अशा प्रत्येक दान निधीचे स्वतंत्र लेखे ठेवील ;

(ई) दान निधीच्या उत्पन्नाचा व मालमत्तेचा असा दान निधी ज्या उद्देशांकरिता व प्रयोजनांकरिता निर्माण करण्यात आला असेल, योजिला असेल किंवा त्याचा कारभार चालविण्याचा हेतू होता त्याच उद्देशांसाठी व प्रयोजनांसाठी विनियोग करण्यात येईल याची खात्री करून घेईल ;

(फ) अशा कोणत्याही दान निधीची हरवलेली मालमत्ता परत मिळविण्यासाठी उपाययोजना करील ;

(ग) अशा दाननिधीच्या संबंधात न्यायालयात कोणतेही दावे व कार्यवाही दाखल करील व अशा दाव्यांमध्ये व कार्यवाहींमध्ये बचाव करील ;

(ह) अशा दाननिधीच्या संबंधात राज्य शासन वेळोवेळी फर्माविली अशी विवरणे, आकडेवारी, लेखे व इतर माहिती पुरवील ;

(आय) अशा दाननिधीच्या मालमत्तेची तपासणी करील किंवा तपासणी करण्याची व्यवस्था करील ; आणि

(ज) अशा दाननिधीवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी, तो सांभाळण्यासाठी व त्याचा कारभार पहाण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी सामान्यपणे करील.

**५६-ओ.** समितीचे कोणतेही कृत्य किंवा कार्यवाही ही, तिच्या सदस्यांपैकी कोणत्याही सदस्याचे पद रिकामे असल्याच्या किंवा तिच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणामुळेच केवळ कायद्यान्वये अग्राह्य ठरणार नाही. पद रिकामे झाल्याच्या किंवा दोष असल्याच्या कारणामुळे समितीचे कृत्य कायद्यान्वये अग्राह्य न ठरणे.

---

[1] हा मजकूर सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ५ अन्वये " विहित करण्यात येईल अशा निधीतून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**५६-प.** राज्य शासनास, वेळोवेळी, कोणत्याही दाननिधीच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनासाठी किंवा कारभारासाठी समितीस निदेश देता येतील.

समितीची कर्तव्ये बजाविण्यास भाग पाडण्याचा व त्या संबंधीचा खर्च समिती वगैरेच्या निधीतून देण्याविषयी निदेश देण्याचा धर्मादाय आयुक्ताचा अधिकार.

**५६-क्यू.** धर्मादाय आयुक्तास, राज्य शासनाच्या पूर्वमंजूरीने, या अधिनियमान्वये किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींन्वये किंवा त्यानुसार दिलेल्या निदेशान्वये जे कोणतेही कर्तव्य बजाविण्यास समिती बांधलेली असेल ते कर्तव्य पार पाडण्यासाठी तरतुद करता येईल, आणि समितीच्या मालकीचा कोणताही निधी वेळोवेळी ज्या कोणत्याही व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल त्या व्यक्तीने, असे कर्तव्य बजाविण्याचा खर्च द्यावा असा निदेश देता येईल. असे कर्तव्य कोणत्याही दाननिधीच्या संबंधातील असेल तर, खर्चाची रक्कम, उक्त दाननिधीच्या मालकीच्या निधीतून देण्यात येईल.

व्यवस्थापन निधी.

[१][**५६-क्यूक्यू.** (१) प्रत्येक समितीकरिता ' व्यवस्थापन निधी ' या नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल, तो समितीकडे निहित होईल व तो तिच्या नियंत्रणाखाली राहील,

(२) प्रत्येक व्यवस्थापन निधीच्या खाती पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

(अ) कोल्हापूरच्या बाबतीत पोट-कलम (३) अन्वये जी तरतुद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, कलम ५६-ड अन्वये दाननिधी किंवा त्याचे व्यवस्थापन समितीच्या सदस्यांकडे हस्तांतरीत करण्यात आल्याच्या आणि त्यांच्याकडे ते निहित करण्यात आल्याच्या निकटपूर्वी राज्य शासनाने धारण केलेल्या अशा कोणत्याही दाननिधीच्या खाती जमा असलेल्या (रोख किंवा रोख्यांच्या स्वरूपातील किंवा इतर कोणत्याही स्वरूपातील) एकूण शिल्लक रकमा ;

(ब) राज्य शासनाच्या मान्यतेसह समिती याबाबतीत ठरवील अशी, समितीच्या सदस्यांकडे हस्तांतरीत केलेल्या किंवा त्यांच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या प्रत्येक दाननिधीच्या एकूण वार्षिक उत्पन्नाच्या शेकडा दहा टक्क्यांहून अधिक नसेल इतकी रक्कम. अशी रक्कम ठरवितांना दाननिधीचे एकूण वार्षिक उत्पन्न, ज्या उद्देशांकरिता व ज्या प्रयोजनांकरिता किंवा ज्यांच्या फायद्यांसाठी दाननिधी स्थापन करण्यात आला असेल, निर्माण करण्यात आला असेल, योजला असेल, किंवा त्याचा कारभार चालविण्यात येत असेल तो उद्देश पार पाडण्यासाठी करण्यात आलेला वार्षिक खर्च, दाननिधी कोणत्याही दायित्वाच्या अधीन असल्यास, असे दायित्व आणि कोणत्याही दाननिधीच्या किंवा दाननिधींच्या वर्गाच्या बाबतीत, राज्य शासन सामान्यतः किंवा विशेषतः विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही इतर बाबी विचारात घेण्यात येतील.

(क) समितीच्या कामकाजाच्या तपासणीसाठी आणि समितीने ठेवलेल्या कागदपत्रांच्या प्रतींसाठी, आकारण्यात आलेली फी ;

(ड) राज्य शासन याबाबतीत आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही इतर रक्कम.

[१] हे कलम सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६ अन्वये समाविष्ट करण्यात आले.

(३) ' देवस्थान उपकर ' या नावाने किंवा कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारी पूर्वीच्या कोल्हापुर संस्थानातील देवस्थान इनाम जमिनीवर बसविण्यात आलेली आणि दिनांक २९ सप्टेंबर १९१७ चा सरसुभा वट क्रमांक २० द्वारे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, देवस्थान निधीत जमा केलेली आणि दिनांक ५ नोव्हेंबर १९३२ चा सरसुभा जाहिरनामा क्रमांक ३६ च्या तरतुदीन्वये बसविण्याचे व पूर्वोक्त निधीत जमा करण्याचे चालू ठेवण्यात आलेली अंशदाने ही, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९६३ याच्या
१९६४ प्रारंभापासून, पूर्वोक्त देवस्थान इनाम जमिनीवर १९६४ ला बसविण्याचे व जमा करण्याचे बंद होईल ; आणि
महा. ६. पूर्वीच्या कोल्हापूर संस्थानाच्या दाननिधींच्या उत्पन्नातून साठलेली रक्कम धरून (अशी साठलेली रक्कम सर्वसाधारणपणे अनामत निधी म्हणून ओळखण्यात येते) अशा प्रारंभाच्या तारखेस उक्त देवस्थान निधीच्या खाती जमा असलेली एकूण शिल्लक ही, (मग ती रोख असो, किंवा रोख्यांच्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात असो) राज्य शासनाकडून याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, कोल्हापूर जिल्ह्यातील अशा समितीच्या किंवा समित्यांच्या व्यवस्थापन निधींच्या खात्यात जमा करण्यात येईल.

(४) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून आणि राज्य शासनाच्या कोणत्याही सामान्य किंवा विशेष आदेशास अधीन राहून, व्यवस्थापन निधीचा विनियोग, पुढील कारणांसाठी करण्यात येईल.—

(एक) समितीचा सभापती, कोषाध्यक्ष आणि तिचे इतर सदस्य यांस मानधन, फी व भत्ते देणे ;

(दोन) समितीचा चिटणीस, तिचे अधिकारी व कर्मचारी यांना वेतने, भत्ते व इतर देय रकमा देणे ;

(तीन) कलम ५६-न अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, समितीने आपल्या अधिकारांचा वापर करताना व आपली कर्तव्ये व कामे पार पाडतांना केलेला कोणताही कायदेशीर खर्च देणे.

(५) व्यवस्थापन निधीत जमा केलेल्या सर्व पैशाची अभिरक्षा व गुंतवणूक आणि त्यामधून रकमांचे वितरण व प्रदान आणि निधीच्या लेख्यांची लेखापरीक्षा या गोष्टीचे विहित नियमन होईल.]

**५६-र.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये समितीवर लादलेली कर्तव्ये बजाविण्यास समिती असमर्थ आहे किंवा ती बजाविण्यात तिने सतत कसूर केली आहे किंवा तिने आपल्या अधिकारांचे अतिक्रमण केले आहे किंवा त्यांचा दुरुपयोग केला आहे असे राज्य शासनाचे मत होईल तर, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीकरिता समिती निष्प्रभावित करता येईल : समिती निष्प्रभावित करण्याचा अधिकार.

परंतु, या पोट-कलमान्वये अधिसूचना काढण्यापूर्वी, राज्य शासन समिती निष्प्रभावित का करण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी समितीस देईल व समितीचे काही स्पष्टीकरण वा आक्षेप असल्यास ते विचारात घेईल.

(२) समिती निष्प्रभावित करण्याबाबतची पोट-कलम (१) खालील अधिसूचना प्रसिद्ध केल्यावर—

(अ) समिती निष्प्रभावित झाल्याच्या दिनांकापासून समितीचे सर्व सदस्य, असे सदस्य म्हणून आपली पदे (सोडील) ;

(ब) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये, समितीकडून किंवा तिच्या वतीने, वापरण्यात येतील असे सर्व अधिकार किंवा पार पाडावयाची सर्व कर्तव्ये व कामे ही, समिती निष्प्रभावित झाल्याच्या मुदतीत, राज्य शासन, कलम ५६-ग, पोट-कलम (१) च्या तरतुदी लक्षात घेऊन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून वापरण्यात येतील आणि पार पाडण्यात येतील ; आणि

(क) समितीकडे निहित असलेली सर्व मालमत्ता किंवा जिचे व्यवस्थापन समितीकडे निहित असेल अशी मालमत्ता, समिती निष्प्रभावित झाल्याच्या मुदतीत, राज्य शासनाकडे निहित होईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेली, निष्प्रभावित केल्याची मुदत संपल्यावर, राज्य शासनास :—

(अ) त्यास आवश्यक वाटेल अशा आणखी मुदतीपर्यंत निष्प्रभावित केल्याची मुदत वाढविता येईल, किंवा

(ब) कलम ५६-ई मध्ये तरतूद केलेल्या रीतीने समितीची पुनर्रचना करता येईल.

समितीच्या सदस्यांना काढण्याचा व प्रशासकाची तात्पुरती नियुक्ती करण्याचा अधिकार.

[1] [**५६-र र.** (१) या प्रकरणात किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीत किंवा कोणतेही न्यायालय, धर्मादाय आयुक्त किंवा इतर कोणतेही प्राधिकरण यांचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा, आदेश किंवा योजना यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही दाननिधी किंवा कोणतेही दाननिधी यांच्याबाबतीत कलम ५६-ई अन्वये, राज्य शासनाने, व्यवस्थापन समिती नेमलेली असेल आणि दाननिधीच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनासाठी व प्रशासनासाठी उक्त दाननिधीचे व्यवस्थापन राज्य शासनाने तात्पुरते आपल्याकडे घ्यावे व नंतर धर्मादाय आयुक्ताकडून तयार करण्यात आलेल्या एका किंवा अनेक योजनांद्वारे त्यांचे नियमन व्हावे किंवा पुनर्रचना केलेल्या समितीकडे असा दाननिधी पुनः सोपवावा असे राज्य शासनाचे मत असेल, त्या बाबतीत राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे :—

(अ) उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या तारखेस व त्या दिनांकापासून, (सभापती व कोषाध्यक्ष यांसह) समितीच्या सर्व विद्यमान सदस्यांची नियुक्ती, त्यांचा पाच वर्षाचा पदावधी संपण्यापूर्वी समाप्त करता येईल व त्या तारखेस त्यांनी आपले पद रिकामे केले असल्याचे समजण्यात येईल ;

(ब) अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, तीन वर्षाहून अधिक नसणा-या मुदतीसाठी, समितीचा प्रशासक म्हणून, वेळोवेळी, एका शासकीय अधिका-याची नियुक्ती करता येईल आणि ही मुदत, वेळोवेळी तत्सम अधिसूचनेद्वारे वाढवता येईल, तथापि, अशी एकूण मुदत पाच वर्षापेक्षा अधिक होता कामा नये :

परंतु, जर उक्त मुदतीत, समितीची पुनर्रचना करण्यात आली तर, ज्या दिवशी समितीची पुनर्रचना करण्यात येईल त्या दिवसापासून प्रशासकाने त्याचे पद धारण करणे बंद होईल किंवा जेव्हा कोणत्याही दाननिधीसंबंधात धर्मादाय आयुक्त कोणतीही योजना तयार करील तेव्हा ती योजना अंमलात येईल त्या दिवसापासून, त्या दाननिधीसंबंधात प्रशासकाने काम करणे बंद होईल.

(२) प्रशासक त्याचे पद धारण करीत असेल त्या मुदतीत, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये समित्यांना व त्यांच्या सदस्यांना आणि उपसमित्यांना (तशा उपसमित्या असल्यास) असलेल्या सर्व अधिकारांचा प्रशासक वापर करील त्यांची कर्तव्ये पार पाडील आणि त्यांची कामे करील आणि ती कलम ५६-ड अन्वये त्याच्या व्यवस्थापनाखालील दाननिधीसंबंधात तो एकमेव विश्वस्त असल्याचे मानण्यात येईल.

(३) प्रशासक त्याचे कोणतेही अधिकार, कर्तव्ये व कामे समितीच्या कोणत्याही अधिका-याकडे किंवा कर्मचा-याकडे किंवा, राज्य शासनाच्या पूर्व संमतीने कोणत्याही इतर शासकीय अधिका-याकडे सोपविल.

(४) प्रशासकाला आणि ज्यास त्याने आपले कोणतेही अधिकार, कर्तव्ये व कामे सोपविलेली आहेत अशा कोणत्याही इतर शासकीय अधिका-याला, राज्य शासन, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, निर्धारित करील, इतके वेतन व भत्ते व्यवस्थापन निधीतून मिळतील व तो उक्त आदेशाद्वारे निर्धारित अशा इतर सेवाशर्तीच्या अधीन असेल.

विनियम करण्याचा अधिकार.

**५६-स.** (१) समितीस, राज्य शासनाच्या मान्यतेसह या अधिनियमाखालील आपली कामे पार पाडण्यासाठी, या अधिनियमाशी किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील.

(२) विशेषकरून, परंतु पूर्ववर्ती तरतुदीच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा विनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :–

(एक) कलम ५६-ज खालील समितीचे दैनंदिन कामकाज व नित्याचे काम उरकणे ;

(दोन) कलम ५६-के अन्वये समितीचा किंवा यथास्थिति, उप-समितीचा सदस्य नसलेली कोणतीही व्यक्ती, ज्या रीतीने, अशा समितीशी किंवा उप-समितीशी सहयोगी करून घेण्यात येईल ती रीत ;

(तीन) समितीच्या कर्मचा-यांच्या सेवेच्या कलम ५६-म खालील अटी व शर्ती.

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४३ च्या कलम २ अन्वये कलम ५६-र र दाखल करण्यात आले.

**५६-ट.** या प्रकरणाच्या तरतुदींमध्ये स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल तेथवर, त्याशिवाय कलमे १८, १९, २०, २१, [१][**]४७, [१][**]५०, ५९, ६६ व ६७ यातील कोणताही मजकूर, ज्या दाननिधींना हे प्रकरण लागू असेल त्या दाननिधींना लागू होणार नाही :] या अधिनियमाच्या विवक्षित तरतुदी दाननिधींना लागू नसणे.

[२][परंतु, ज्या दाननिधीच्या संबंधात कलम ५०-अ अन्वये एखादी योजना तयार करण्यात आलेली असेल अशा कोणत्याही दाननिधीला या प्रकरणांच्या तरतुदी लागू असल्याचे बंद होईल, आणि अशी योजना तयार करण्यात आल्यावर, कलमे १८, १९, २० आणि २१ ही वगळता, या अधिनियमाच्या इतर तरतुदी अशा दाननिधीला लागू होतील.]

## प्रकरण आठ

### सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधी

**५७.** [३][(१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधी या नावाने ओळखला जाणारा एक निधी स्थापन करण्यात येईल. उक्त निधी धर्मादाय आयुक्ताकडे निहित असेल.] सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधी.

(२) उक्त निधीत पुढील रकमा जमा करण्यात येतील :—

[४][(अ) कलम १८ अन्वये आकारणी करता येईल अशी फी ;]

(ब) कलम ५८ अन्वये दिलेली अंशदाने ;

(क) कलम-६१ अन्वये जमा करण्यात आलेली निधीतील रक्कम किंवा तिचा कोणताही भाग ;

(ड) खाजगी व्यक्तीकडून मिळालेली कोणतीही रक्कम ;

(ई) राज्य शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने नेमून दिलेली कोणतीही रक्कम ; आणि

१९५७ चा ३८. १९६० चा मुंबई २१. (फ) [५][ह्या अधिनियमाच्या किंवा आंतरराज्य महामंडळ, अधिनियम १९५७] [६][किंवा मुंबई वैधानिक महामंडळे (प्रादेशिक पुनर्रचना) अधिनियम, १९६०] याच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये जी रक्कम जमा करण्याविषयी निदेश देता येईल अशी इतर कोणतीही रक्कम.

[७][**५८.** (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था, दरवर्षी, [८][**शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेल्या आदेशाद्वारे राज्य शासनाकडून वेळोवेळी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांनी अंशदान देणे.

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४० अन्वये ४४, ४५, ४६, ४७-अ, ४७-ब हे आकडे व शब्द वगळण्यात आले.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ च्या कलम ३ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३० अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९७१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४१ अन्वये खंड (अ) दाखल करण्यात आला.

[५] मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (महामंडळ) आदेश, १९५९ अन्वये "ह्या अधिनियमाच्या" ह्या मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[६] मुंबई धर्मादाय आयुक्त (प्रादेशिक पुनर्रचना) आदेश, १९६० याच्या अनुसूचीअन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५८ दाखल करण्यात आले. त्या अधिनियमाचे कलम ४ पुढीलप्रमाणे आहे :—

"४. ह्या अधिनियमाच्या कलम २ अन्वये मुख्य अधिनियमात कलम ५८ ऐवजी दाखल केलेले नवीन कलम हे मुख्य अधिनियमात दाखल करण्यात आले आहे व ते नेहमीच दाखल करण्यात आले आहे असे समजण्यात येईल आणि मुंबई, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नियम, १९५१ यातील नियम ३२, पोट-नियम (३) चा खंड (तीन) च्या तरतुदी, ते नियम ज्या तारखेस अंमलात आले त्या तारखेपासून वगळण्यात आल्या आहेत असे समजण्यात येईल आणि तदनुसार, सुधारलेल्या त्या नियमातील नियम३२ हा नेहमीच कायदेशीररीत्या करण्यात आला आहे असे समजण्यात येईल, आणि जणू काही तो नियम ह्या अधिनियमान्वये सुधारलेल्या मुख्य अधिनियमान्वये योग्यरीत्या करण्यात आला आहे असे समजून पूर्णपणे परिणामक्षम आहे असे समजण्यात येईल आणि त्या नियामन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही उपाययोजना ही कायदेशीररीत्या करण्यात आली आहे असे समजण्यात येईल".

[८] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५ (१) (अ) अन्वये मूळ मजकूराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

अधिसूचित करण्यात येईल त्याप्रमाणे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या किंवा वसूल झालेल्या किंवा यथास्थिति, जमा झालेल्या स्थूल वार्षिक रकमेच्या शेकडा पाच टक्के दराने किंवा दरांनी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीस अंशदान देईल. अंशदान विहित करण्यात येईल अशा दिनांकास व अशा रीतीने देण्यात येईल.]

या कलमान्वये [1][ " देय अंशदान " ] हे,—

(एक) धर्मादायाच्या बाबतीत, धर्मादायाच्या वसूल झालेल्या किंवा जमा झालेल्या स्थूल वार्षिक रकमांवरील दराने किंवा दरांनी ;

(दोन) इतर सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या बाबतीत, अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या स्थूल वार्षिक उत्पन्नावरील दराने किंवा दरांनी निश्चित करण्यात येईल.

[2][ **स्पष्टीकरण १.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, " वसूल झालेल्या किंवा जमा झालेल्या स्थूल वार्षिक रकमा " किंवा " स्थूल वार्षिक उत्पन्न " यात कोणत्याही धर्मादाय किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस या अधिनियमान्वये नोंदलेल्या इतर धर्मादायकडून किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडून मिळालेल्या देणग्यांचा समावेश होत नाही. ]

**स्पष्टीकरण.**—[2][२] (अ) या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता " स्थूल वार्षिक उत्पन्न " म्हणजे (सर्व देणग्या किंवा दाने धरून) सर्व साधानांपासून एका वर्षात मिळालेले एकूण उत्पन्न, परंतु त्यात, अशा देणग्या किंवा उपहार हे सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या निकायाचा भाग बनतील अशा विशिष्ट निदेशासह केलेल्या कोणत्याही प्रदानाचा किंवा दिलेल्या वस्तूचा समावेश होणार नाही, त्याचप्रमाणे त्यात राज्य शासन नियमांद्वारे परवानगी देईल अशा वजा करावयाच्या कोणत्याही रकमांचा समावेश होणार नाही :

परंतु, अशा दिलेल्या रकमा किंवा वस्तू ज्या वर्षी दिल्या असतील त्या वर्षानंतरच्या वर्षामध्ये अशा दिलेल्या रकमा किंवा वस्तू यापासून उपार्जित होणारे व्याज किंवा उत्पन्न, हे एकूण वार्षिक उत्पन्नाची गणना करताना, हिशेबात धरण्यात येईल.

(ब) जेव्हा एखादी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आपल्या कार्यापैकी एक कार्य म्हणून, एखादा धंदा किंवा व्यापार करीत असेल तेव्हा, अशा कार्यासंबंधातील अंशदान निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता, अशा धंद्यापासून किंवा व्यापारापासून मिळालेला निव्वळ वार्षिक नफा हा, त्या धंद्यापासून किंवा व्यापारातून मिळालेले स्थूल वार्षिक उत्पन्न आहे असे समजण्यात येईल.

[3][२] राज्य शासनास, ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पूर्णतया [4][शिक्षणाच्या अभिवृद्धत्यर्थ किंवा त्याच्या प्रचाराच्या प्रयोजनार्थ असतील, किंवा केवळ जलसंधारण किंवा केवळ वने, फलोद्यान किंवा शेतीच्या विकासाच्या उद्दिष्टासाठी किंवा केवळ अनूसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती, भटक्या जमाती किंवा स्त्रीया यांच्या कल्याणाच्या उद्दिष्टासाठी ] किंवा पुर्णतया वैद्यकीय सहाय्य किंवा प्राण्यांवरील वैद्यकीय उपचार या प्रयोजनार्थ असतील किंवा टंचाई, अवर्षण, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठीच केवळ असतील अशा विश्वस्तव्यवस्थांना अंशदान देण्यातून सूट देता येईल, पूर, आग किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे ओढवलेल्या आपत्तीच्या निवारणासाठी प्रत्यक्षात खर्च करण्यात येतात अशा कोणत्याही देणग्यांसंबंधात अंशदान देण्याच्याबाबतीत सूट देता येईल. एखादी विश्वस्तव्यवस्था सूट दिलेल्या कोणत्याही विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गात मोडते किंवा कसे किंवा कोणत्याही देणग्या, या पोट-कलमान्वये सूट मिळण्यास पात्र अशा देणग्या आहेत किंवा कसे याविषयी प्रश्न उपस्थित झाल्यास, त्या प्रश्नावरील विहित रीतीने घेतलेला राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.]

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५ (१) (ब) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४२ (१) द्वारे, स्पष्टीकरण १ समाविष्ट करण्यात आले व विद्यमान स्पष्टीकरणास २ हा नवीन क्रमांक देण्यात आला.

[3] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४२ (२) अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[4] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) राज्य शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशांद्वारे, भविष्यलक्ष्ी किंवा पूर्वलक्षी प्रभावाने, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या कोणत्याही वर्गाने पोट-कलम (१) अन्वये ठरविण्यात आलेले अंशदान ज्या दराने किंवा दरांनी दिले पाहिजे तो दर किंवा ते दर कमी करता येतील आणि त्याच रीतीने सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गाच्या उद्देशांचे स्वरूप किंवा त्यांचे अल्प उत्पन्न विचारात घेऊन असे संपूर्ण अंशदान किंवा त्याचा कोणताही भाग देण्यापासून माफी देता येईल.

[१][ (४) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित करावयाच्या अंशदानाचा दर किंवा अंशदानाचे दर निर्धारित करताना राज्य शासन, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीमधील उपलब्ध शिल्लक अणि धर्मादाय संघटनेचे अंदाजित उत्पन्न आणि खर्च (कोणत्याही भांडवली खर्चासह) विचारात घेईल आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी दिलेल्या किंवा द्यावयाच्या सेवा किंवा केलेला किंवा करावयाचा खर्च यांच्याशी वसुलीचा असलेला परस्पर संबंध वाजवी आहे याची खात्री करून घेईल. या प्रयोजनासाठी राज्य शासनाकडून या कलमान्वये केलेल्या आणि **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाद्वारे किंवा आदेशांद्वारे, वेळोवेळी भविष्यलक्षी किंवा पूर्वलक्षी प्रभावाने अंशदानाचे दर वाढविले किंवा कमी केले जातील किंवा त्यात घट केली जाईल किंवा त्यापासून माफी दिली जाईल.]

१९८३ चा महा., २९.

[२][ (५) या कलमाच्या पूर्ववर्ती तरतूदींमध्ये काहीही असले तरी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अधिनियम, १९८३ अंमलात आल्याच्या तारखेस व त्यानंतर अंशदान देण्यास जबाबदार असलेला सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा प्रत्येक विश्वस्त, कलम ३४, पोट-कलम (१-अ) अन्वये ताळेबंदाची आणि उत्पन्न व खर्च याच्या लेख्याची एक प्रत सादर करताना या कलमाच्या पोट-कलम (१) अन्वये निश्चित केलेल्या दराने गणना केलेले सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचे वार्षिक अंशदान आगाऊ करील. हे अंशदान विहित करण्यात येईल अशा रीतीने, आणि देय अंशदान निर्धारित केल्यानंतर करावयाच्या समायोजनास अधीन राहून, ताळेबंद व उत्पन्न व खर्च याचा लेखा यात दर्शविण्यात आले असेल अशा स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या किंवा यथास्थिति, स्थूल वार्षिक जमा रकमेच्या वा गोळा झालेल्या रकमेच्या विहित टक्केवारी इतके असेल.]

अंशदानाच्या वसुलीदाखल शास्ती.

**५९.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त (धर्मादाय आयुक्ताव्यतिरिक्त इतर) [३][किंवा धर्मादायाच्या रकमांची आकारणी किंवा वसुली करणारी व्यक्ती ही ] कलम ५८ खाली अंशदान देण्यात कसूर करील तर, तो विश्वस्त किंवा ती व्यक्ती कलम ६६ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या शास्तीस पात्र ठरेल.

(२) तसेच धर्मादाय आयुक्तास, ज्या बँकेत किंवा ज्या व्यक्तीजवळ सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेचा कोणताही पैसा ठेवला असेल त्या बँकेस किंवा त्या व्यक्तीस आदेश देऊन त्याद्वारे, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या खात्यात असलेल्या पैशातून किंवा अशा व्यक्तीच्या हाती असलेल्या पैशातून किंवा अशा बँकेतर्फे, किंवा अशा व्यक्तीतर्फे, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडून किंवा तिच्या वतीने, ठेवीच्या स्वरूपात जो कोणताही पैसा वेळोवेळी वसूल करण्यात येईल त्या पैशातून अंशदान दिले पाहिजे असा निदेश देता येईल आणि अशा आदेशाचे पालन करणे हे अशा बँकेस किंवा अशा व्यक्तीस बंधनकारक असेल. अशा आदेशानुसार कोणताही पैसा देण्यात आल्यास, अशा बँकेकडे किंवा अशा व्यक्तीकडे अशा रीतीने ठेवीच्या स्वरूपात ठेवलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या पैशातून अशा बँकेने किंवा व्यक्तीने दिलेल्या कोणत्याही रकमेसंबंधात किंवा रकमासंबंधात, उक्त सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेकडे असलेल्या सर्व दायित्वातून अशा बँकेचे किंवा अशा व्यक्तींची पुरेशा रीतीने भारमुक्तता होईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये अंशदान देण्याविषयी ज्या कोणत्याही बँकेस किंवा व्यक्तीस आदेश देण्यात आला असेल त्या बँकेला किंवा व्यक्तीला, राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा आदेश कायम करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो रद्द करता येईल.

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, याच्या कलम ५ (२) अन्वये पोट कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ४ अन्वये पोट कलम (५) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९५१ चा मुंबई अधिनियम, क्रमांक १४ याच्या कलम १६ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीचे उपयोजन.

**६०.** (१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीचे उपयोजन, या अधिनियमाच्या तरतुदींना राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नियमनाशी अनुषंगिक असणारा खर्च भागविण्यासाठी आणि साधारणपणे या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी करण्यात येईल.

(२) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीत जमा करावयाच्या रकमा अभिरक्षा व त्यांची गुंतवणूक आणि त्यातून रकमांचे संवितरण करणे व त्या देणे या गोष्टी विहित केलेल्या रीतीने विनियमित होतील व केल्या जातील.

अनुसूचीतील अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले निधी हे या प्रकरणान्वये घटित करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था व्यवस्थापन निधीत जमा करण्याविषयी राज्य शासनाने निदेश देणे.

**६१.** [१][ अनुसूची अ ] [२][किंवा अनुसूची अअ ] मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमांन्वये जिची नोंदणी करण्यात आली असेल अशा कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेस किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गास हा अधिनियम लागू करण्यात आल्यानंतर, [३][ राज्य शासनास असा निदेश देता येईल की, धर्मादाय आयुक्त अशा कोणत्याही अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही थकबाकी वसूल करील आणि ] [४][धर्मादाय आयुक्ताने वसूल केलेली थकबाकी धरून ], ज्या प्रदेशात किंवा उप-प्रदेशात अशी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांचा वर्ग नोंदण्यात आला असेल त्या प्रदेशासाठी किंवा उप-प्रदेशासाठी उक्त अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या व्यवस्थापनासाठी असलेल्या कोणत्याही निधीतील रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, या प्रकरणान्वये स्थापन करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन निधीत जमा करील.

## प्रकरण नऊ

### निर्धारक

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम ५ अन्वये वगळण्यात आले.

---

## प्रकरण दहा

### अपराध व शास्ती

शास्ती.

[५][**६६.** जी कोणी व्यक्ती, खाली दिलेल्या तक्त्याच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या कलमांपैकी कोणत्याही कलमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराधसिद्धीनंतर अशा प्रत्येक अपराधाबदल, उक्त तक्त्याच्या तिस-या स्तंभात, त्याबाबतीत नमूद केलेल्या रकमेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा देण्यात येईल.

---

[१] हा मजकूर सन १९५१ चा मुंबई अधिनियम, क्रमांक १४, कलम १७ अन्वये "अनुसूची" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[२] सन १९६० चा मुंबई अधिनियम, क्रमांक ६, कलम ३१ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ३१ (ब) अन्वये "राज्य सरकारला असा निदेश देण्याचा अधिकार आहे" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (अ) अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

[५] ही कलमे, सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये कलम ६६ ऐवजी दाखल करण्यात आली.

**स्पष्टीकरण.**—उक्त तक्त्याच्या दुस-या स्तंभातील "विषय" या शीर्षकाखाली दर्शविलेल्या नोंदी या, पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कलमांत वर्णन केलेल्या अपराधाच्या व्याख्या म्हणून किंवा या कलमांचा सारांश म्हणूनही दिलेल्या नाहीत, परंतु पहिल्या स्तंभात ज्यांचे क्रमांक दिलेले आहेत त्या कलमांच्या विषयासंबंधीचे केवळ निर्देश म्हणून त्या समाविष्ट केल्या आहेत.—

**तक्ता**

| कलम<br>(१) | विषय<br>(२) | बसविता येईल तो दंड<br>(३) |
|---|---|---|
| | | रुपये |
| [१][कलम १८, पोट-कलमे (१) व (४) | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मुदतीच्या आत नोंदणी करण्यासाठी धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज करण्याचे विश्वस्ताचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम १८, पोट-कलम (७) . . | विवक्षित अधिकारी व प्राधिकारी यांच्याकडे स्थावर मालमत्तेसंबंधीचे ज्ञापन, मुदतीच्या आत पाठविण्याचे विश्वस्ताचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम २२ . . | बदलासंबंधी अहवाल पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |
| [२][कलम २२ ब . . | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, अर्ज करण्यात कसूर करणे. | |
| कलम २२ क . . | तरतूद करण्यात आलेल्या मुदतीच्या आत, ज्ञापन पाठविण्यात कसूर करणे. | १०,००० |
| कलम २९ . . | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी तरतूद केलेल्या मुदतीत, अर्ज करण्यासंबंधीचे मृत्युपत्र व्यवस्थापकाचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम ३२ . . | नियमितपणे लेखे ठेवण्यासंबंधीचे कर्तव्य. | १०,००० |
| कलम ३५ . . | सरकारी रोख्यात पैसे गुंतविण्यात कसूर करणे किंवा ते न गुंतविणे. | १०,००० |
| कलम ५९ . . | (धर्मादाय आयुक्ताव्यतिरिक्त) विश्वस्ताने किंवा धर्मादाय रकमांची आकारणी करणा-या किंवा त्या वसूल करणा-या व्यक्तीने कलम ५८ अन्वये अंशदान देण्यात कसूर करणे. | १०,००० |

**६६अ.** जो कोणी, धर्मादाय आयुक्ताची पूर्वमंजुरी न घेता विश्वस्तव्यवस्थेची स्थावर मालमत्ता अन्य संक्रमित करील किंवा तसे करण्याचा प्रयत्न करील त्याला कलम ३६ च्या तरतुदीचे उल्लंघन केल्यावरून अपराधसिद्धीनंतर, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या करावासाची शिक्षा किंवा पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील. कलम ३६ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

**६६ब.** जो कोणी, कलम ४१अअ अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही निदेशांचे अनुपालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय कसूर करील, त्याला अपराधा सिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल अशा साध्या कारावासाची शिक्षा किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्हीशिक्षा होतील. कलम ४१अअ च्या तरतुदींचे उल्लंघन करण्याबाबतची शास्ती.

इतर अपराध. **६७.** ज्या उल्लंघनासाठी या अधिनियमाखाली विशेषरीत्या शास्तीची तरतूद करण्यात आलेली नसेल अशा, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे जो कोणी उल्लंघन करील [१][ किंवा धर्मादाय आयुक्ताने, धर्मादाय सह आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे किंवा निदेशाचे पालन करण्यात, वाजवी कारणाशिवाय, कसूर करील ], त्यास, अपराधसिद्धीनंतर [२][रु. १०,०००] पर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

[१] सन १९६० चा मुंबई अधिनियम, क्रमांक ६ याच्या कलम ३४ अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

[२] हा मजकूर सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ अन्वये "१०००" रुपये या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

अपराध आपसात मिटवणे.

[1][६७अ. (१) ज्याच्या निदेशांन्वये तक्रार दाखल केली आहे असा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची कार्यवाही, एकतर ती सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, अशा अपराधासाठी दोषारोप ठेवलेल्या एखाद्या व्यक्तीकडून, त्याला योग्य वाटेल अशी अपराध आपसात मिटवण्याची रक्कम प्राप्त झाल्यावर, आरोपीच्या कसुरीचे स्वरूप, त्याचे पूर्व व विद्यमान वर्तन आणि अन्य संबद्ध घटक लक्षात घेऊन, अपराध आपसात मिटविण्याकरीता, प्राधिकृत करील :

परंतु, अपराध आपसात मिटविण्याची रक्कम त्या-त्या कलमांन्वये तरतूद केलेल्या द्रव्यदंडाच्या अधिकतम रकमेच्या एक चतुर्थांशापेक्षा अधिक नाही इतकी असेल.

(२) अशा प्रकारे अपराध आपसात मिटवून वसूल करण्यात आलेली रक्कम सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या प्रशासनिक निधीमध्ये जमा करण्यात येईल." ]

## प्रकरण अकरा

## धर्मादाय आयुक्ताची कामे, कार्यपद्धती, अधिकारिता व अपीले

धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांची कर्तव्ये, कामे व अधिकार.

**६८.** या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हा, ज्या प्रदेशासाठी किंवा उप-प्रदेशासाठी त्याची नियुक्ती झाली असेल त्या प्रदेशात किंवा उप-प्रदेशात पुढील कर्तव्ये व कामे पार पाडील व पुढील अधिकाराचा वापर करील :—

(अ) कलम १७ अन्वये विहित करण्यात येतील अशी पुस्तके, नोंदी व इतर दस्तऐवज ठेवणे व ते सुस्थितीत राखणे ;

(ब) कलम १९ किंवा २२ मध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी उक्त कलमान्वये चौकशी करणे ;

(क) कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंदी करणे आणि कलम २२ अन्वये उक्त नोंदीमध्ये सुधारणा करणे [2][किंवा त्या रद्द करणे ] ;

[3](कक) कलम २८-अ अन्वये ज्ञापन पाठविणे ;

(ड) कलम ३७ अन्वये, विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही मालमत्तेत प्रवेश करून तिची तपासणी करणे ; विश्वस्ताच्या कोणत्याही कामकाजाचे कागदपत्र मागविणे व त्याची तपासणी करणे आणि विश्वस्ताकडून किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखा किंवा अहवाल मागविणे ;

(ई) कोणतेही विवरणपत्र, नोटीस, माहितीपत्रक, लेखा, लेखापरिक्षेवरील टीप किंवा इतर कोणतेही दस्तऐवज तपासण्यास परवानगी देणे ;

[4][ * * * * * ]

(फ) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे व अशी इतर कर्तव्ये व कामे पार पाडणे.

---

[1] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये कलम ६७ अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ याच्या कलम ३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३५ अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[4] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याच्या कलम ७ अन्वये खंड (फ) वगळण्यात आला.

**६९.** ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, धर्मादाय आयुक्ताने पार पाडावयाची कर्तव्ये व वापरावयाचे अधिकार पुढीलप्रमाणे असतील :— धर्मादाय आयुक्ताची कर्तव्ये, कामे व अधिकार.

(अ) कलम ३ खालील या अधिनियमाच्या अंमलबजावणीवर सर्वसाधारण देखरेख ठेवणे आणि या अधिनियमाची प्रयोजने पार पाडणे ;

(ब) कलम २०, २२ किंवा २८ अन्वये धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या निष्कर्षाविरूद्धची अपील दाखल करून घेण्याचा व ती निकालात काढण्याचा अधिकार ;

(क) कलम २५ अन्वये, कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसंबंधीची चौकशी कोणत्या धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक आयुक्ताने करावी हे ठरविण्याचा अधिकार ;

(ड) कलम ३३ अन्वये, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या लेख्यांची विशेष लेखापरीक्षा करण्याविषयी निदेश देण्याचा अधिकार ;

(ई) कलम ३४ अन्वये, ताळेबंदाची व उत्पन्न व खर्च यांच्या लेख्यांची प्रत आपणास सादर करण्याबद्दल लेखापरीक्षकाला फर्माविण्याचा अधिकार ;

(फ) कलम ३५ अन्वये, सरकारी रोख्यांव्यतिरिक्त इतर रीतीने सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा पैसा गुंतविण्यास विश्वस्ताला परवानगी देण्याचा अधिकार ;

(ग) कलम ३६ अन्वये, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीची स्थावर मालमत्ता विकण्यास, गहाण ठेवण्यास, तिची अदलाबदल करण्यास, ती देणगी म्हणून किंवा पट्ट्यावर देण्यास मंजुरी देण्याचा अधिकार ;

(ह) कलम ३७ अन्वये, कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेत प्रवेश करुन तिची तपासणी करण्याचा, विश्वस्ताचे कोणतेही कामकाज मागविण्याचा व त्याची तपासणी करण्याचा आणि विश्वस्ताकडून किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेशी संबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखा किंवा अहवाल मागविण्याचा अधिकार ;

(आय) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची जी कोणतीही हानी झाली असेल त्या हानीच्या संबंधात कलम ४० अन्वये चौकशी करण्याचा आणि कलम ४१ अन्वये अधिभार आकारणीसंबंधी आदेश देण्याचा अधिकार ;

(ज) धर्मादाय दाननिधी अधिनियम, १८९० अन्वये धर्मादाय दाननिधींचा कोषाध्यक्ष म्हणून, कलम ४३ अन्वये, [1][ [2]* * धर्मादाय आयुक्ताचा काम करण्याचा अधिकार ] ; १८९० चा ६.

(के) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचा विश्वस्त म्हणून काम करण्याचा अधिकार ;

(ल) कलम ५० अन्वये दावा दाखल करण्याचा अधिकार ;

[3][ (लल) कलम ५०-अ अन्वये योजना तयार करण्याचा किंवा तिच्यात फेरबदल करण्याचा अधिकार ] ;

(म) कलम ५१ अन्वये, दावा दाखल करण्यास संमती देण्याचा किंवा ती नाकारण्याचा अधिकार ;

(न) कलम ५५ अन्वये, विश्वस्तव्यवस्थेच्या पैशाचा सदृश हेतूच्या तत्त्वावर विनियोग करण्याविषयी विश्वस्तांना नोटीस देण्याचा व न्यायालयाकडे अर्ज करण्याचा अधिकार ;

---

[1] मुंबई धर्मादाय आयुक्त (विभागीय पुनर्रचना) आदेश, १९६० अनुसूची अन्वये " काम करण्याचा मिळालेला अधिकार " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई " हा शब्द वगळण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३६ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१][ * * * * * ]

(प) विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करणे आणि अशी इतर कर्तव्ये व कामे पार पाडणे.

धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याच्या निष्कर्षाविरूद्ध अपिले.

**७०.** (१) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त याच्या [२][ निष्कर्षाविरूद्ध किंवा आदेशाविरूद्ध ] पुढील बाबतीत धर्मादाय आयुक्ताकडे अपील करता येईल :—

(अ) कलम २० खालील निष्कर्ष [३][ व आदेश, तसा असल्यास ] ;

(ब) कलम २२ खालील निष्कर्ष ;

[४][ (ब-१) कलम २२-अ खालील निष्कर्ष ] ;

(क) कलम २८ खालील निष्कर्ष ;

(ड) कलम ५४ पोट-कलम (३) खालील आदेश ;

[५][ (ई) कलम ७९-अअ अन्वये, अभिलेख कायम करणारा किंवा त्यात सुधारणा करणारा आदेश ] ;

(२) निष्कर्षाची नोंद करण्यात आल्यापासून किंवा यथास्थिति, आदेश देण्यात आल्यापासून साठ दिवसांची मुदत संपल्यानंतर, कोणतेही अपील चालविता येण्याजोगे राहणार नाही.

(३) धर्मादाय आयुक्तास, अपीलदाराचे किंवा त्याच्या वतीने हजर राहणा-या कोणत्याही व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून ज्याविरूद्ध अपील करण्यात आले असेल असा निष्कर्ष किंवा आदेश विलोपित करता येईल, तो बदलता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा त्यास, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास अधिक चौकशी करण्याविषयी किंवा त्यास आवश्यक वाटेल असा आणखी पुरावा घेण्याविषयी निदेश देता येईल किंवा त्यास स्वतःस असा आणखी पुरावा घेता येईल.

धर्मादाय आयुक्ताने धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडील अभिलेख व कामकाज मागविणे व ते तपासणे.

[६][ **७०-अ** (१) धर्मादाय आयुक्तास कलम ७० मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकरणात, [७][ एक तर स्वतः होवून किंवा अर्ज केल्यावर ] कोणत्याही धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने अभिलिखित केलेल्या किंवा काढलेल्या कोणत्याही निष्कर्षाच्या किंवा आदेशाच्या अचूकपणा विषयी स्वतःची खात्री करुन घेण्यासाठी, धर्मादाय उप-आयुक्तापुढील किंवा सहायक धर्मादाय आयुक्तापुढील अशा प्रकरणाचे अभिलेख व कामकाज मागविता येईल, ते तपासता येईल, आणि त्यास असा निष्कर्ष किंवा आदेश विलोपित करता येईल, तो बदलता येईल, त्यात फेरफार करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास अधिक चौकशी करण्याविषयी किंवा त्यास आवश्यक वाटेल असा आणखी पुरावा घेण्याविषयी निदेश देता येईल किंवा त्यास स्वतःस असा आणखी पुरावा घेता येईल :

परंतु, ज्याच्यावर त्यामुळे परिणाम होणार असेल अशा पक्षास आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यावाचून, धर्मादाय आयुक्ताने असे कोणतेही आदेश अभिलिखित करता कामा नयेत किंवा काढता कामा नयेत.

---

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याच्या कलम ८ अन्वये खंड (ओ) वगळण्यात आला.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १५ (एक) अन्वये " निष्कर्षाविरुद्ध " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५ (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, याच्या कलम ७ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९७१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ४४ अन्वये खंड ई. जादा दाखल करण्यात आला.

[६] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, याच्या कलम ८ अन्वये कलम ७०-अ समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ४५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे, धर्मादाय आयुक्तास पुढील बाबतीत कोणत्याही प्रकरणाचे अभिलेख मागविण्याचा आणि ते तपासण्याचा हक्क असणार नाही :—

(अ) अशा प्रकरणात सहायक धर्मादाय आयुक्ताने किंवा धर्मादाय उप-आयुक्ताने अभिलिखित केलेल्या निष्कर्षाविरूद्ध कलम ७० अन्वये ज्या मुदतीत अपील करता येते त्या मुदतीत, अथवा

(ब) कलम ७० किंवा ७१ अन्वये केलेल्या अपिलात किंवा कलम ७२ अन्वये केलेल्या अर्जावर आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत ].

**७१.** (१) धर्मादाय आयुक्ताच्या, दावा दाखल करण्यास संमती नाकारणा-या निर्णयाविरूद्ध कलम ५१ पोट-कलम (२) अन्वये [१][विभागीय आयुक्ताकडे ] करावयाचे अपील, अशा निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात करण्यात येईल व त्यासोबत विहित करण्यात येईल अशी फी देण्यात येईल.

[१][विभागीय आयुक्ताकडे] अपील करणे.

(२) [१][विभागीय आयुक्तास ], त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, धर्मादाय आयुक्ताचा निर्णय कायम करता येईल किंवा तो रद्द करता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल.

(३) [१][विभागीय आयुक्ताचा ], निर्णय अंतिम व निर्णायक असेल.

**७२.** (१) कलम ४०, ४१, [२][ ४१-क आणि ४३ (२) (अ) आणि (क) ], [३][ ५०-अ ], [४][ ७० किंवा ७०-अ ] वगैरे खालील किंवा [५][ एखादी विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा कसे आणि अशी विश्वस्तव्यवस्था ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे ], किंवा कोणतीही मालमत्ता [६][* *] अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे या प्रश्नासंबंधी धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या निर्णयामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, उक्त निर्णय रद्द करण्याविषयी न्यायालयाकडे अर्ज करता येईल.

कलमे ४० ४१, [२][ ४१-क आणि ४३ (२) (अ) आणि (क)], [३][५०-अ], [४][७० किंवा ७०-अ ] वगैरे खालील धर्मादाय आयुक्ताच्या निर्णयाविरुद्ध अर्ज.

---

[१] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, याच्या कलम ३ अन्वये "महाराष्ट्र महसूली न्यायाधिकरणाकडें " या ऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक भेदांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ४६ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३७ (अ) अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, कलम ९ (१) अन्वये " किंवा ७० " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम १९ (एक) अन्वये " अशी विश्वस्तव्यवस्था सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १९ (दोन) अन्वये " विभाग ४ अन्वये " हा मजकुर वगळण्यात आला.

[७] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३७ (क) अन्वये " ४१ किंवा ७० " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ (१-अ) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय आयुक्त याने जो पुरावा दाखल करून घेणे आवश्यक होते तो पुरावा दाखल करून घेण्याचे नाकारले असेल किंवा निर्णय देणे शक्य व्हावे यासाठी कोणतेही कागदपत्र हजर करणे किंवा कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करणे न्यायालयास आवश्यक वाटेल किंवा, इतर कोणत्याही महत्त्वाच्या कारणावरून, असा आणखी पुरावा सादर करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे असे न्यायालयास वाटेल त्याशिवाय, अशा अर्जातील कोणत्याही पक्षकारास आणखी कोणताही तोंडी किंवा लेखी जादा पुरावा न्यायालयापुढे हजर करण्याचा हक्क असणार नाही :

परंतु, जेव्हा जेव्हा आणखी पुरावा सादर करण्यास न्यायालयाने परवानगी दिली असेल तेव्हा तेव्हा न्यायालय तो दाखल करून घेण्याबद्दलचे कारण अभिलिखित करील.

(२) [2][ कोणताही पुरावा असल्यास ] तो दाखल करून घेतल्यावर न्यायालयास उक्त निर्णय कायम करता येईल, रद्द करता येईल किंवा त्यात फेरफार करता येईल किंवा अधिभार म्हणून लादलेली रक्कम माफ करता येईल आणि खर्च देण्यासंबंधी परिस्थितिनुरुप त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये अर्ज निकालात निघेपर्यंत, निर्णयामुळे आपल्यावर अन्याय झालेला आहे असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती स्थगिती आदेश मिळविण्यासाठी सकृतदर्शनी ग्राह्य होतील अशी कारणे दाखविल तर, अधिभाराची रक्कम भरण्यासंबंधी सर्व कार्यवाही स्थगित करण्यात येईल.

(४) पोट-कलम (२) अन्वये न्यायालयाने दिलेला निर्णय हा, जणू ज्या हुकुमनाम्याविरूद्ध सर्वसाधारणपणे अपील करता येते असा एक हुकूमनामाच आहे असे समजून, त्याविरूद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

[3][ **स्पष्टीकरण.**—ह्या कलमातील " निर्णय " या शब्दप्रयोगात, कलम ५०-अ अन्वये तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या योजनेचा समावेश होईल.]

चौकशी करणा-या अधिका-यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

**७३.** या अधिनियमाखालील चौकशी करताना, अशी चौकशी करणा-या अधिका-यास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये कोणताही दावा चालविताना न्यायालयांकडे पुढील बाबतीत जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील.— १९०८ चा ५.

(अ) शपथपत्रावरून गोष्टी सिद्ध करणे ;

(ब) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलाविणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे व शपथेवर तिची तपासणी करणे ;

[4][ (क) दस्तऐवज शोधून काढण्याचा आणि निरीक्षण करण्याचा आदेश देणे आणि ते सादर करण्यास भाग पाडणे ] ;

(ड) राजादेश काढणे.

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९, याच्या कलम ९ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ९ (३) अन्वये " त्यास आवश्यक वाटेल असा साक्षीपुरावा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३७ (ब) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० कलम ४७ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड (क) दाखल करण्यात आला.

[1][ **७३-अ.** या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असणा-या कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर, चौकशी करणारा अधिकारी आदेश देईल अशा अटींवर व शर्तीवर, अशा कार्यवाहीतील पक्षकार म्हणून त्या व्यक्तीला दाखल करून घेता येईल.] कार्यवाहीतील पक्षकार म्हणून व्यक्तींना दाखल करून घेण्याचा चौकशी अधिका-याचा अधिकार.

१८६० चा ४५. **७४.** या अधिनियमाखालील सर्व चौकशा व अपिले ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ व २२८ यांच्या अर्थानुसार, न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल. चौकशा न्यायिक चौकशा असणे.

[2][ **७४-अ.** जेव्हा राज्य शासन तसा निदेश देईल तेव्हा, धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह-आयुक्त किंवा लेखा संचालक, किंवा कोणताही धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हा, *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ ची कलमे ४८० व ४८२ यांच्या अर्थानुसार दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.] (१८९८ चा ५.) फौजदारी प्रक्रिया संहितेची कलमे ४८० व ४८२ यांच्या अर्थानुसार धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह-आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त, इ . दिवाणी न्यायालय असल्याचे मानणे.

१९०८ चा ९. **७५.** या प्रकरणान्वये अपिलासाठी दिलेली मुदत मोजताना, भारताचा मुदतीबाबत अधिनियम, १९०८ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी, अशी अपिले दाखल करण्याच्या बाबतीत लागू असतील. मुदत.

**७६.** या अधिनियमात असलेल्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत असलेल्या तरतुदी सोडून दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदी न्यायालयापुढील या अधिनियमाखालील सर्व कार्यवाहीच्या बाबतीत लागू असतील. (१९०८ चा ५.) [3][न्यायालयापुढील] या अधिनियमाखालील कार्यवाहीस दिवाणी प्रक्रिया संहिता लागू असणे.

---

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ४८ अन्वये ७३ अ हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४९ अन्वये ७४ अ हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३८ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

* आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चार) पहा.

कलमे १८, [५][२०, ४१, [३]* ७९-अ, ७९-क किंवा ७९कक] अन्वये किंवा नियमान्वये येणे असलेल्या रकमांची वसुली.

**७७.** कलम १८, [१][ २०], ४१, [२][ [३]* ७९-अ, [४][ ७९ क किंवा ७९-कक]] या अन्वये किंवा कोणत्याही नियमान्वये देय असलेल्या सर्व रकमा, जर दिल्या नाहीत तर, कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतील.

---

## प्रकरण बारा

### किरकोळ

धर्मादाय आयुक्त आणि इतर अधिकारी [७]* * * हे लोकसेवक असणे.

**७८.** या अधिनियमान्वये नेमलेले धर्मादाय आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त व सहायक धर्मादाय आयुक्त, [६][लेखा संचालक आणि सहायक लेखा संचालक ] निरीक्षक व इतर दुय्यम अधिकारी [७]* * * हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

एखादी मालमत्ता ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता म्हणून ठरविण्यासंबंधीचा निर्णय.

**७९.** (१) [८][ एखादी विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा नाही आणि अशी विश्वस्तव्यवस्था ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे ] किंवा विशिष्ट मालमत्ता ही अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे या संबंधीच्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा अपिलाच्या बाबतीत धर्मादाय आयुक्त करील.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम १६ (अ) अन्वये हा आकडा समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम २० अन्वये " किंवा ४८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५० अन्वये " ४८ " हा आकडा वगळण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम १६ (ब) अन्वये " किंवा ७९-अ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, याचे कलम ३, दुसरी अनुसूची अन्वये " ४१, ४८,७९-अ किंवा ७९-क " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याच्या कलम ९ अन्वये " व न्याय सहायक " हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, कलम २१, (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा अपिलाच्या बाबतीत यथास्थिति धर्मादाय आयुक्त याने दिलेला निर्णय हा [1][अर्ज केल्यानंतर] न्यायालयाच्या निर्णयाद्वारे किंवा [2][* *] अपिलात उच्च न्यायालयाच्या निर्णयाद्वारे रद्द करण्यात आला नसेल, तर अंतिम व निर्णायक असेल.

[3][**७९-अअ.** (१) जेव्हा कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात ठेवलेल्या कोणत्याही अभिलेखास कोणत्याही कारणाने हानी पोचली असेल किंवा ते नष्ट झाले असतील आणि त्यांची पुनर्रचना करण्यात आली असेल तेव्हा, सहायक धर्मादाय आयुक्तास किंवा धर्मादाय उप-आयुक्तास **राजपत्रात** व तसेच संबंधित प्रदेशात मोठ्या प्रमाणावर खप असलेल्या कोणत्याही वर्तमानपत्रात विहित नमुन्यात प्रसिद्ध केलेल्या नोटिशीद्वारे, अभिलेखाच्या पुनर्रचनेसंबंधीची वस्तुस्थिती जाहीर करता येईल आणि ज्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांची अशा पुनर्रचित अभिलेखात नोंद असेल त्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांमध्ये हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना, असे अभिलेख अंतिम आणि निर्णायक का मानण्यात येऊ नयेत याबद्दल, **राजपत्रात** नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत लेखी कारण दाखविण्यास फर्माविता येईल. अशा नोटिशीची एक प्रत अशा विश्वस्तव्यवस्थांच्या विश्वस्तांनासुद्धा पाठविता येईल.

पुनर्रचित-अभिलेखांस अंतिम स्वरुप देण्याचा अधिकार.

(२) उपरोक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर, सहायक धर्मादाय आयुक्ताने किंवा धर्मादाय उप-आयुक्ताने, विश्वस्तांचे आणि हितसंबंध असलेल्या व्यक्ती, असल्यास, तशा व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि आक्षेपांचा व दाखल केलेले दस्तऐवज असल्यास, अशा दस्तऐवजांचा यथोचितरित्या विचार केल्यानंतर आणि आवश्यक असेल तर, चौकशी केल्यानंतर, आपले निष्कर्ष त्याबद्दलच्या कारणांसह नमूद केले पाहिजेत आणि तद्नुसार, अभिलेखातील कोणत्याही नोंदीसह त्या अभिलेखास एकतर अंतिम स्वरुप दिले पाहिजे किंवा त्यात सुधारणा केली पाहिजे. अशा रीतीने अंतिम स्वरुप दिलेले किंवा सुधारलेले अभिलेख, ते जणू या अधिनियमान्वये केले किंवा ठेवले असल्याप्रमाणे, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन, अंतिम आणि निर्णायक असतील.]

[4][**७९-अ.** कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीत धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याने पक्षकार म्हणून, किंवा त्या कार्यवाहीच्या संबंधात त्यांनी केलेला सर्व खर्च, आकार व व्यय हे, कलम ७९-ब मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेतून किंवा निधीतून देण्यात येतील; परंतु ज्या बाबतीत असा खर्च व आकार व्यक्तिशः देण्याचे दायित्व कोणत्याही पक्षकारावर किंवा इतर व्यक्तीवर टाकण्यात आले असेल आणि या कलमाखालील प्रतिपूर्तीचा अधिकार स्पष्ट शब्दांत नाकारण्यात आला असेल त्या बाबतीत, असा खर्च व आकार अशा निधीतून देण्यात येणार नाही.]

धर्मादाय आयुक्त इ. नी. न्यायालयीन कार्यवाहीवर केलेला खर्च आणि व्यय यांची वसुली.

**७९-ब.** उच्च न्यायालय धरुन कोणत्याही न्यायालयाकडे या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही दाव्याचा, अपिलाचा, किंवा अर्जाचा किंवा त्यास आनुषंगिक असलेला खर्च, आकार व व्यय हा, अशा न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार ठरविण्यात येईल आणि अशा न्यायालयास, कलम ७९-अ मधील तरतुदींना अधीन राहुन, असा सबंध खर्च, आकार व व्यय किंवा त्यांचा कोणताही भाग, संबंधित सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेतून भागविण्यात यावा किंवा तो त्यास योग्य वाटेल अशा रीतीने व अशा व्यक्तींनी सोसावा व द्यावा असा निदेश देता येईल.

उच्च न्यायालय धरून इतर न्यायालयांपुढील कार्यवाहीचा खर्च.

---

[1] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम २१ (२) (एक) अन्वये " अपिलात " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (२) (दोन) अन्वये "आणखी " हा शब्द वगळण्यात आला.

[3] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५२ अन्वये हे कलम जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४, याच्या कलम २२ अन्वये कलमे ७९-अ-ते ७९-ड दाखल करण्यात आली.

धर्मादाय आयुक्त वगैरे पुढील कार्यवाहीचा खर्च.

**७९-क.** धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याच्या पुढील कोणत्याही अपिलाचा, अर्जाचा किंवा इतर कार्यवाहीचा व त्यास आनुषंगिक असलेला खर्च, आकार, किंवा व्यय, त्याच्या स्वेच्छानिर्णयानुसार ठरविण्यात येईल आणि, असा खर्च, आकार किंवा व्यय कोणी द्यावयाचा, किंवा कोणत्या मालमत्तेतून अगर निधीतून द्यावयाचा आणि किती द्यावयाचा हे ठरविण्याचा त्याला संपूर्ण अधिकार असेल.

धर्मादाय आयुक्त वगैरे यापुढे क्षुल्लक कारणावरुन किंवा त्रास देण्याच्या हेतूने दाखल केलेल्या कार्यवाही बद्दल भरपाई दाखल खर्च देणे.

[1][**७९-कक.** (१) [2][या अधिनियमाच्या तरतुदींन्वये केलेल्या चौकशीत धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे जर असे मत झाले की, ज्या अर्जावरुन अशी चौकशी सुरु करण्यात आली होती तो अर्ज क्षुल्लक कारणावरुन किंवा त्रास देण्याच्या हेतूने करण्यात आला आहे तर, धर्मादाय आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त किंवा यथास्थिति सहायक धर्मादाय आयुक्त] यास, ज्या व्यक्तीविरुद्ध असा अर्ज करण्यात आला होता त्या व्यक्तींच्या (जिला यात यापुढे "प्रतिवादी" असे म्हटले आहे), विनंतीवरुन अर्ज करणा-या व्यक्तीस, (जिला यात यापुढे "अर्जदार" असे म्हटले आहे), अर्जदाराने प्रतिवादीस भरपाई का देऊ नये याबद्दल कारण दर्शविण्यास फर्माविता येईल आणि अर्जदार हजर नसेल तर, तो हजर रहावा व वर सांगितल्याप्रमाणे त्याने कारण दर्शवावे म्हणून समन्स काढण्याबद्दल निर्देश देता येईल.

(२) उक्त अर्ज क्षुल्लक कारणावरुन किंवा त्रास देण्याच्या हेतूने करण्यात आला होता, याबद्दल धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त, किंवा यथास्थिति धर्मादाय आयुक्त याची खात्री झाली तर, त्यास कारणे नमूद करुन, तो ठरवील अशी [3][पाचशे रुपयांहून] अधिक नसेल अशी रक्कम अर्जदाराने प्रतिवादीस भरपाई द्यावी असा निर्देश देता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये भरपाई देण्याविषयी दिलेला आदेश हा धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने दिला असेल तर धर्मादाय आयुक्ताकडे आणि धर्मादाय आयुक्ताने दिला असेल तर, [4][महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे] याविरुद्ध अपील करता येईल आणि कलमे ७० व ७१ यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह, त्या अपिलास लागू होतील.]

अनुसूची ब अन्वये विहित केल्याप्रमाणे न्यायालय शुल्क देणे.

**७९-ड.** न्यायालय शुल्क अधिनियम, १८७० यांत काहीही अंतर्भूत असले तरी, या सोबत जोडलेल्या अनुसूची- ब चे स्तंभ १ व २ यांत वर्णन केलेल्या दस्तऐवजावर, उक्त अनुसूचीच्या तिस-या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या किंमतीचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावला पाहिजे]. १८७० चा ७.

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम १७ अन्वये कलम ७९-कक हे समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५३ (१) अन्वये " जर कलम १९ अन्वये " या मजकुराने सुरु होणा-या व " किंवा चॅरिटी कमिशनर " या मजकुराने संपणा-या भागाऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५३ (२) अन्वये " अडीचशे रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] महाराष्ट्र विधि अनुकूलन ( राज्य समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

**८०.** ह्या अधिनियमात स्पष्टपणे जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, ज्या कोणत्याही, प्रश्नाचा निर्णय किंवा त्याबाबत कार्यवाही या अधिनियमान्वये किंवा तद्नुसार, या अधिनियमाखाली काम करणा-या कोणत्याही अधिका-याने किंवा प्राधिका-याने करावयाची असेल, [1][आणि ज्या प्रश्नाच्या बाबतीत] अशा अधिका-याचा किंवा प्राधिका-यांचा निर्णय किंवा आदेश अंतिम व निर्णायक असेल त्या प्रश्नाचा निर्णय किंवा त्यावर कार्यवाही करण्यास कोणत्याही दिवाणी न्यायालयास अधिकारिता असणार नाही. अधिकारितेस आडकाठी.

**८१.** [2][** ] या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, राज्य शासन किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी [3][ किंवा धर्मादय आयुक्ताचा प्रतिनिधी ] याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही. दावे व कार्यवाही यापासून क्षतिपूर्ती.

[4][* * * * *]

**८२.** इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकारी याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमान्वये, शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता येणार नाही. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी.

**८३.** या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल दाखल करावयाचा कोणताही खटला, धर्मादाय आयुक्तांच्या पूर्वमंजुरीवाचून दाखल करता येणार नाही. खटला दाखल करण्याकरिता धर्मादाय आयुक्तांची पूर्वमंजुरी आवश्यक असणे.

**८४.** (१) राज्य शासनास या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याकरिता नियम करता येतील. नियम

(२) विशेषकरुन व वरील तरतुदीच्या सामान्यतेस बाध येऊ न देता, असे नियम पुढील सर्व किंवा यापैकी कोणत्याही बाबीसाठी करता येतील :——

(अ) कलम १, पोट-कलम (४) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्याची रीत;

[5][(अअ) कलम ६ अन्वये नेमण्यात येणा-या लेखा संचालकाच्या व सहायक लेखा संचालकाच्या अर्हता;]

(ब) धर्मादाय आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त व सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या व्यतिरिक्त या अधिनियमान्वये नेमण्यात येणा-या इतर अधिका-याचे ह्या अधिनियमात तरतूद केलेले असतील असे अधिकार, कर्तव्ये व कामे यांखेरीज, आणखी इतर अधिकार, कर्तव्ये व कामे;

(क) या अधिनियमान्वये तरतूद केलेले असतील असे अधिकार, कर्तव्ये व कामे यांखेरीज न्याय सहायकांचे आणखी इतर अधिकार कर्तव्ये व कामे;

---

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५४ अन्वये " किंवा ज्या प्रश्नाच्या बाबतीत " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या क्रमांक ५५ (१) अन्वये "(१)" हा आकडा वगळण्यात आला.

[3] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, याच्या कलम ५ अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ५५ (२) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[5] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३९ (अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(ड) कलम १४, पोट-कलम (१) अन्वये विहित करावयाच्या प्रदेश व उप प्रदेश यांच्या हद्दी;

(ई) कलम १७ अन्वये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात ठेवावयाची व सुस्थितीत ठेवावयाची पुस्तके, निर्देशसूच्या व नोंदवह्या आणि अशा पुस्तकात, निर्देशसूच्यांमध्ये व नोंदवह्यात दाखल करावयाचा तपशील;

(फ) कलम १८ अन्वये, ज्या नमुन्यात सार्वजनिक विश्‍ वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज करावयाचा तो नमुना, त्याकरिता द्यावयाची फी, त्यात दाखल करावयाचा इतर तपशील आणि अशा नोंदणीसाठी करावयाच्या अर्जावर ज्या रीतीने सही करुन तो सत्यापित करावयाचा ती रीत आणि ज्या विश्वस्त मालमत्तेसंबंधी तपशील देणे आवश्यक नसेल तिचे मूल्य आणि तिचे स्वरुप;

(ग) कलम १९ व ३९ अन्वये धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याने ज्या रीतीने चौकशी करावयाची ती रीत;

(ह) [१][विश्वस्ताने] [२][कलम २२, पोट-कलम (१) अन्वये] बदलासंबंधी ज्या नमुन्यात अहवाल पाठवावयाचा तो नमुना, [२][आणि कलम २२, पोट-कलम (२) अन्वये चौकशी करण्याची रीत];

(आय) धर्मादाय-उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याने, कलम २३ अन्वये ज्या पुस्तकात नोंद केली पाहिजे ते पुस्तक;

[३][ (जे) नोंदणीसाठी विश्वस्तांनी आणि धर्मादाय उप-आयुक्ताने व सहायक धर्मादाय आयुक्ताने पाठवावयाच्या ज्ञापनाचा नमुना [४][ आणि ज्ञापनावर ज्या रीतीने सही करुन ते सत्यापित करावयाचे ती रीत];

[५][ (जे-१) कलम २८, पोट-कलम (१) अन्वये करावयाची चौकशी;

(जे-२) कलम ३१-अ, पोट-कलम (१) अन्वये, एखाद्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वार्षिक उत्पन्नाची रक्कम ज्या रकमेपेक्षा अधिक झाल्यास ती विश्वस्तव्यवस्था अर्थसंकल्प तयार करण्यास आणि सादर करण्यास पात्र ठरेल ती रक्कम आणि अशा अर्थसंकल्पाचा नमुना किंवा नमुने;]

(के) कलम ३३, पोट-कलम (२) अन्वये हिशेबात दाखल करावयाचा तपशील आणि कलम ३३ अन्वये विशेष लेखा परीक्षेसाठी द्यावयाची फी;

[६][ (के-१) कलम ४१-ब, पोटकलम (५) अन्वये खर्च देण्याची रीत;

[७][ * * * * *]

[८][ (म-१) कलम ५०-अ, पोट-कलम (१) अन्वये अर्ज करण्याची रीत;]

(न) कलम ५०-अ, पोट कलम (२) अन्वये लेखे ज्या नमुन्यात सादर करावयाचे तो नमुना आणि पोट-कलम (३) अन्वये आदेश देण्याची रीत;

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४७, याच्या कलम ४ अन्वये " प्रति चॅरिटी कमिशनरने किंवा सहायक चॅरिटी कमिशरनने " या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५६ (१) अन्वये " कलम २२ अन्वये " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, याच्या कलम ९ अन्वये खंड (जे) दाखल करण्यात आला.

[४] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ३९ (ब) अन्वये " कलम २८-ब अन्वये " हा या मजकुराने सुरु होणा-या व द्यावयाची फी या मजकुराने संपणा-या भागाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५६ (२) अन्वये खंड (जे-१) व (जे-२) समाविष्ट करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५६ (३) अन्वये (के-१) हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ५६ (४) अन्वये खंड (ल-१) व (म) वगळण्यात आले.

[८] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३९ (अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(ओ) कलम ५५, पोट-कलम (१) अन्वये विश्वस्तांना निदेशासाठी ज्या मुदतीत न्यायालयाकडे अर्ज करता येईल ती मुदत;

[1](ओ-१) कलम ५६-ई, पोट-कलम (२) अन्वये ज्या शर्तीस व निर्बंधास अधीन राहून समिती मालमत्तेविषयी व्यवहार करील त्या शर्ती व ते निर्बंध;

(ओ-२) कलम ५६-आय, पोट कलम (२) अन्वये समितीचा अध्यक्ष, कोषाध्यक्ष आणि सदस्य यास द्यावयाचे मानधन, किंवा फी व भत्ते [2][आणि ज्या रीतीने] असे मानधन किंवा फी व भत्ते देण्यात येतील ती रीत;

(ओ-३) कलम ५६-जे अन्वये, समितीची बैठक ज्या कालांतराने घेण्यात येईल ती मुदत व समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ओ-४) कलम ५६-ई, अन्वये, समितीचे चिटणीस व अधिकारी यांच्या नेमणुका सेवेच्या ज्या अटींवर व शर्तीवर करण्यात येतील त्या अटी व शर्ती; [3][* * *]

[4][(ओ-५) कलम ५६-झेड झेड, अन्वये, व्यवस्थापन निधीची अभिरक्षा व गुंतवणूक त्यांमधून रकमांचे वितरण व प्रदान आणि अशा निधीची लेखापरीक्षा या गोष्टीचे नियमन ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत;]

(प) [5][कलम ५८ अन्वये, प्रत्येक सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रतिवर्षी अंशदानाची जी रक्कम देईल ती रक्कम] व ती ज्या तारखेस व ज्या रीतीने देईल ती तारीख व ती रीत [6][आणि पोट-कलम (१) मधील स्पष्टीकरणान्वये ज्या रकामांची वजावट अनुज्ञेय असेल त्या रकमा, आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये एखादी विश्वस्तव्यवस्था ही सूट दिलेल्या विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गात मोडते किंवा नाही याबाबत राज्य शासनाचा निर्णय मिळविण्याची रीत] आणि कलम ६० अन्वये ज्या रीतीने असा निधी अभिरक्षेत ठेवण्यात येईल किंवा त्यातील रक्कम गुंतविण्यात येईल किंवा त्यातून पैसा वितरीत करण्यात येईल किंवा पैसे देण्यात येतील ती रीत;

[7][* * * * *]

(स) कलम ६८ अन्वये, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त याने वापरावयाचे इतर अधिकार आणि पार पाडावयाची इतर कर्तव्ये व कामें;

(ट) कलम ६९ अन्वये धर्मादाय आयुक्ताने वापरावयाचे इतर अधिकार आणि पार पाडावयाची इतर कर्तव्य व कामे;

(यू) कलम ७१ अन्वये, ज्या नमुन्यात अपील करावयाचे तो नमुना व असे अपील दाखल करण्याकरिता द्यावयाची फी;

(व्ही) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था प्रशासन निधीत जमा करावयाच्या रकमांची अभिरक्षा आणि त्या गुंतविणे आणि त्यातून पैसे वितरीत करणे किंवा देणे;

---

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३९ (ड) अन्वये खंड (ओ-१) ते (ओ-४) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम ७ (अ) अन्वये "आणि ज्या निधीतून" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) अन्वये "आणि ज्या निधीतून त्याची वेतन व भत्ते देण्यात येतील तो निधी" हा मजकूर वगळण्यात आला

[4] वरील अधिनियमाच्या कलम ७ (क) अन्वये खंड (ओ-५) समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ च्या कलम ६ अन्वये हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[6] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याच्या कलम १० अन्वये खंड (क्यू) व (२) वगळण्यात आले.

[१][(व्ही-१) कलम ७९-अअ, पोट कलम (१) अन्वये पुनर्रचित अभिलेखाच्या संबंधातील नोटिशीचा नमुना;]

(ब) या अधिनियमान्वये विहीत करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर बाब;

(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

[२][ (४) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन एकूण तीन दिवसांच्या कालावधीसाठी चालू असताना—मग हा कालावधी एकाच अधिवेशनातील असो किंवा लागोपाठ येणा-या दोन अधिवेशनातील असो-राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यात किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति अशा सुधारलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही; तथापि असे कोणतेही फेरफार किंवा सुधारणा यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.]

निरसन. **८५.** (१) धार्मिक दाननिधी अधिनियम, १८६३, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १८६३ चा २०.

(२) कलम १, पोट-कलम (४) अन्वये कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या कोणत्याही वर्गास या अधिनियमाच्या तरतुदी [३][लागू करण्यात आल्या असतील त्या तारखेस] [४][(जिचा या कलमात यापुढे "उक्त तारीख" असा निर्देश केला आहे)], [५][अनुसूची अ] मध्ये विनिर्दिष्ट केलेले जे अधिनियम अशा विश्वस्तव्यवस्थेस किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास लागू असतील त्याच्या तरतुदी अशा विश्वस्तव्यवस्थेस किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास लागू असण्याचे बंद होईल.

(३) [६][ या कलमात अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त अशा रीतीने अधिनियम निरसित केल्यामुळे ] किंवा तरतुदी लागू असण्याचे बंद झाल्यामुळे पुढील गोष्टीस कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही :—

(अ) [७][ उक्त दिनांकापूर्वी,] आधीच संपादन केलेला किंवा उपार्जित झालेला कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, किंवा पत्करलेले बंधन किंवा दायित्व,

(ब) असा अधिकार, हक्क, हितसंबंध, बंधन किंवा दायित्व यांच्या संबंधातील कोणतीही न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना; अथवा

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५६ (५) अन्वये खंड व्ही-१ समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (६) अन्वये पोट-कलम (४) ची भर घालण्यात आली.

[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १८ (१) (अ) अन्वये "लागू करण्यात आले असतील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८ (१) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ च्या कलम १७ अन्वये "अनुसूची" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १८ (२) अन्वये "अशा रीतीने अधिनियम रद्द केल्यामुळे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १८ (३) अन्वये "हा अधिनियम लागू करण्याची तारीख" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९२३ चा ४२. (क) [1][उक्त दिनांकापूर्वी ] योग्य रीतीने केलेली किंवा करु दिलेली कोणतीही गोष्ट.

१९३५ चा मुंबई १८. १९३५ चा मुंबई २५. १९३६ चा मुंबई २३. १९२३ चा ४२.

[2][(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी, [मुसलमान वक्फ (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३५ या अन्वये सुधारलेला ] मुसलमान वक्फ अधिनियम, १९२३, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३५ किंवा पारशी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३६ या अन्वये कोणत्याही प्राधिकरणापुढे उक्त तारखेच्या निकटपूर्वी चालू असलेले सर्व कामकाज धर्मादाय आयुक्ताकडे हस्तांतरीत करण्यात येईल आणि धर्मादाय आयुक्ताकडून किंवा धर्मादाय आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे धर्मादाय उप-आयुक्ताकडून किंवा यथास्थिति सहायक धर्मादाय आयुक्ताकडून असे कोणतेही कामकाज पुढे चालू ठेवण्यात येईल व ते निकालात काढण्यात येईल, असे कामकाज निकालात काढताना, धर्मादाय आयुक्त, धर्मादाय उप-आयुक्त किंवा यथास्थिति, सहायक धर्मादाय आयुक्त यास, [मुसलमान वक्फ (मुंबई सुधारणा) अधिनियम, १९३५ या अन्वये सुधारलेला] मुसलमान वक्फ अधिनियम, १९२३ अन्वये न्यायालयाकडे किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३५ आणि पारशी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३६ या अन्वये निबंधकाकडे जे अधिकार निहित करण्यात आले होते व ज्या अधिकाराचा ते वापर करीत होते तेच अधिकार असतील व तोच त्याच अधिकाराचा वापर करील आणि तो न्याय किंवा योग्य असतील असे आदेश देईल.

१९३५ चा मुंबई १७. १९३५ चा मुंबई २५. १९३६ चा मुंबई २३.

(५) पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये एखाद्या प्राधिकरणाने किंवा न्यायालयाने ठेवलेले सर्व अभिलेख धर्मादाय आयुक्ताकडे किंवा धर्मादाय आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात येतील.]

राज्याच्या इतर क्षेत्रात सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याचा प्रारंभ झाल्यामुळे इतर अधिनियमांचे निरसन व व्यावृत्ती.

१९६० चा मुंबई ६. [3][**८६.** (१) मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकत्रीकरण आणि सुधारणा) अधिनियम, १९५९ द्वारे, हा अधिनियम राज्याच्या ज्या क्षेत्राला लागू करण्यात आला असेल त्या क्षेत्रात या अधिनियमाच्या प्रारंभानंतर :—

१९६३ चा २०. (एक) राज्याच्या सौराष्ट्र व कच्छ प्रदेशात अंमलात असलेला धार्मिक दाननिधींबाबत अधिनियम, १८६३.

(दोन) राज्याच्या विदर्भ प्रदेशात अंमलात असलेला, मध्यप्रदेश धर्मादाय निधी अधिनियम, १९५१, आणि,

१९५१ चा म. प्र. १८. (तीन) ज्यांना प्रकरण ७-अ लागू असेल अशा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीचा कोणताही कायदा तो ज्या मर्यादेपर्यंत या अधिनियमाच्या तरतुदींशी अनुरुप असेल त्या मर्यादेपर्यंत होतील. निरसित—

---

[1] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम १८ (२) अन्वये " हा अधिनियम लागू करण्याची तारीख " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १८ पोट-कलम (३) अन्वये पोट-कलमे (४) व (५) याची भर घालण्यात आली.

[3] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४० अन्वये या कलमाची भर घालण्यात आली.

(२) या अधिनियमाच्या तरतुदी, कलम १, पोट-कलम (४) अन्वये कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास ज्या दिनांकास (जिचा या कलमात यापुढे उक्त तारीख म्हणून निर्देश केला आहे) लागू करण्यात येतील त्या तारखेस, अनुसूची 'अअ' मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या ज्या तरतुदी अशा विश्वस्तव्यवस्थेस किंवा विश्वस्तव्यवस्थांच्या वर्गास लागू आहेत त्या तरतुदी त्या विश्वस्तव्यवस्थेस किंवा विश्वस्तव्यवस्थेच्या वर्गास लागू असण्याचे बंद होईल.

(३) या कलमात अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त अधिनियम अशा रीतीने निरसित केल्यामुळे किंवा लागू असण्याचे बंद झाल्यामुळे पुढील गोष्टीस कोणत्याही प्रकारे बाध येणार नाही—

(अ) याद्वारे निरसित करण्यात आलेल्या किंवा लागू असण्याचे बंद झालेल्या कायद्याअन्वये उक्त तारखेपूर्वी योग्य रीतीने केलेली किंवा करु दिलेली कोणतीही गोष्ट;

(ब) याद्वारे अशा रीतीने निरसित केलेल्या किंवा लागू असण्याचे बंद झालेल्या कोणत्याही कायद्याअन्वये उक्त तारखेपूर्वी अगोदरच संपादन केलेल्या किंवा उपार्जित झालेला कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध किंवा पत्करलेले बंधन किंवा दायित्व;

(क) असा अधिकार, हक्क, हितसंबंध, बंधन किंवा दायित्व यांच्या संबंधातील कोणतीही न्यायालयीन कार्यवाही किंवा उपाययोजना :

परंतु असे की, अनुसूची अअ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही न्यायालयापुढे, ज्यात राज्य शासन, आयुक्त, निबंधक किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी पक्षकार आहे अशी कोणतीही न्यायालयीन कार्यवाही, उक्त तारखेस अनिर्णीत असेल तर अशा न्यायालयीन कार्यवाहीत, राज्य शासन, आयुक्त, निबंधक किंवा यथास्थिति, असा अधिकारी यांच्याऐवजी धर्मादाय आयुक्त हा, पक्षकार आहे असे मानण्यात येईल आणि असे न्यायालय अशी कार्यवाही निकालात काढील :

परंतु आणखी असे की, मध्यप्रदेश धर्मादाय निधी अधिनियम, १९५१, अन्वये कोणत्याही फौजदारी न्यायालयात अनिर्णीत असलेली प्रत्येक कार्यवाही पोट-कलम (१) अन्वये तो अधिनियम निरसित केल्यानंतर समाप्त होईल. १९५१ चा म. प्र. १८.

(४) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूची अअ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये कोणत्याही प्राधिका-यासमोर (न्यायालय वगळून) उक्त तारखेच्या निकटपूर्वी अनिर्णीत असलेल्या सर्व कार्यवाह्या, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (एकत्रीकरण व सुधारणा) अधिनियम, १९५९ हा संमत झाला नव्हता असे समजून त्या अधिनियमान्वये [1][अशा प्राधिका-याकडून] पुढे चालू ठेवण्यात येतील व निकालात काढण्यात येतील. १९६० चा महा. ६.

(५) अनुसूची कक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमाचा अंमल बंद झाला असला तरीही अशा कोणत्याही अधिनियमान्वये देय असलेल्या अंशदानांची व इतर रकमांची सर्व थकबाकी ही, जणूकाही ती या अधिनियमाच्या तरतुदीन्वये वसूल करण्याजोगी थकबाकी आहे असे समजून, या अधिनियमाच्या तरतुदीन्वये वसूल करण्यात येईल.

(६) मध्यप्रदेश सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५१, अन्वये निबंधकाने ठेवलेले सर्व अभिलेख, धर्मादाय आयुक्ताकडे, किंवा धर्मादाय आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे धर्मादाय उप-आयुक्ताकडे किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताकडे हस्तांतरित करण्यात येतील. १९५१ चा म. प्र. ३०.

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ५७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

८७. या अधिनियमातील कोणताही मजकूर— ज्यास सन १९५४ चा अधिनियम क्रमांक २९ लागू असेल अशा विवक्षित वक्फांना किंवा सन १९५६ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ३७ द्वारे शासित अशा गुरुद्वारांना हा अधिनियम लागू नसणे.

१९५४ चा २९. (अ) ज्यांना वक्फांबाबत अधिनियम, १९५४ च्या तरतुदी लागू असण्याचे चालू असेल अशा राज्यांच्या विवक्षित क्षेत्रातील वक्फ, किंवा

१९५६ चा हैद्राबाद ३७. (ब) नांदेड शीख गुरुद्वार सचखंड श्री. हुजूर अपचलनगरसाहेब अधिनियम, १९५६ अन्वये ज्याचा कारभार चालविण्यात येतो असे नांदेड गुरुद्वार;

यांस लागू होणार नाही.

८८. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास **शासकीय राजपत्रात** आदेश प्रसिद्ध करुन अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक व इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदीशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल.] अडचणी दूर करण्याबाबत तरतूद.

[1][**अनुसूची अ**]

(कलमे २८, ६१ [2]* व ८५ पहा)

१९२० चा १४. १. धर्मादाय व धार्मिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९२०.

१९३५ चा ४२. २. सन १९३५ चा मुंबई अधिनियम, १८ या अन्वये सुधारलेला, मुसलमान वक्फ अधिनियम, १९२३.

१९३५ चा मुंबई २५. ३. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३५.

१९३६ चा मुंबई २३. ४. पारशी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी अधिनियम, १९३६.

१८६३ चा २०. ५. बडोदे सार्वजनिक संस्था अधिनियम (संवत १९६१ चा बडोदे अधिनियम क्रमांक ६).

६. १८९० साली जमखंडी संस्थानास लागू केलेला, धार्मिक देणग्यांबाबत अधिनियम, १८६३.

७. सन १९४८ चा जमखंडी अधिनियम क्रमांक १ अन्वये सुधारलेले, जमखंडी संस्थानचे देवस्थानासंबंधी नियम, १९१२.

---

[1] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम २३ अन्वये "अनुसूची" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ३ द्वितीय अनुसूची अन्वये "६४" हा आकडा व स्वल्पविराम वगळण्यात आले.

## [1][अनुसूची अअ

१. पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्राव्यतिरिक्त, राज्याच्या इतर क्षेत्रात लागू असलेला, धर्मादाय व धार्मिक विश्वस्तव्यवस्थांबाबत अधिनियम, १९२०. १९२० चा १४.

२. सावंतवाडी देवस्थान अधिनियम, १९३२.

३. (हैद्राबाद) देणगी विनियम, १३४९ फसली. १९५१ चा म. प्र. २०.

४. मध्यप्रदेश सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५१.]

## [2][अनुसूची ब

(कलम ७९ ड पहा)

| कलम (१) | | दस्तऐवजाचे वर्णन (२) | किंमत (३) |
|---|---|---|---|
| १८ | (१) | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी अर्ज | रु. १०० |
| २२ | (१) | कलम १७ अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत केलेल्या नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत केलेला किंवा प्रस्तावित केलेला बदल कळविणे. | रु. १०० |
| २५ | (१) | कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात, धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यापैकी कोणत्या धर्मादाय उप-आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने कलम १९ किंवा २२ अन्वये चौकशीचे काम चालवावयाचे हे ठरविण्यासाठी सार्वजनिक विश्वस्तव्यस्थेत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| २९ | | मृत्यूपत्र व्यवस्थापकाने, अशा मृत्यूपत्रान्वये निर्माण केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या नोंदणीसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ३५ | | विश्वस्तव्यवस्थेचा पैसा इतर कोणत्याही रीतीने गुंतविण्याकरिता धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीसाठी करावयाचा अर्ज— | |
| | | (अ) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. ५० |
| | | (ब) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. १०० |
| | | (क) गुंतवणूक करावयाची रक्कम रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत; | रु. १५० |

[1] सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ४१ अन्वये ही अनुसूची समाविष्ट करण्यात आली.

[2] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ४ अन्वये ‘ ब ’ ऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.

**अनुसूची ब**—चालू

| (१) | | (२) | (३) |
|---|---|---|---|
| ३६ | (१) | पुढील गोष्टींसाठी धर्मादाय आयुक्तांची मंजुरी मिळविण्याकरिता करावयाचा अर्ज— | |
| | | (अ) स्थावर मालमत्तेची विक्री करणे, तिची अदलाबदल करणे किंवा ती देणगी म्हणून देणे— | |
| | | (एक) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. ५० |
| | | (दोन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. १५,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. १०० |
| | | (तीन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत; | रु. २५० |
| | | (ब) स्थावर मालमत्ता पट्टयाने देणे— | |
| | | (एक) वसूल केलेले सरासरी वार्षिक भाडे रु. ५०० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. २५ |
| | | (दोन) वसूल केलेले सरासरी वार्षिक भाडे रु. ५०० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. ५० |
| | | (तीन) वसूल केलेले सरासरी वार्षिक भाडे रु. १,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत; | रु. १०० |
| | | (क) स्थावर मालमत्तेची विल्हेवाट लावण्याची विश्वस्तांना पुढील बाबतीत प्राधिकृत करणे— | |
| | | (एक) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. २५ |
| | | (दोन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. १०० |
| | | (तीन) अंतर्भूत मालमत्तेची किंमत रु. १५,००० पेक्षा अधिक असेल असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत; | रु. १५० |
| ३६ | (२) | कलम ३६, पोट-कलम (१) च्या खंड (अ) किंवा (ब) या अन्वये धर्मादाय आयुक्ताने दिलेली मंजुरी रद्द करण्याकरिता अर्ज. | रु. १०० |
| ३६अ | (३) | पैसा कर्जाऊ घेण्यासाठी विश्वस्ताने करावयाचा अर्ज— | |
| | | (एक) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. २५ |
| | | (दोन) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. ५,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १५,००० पेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत; | रु. १०० |
| | | (तीन) कर्जाऊ घ्यावयाची रक्कम रु. १५,००० पेक्षा अधिक असेल अशा इतर कोणत्याही बाबतीत; | रु. १५० |

**अनुसूची ब**—चालू

| (१) | | | (२) | (३) |
|---|---|---|---|---|
| ४१ | ब | (१) | तक्रारीचा अंतर्भाव असलेला, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत हितसंबंध असणा-या व्यक्तीने चौकशी करण्यासंबंधी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ४१ | ड | (१) | विश्वस्ताला काढून टाकण्यासाठी किंवा बडतर्फ करण्यासाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ४१ | ई | (१) | कलम ४१ ई (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी द्यावयाच्या तात्पुरत्या निषेधाज्ञेसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ४७ | | (१) | कलम ४७, पोट-कलम (१) खालील अर्ज | रु. १०० |
| ४७ | | (५) | उच्च न्यायालयाकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ५०-अ | | | योजना तयार करण्यासाठी किंवा तीत फेरफार करण्यासाठी धर्मादाय आयुक्त यांच्याकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५१ | | (१) | कलम ५० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरुपाचा दावा दाखल करण्याची संमती मिळविण्यासाठी धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५५ | | | निदेशांकरिता न्यायालयाकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५६ | अ | | अभिप्राय, सल्ला किंवा निदेश यांसाठी करावयाचा अर्ज. | रु. १०० |
| ५९ | | (३) | एखाद्या बँकेने किंवा व्यक्तीने, आपल्याजवळ जमा असलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या पैशातून अंशदान देण्याविषयी धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या आदेशाविरुद्ध, राज्य शासनाकडे करावयाचे अपिल. | रु. १०० |
| ७० | | (१) | कलम २०, २२ किंवा २८ खालील धर्मादाय उप-आयुक्ताच्या किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताच्या निष्कर्षाविरुद्ध किंवा त्याने कलम ५४, पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध, धर्मादाय आयुक्ताकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७० | अ | | कलम ७०-अ खालील अर्ज. | रु. १०० |
| ७१ | | (१) | दावा दाखल करण्यासाठी परवानगी नाकारणा-या, धर्मादाय आयुक्ताच्या निर्णयाविरुद्ध विभागीय आयुक्ताकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७२ | | (१) | कलम ४०, ४१, ४१अ, ४३ (२) (अ) व (क) किंवा ७० अन्वये, किंवा, एखादी विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा कसे व अशी विश्वस्तव्यवस्था सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे किंवा कोणतीही मालमत्ता अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे या प्रश्नासंबंधी धर्मादाय आयुक्ताने दिलेल्या निर्णयाविरुद्ध न्यायालयाकडे करावयाचा अर्ज. | रु. १०० |

**अनुसूची ब**—चालू

| (१) | | (२) | (३) |
|---|---|---|---|
| ७२ | (४) | कलम ७२, पोट-कलम (२) अन्वये न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे करावयाचे अपील. | रु. १०० |
| ७३ | अ | सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेमध्ये हितसंबंध असलेल्या व्यक्तीने, या अधिनियमाखालील कार्यवाहीत पक्षकार म्हणून सामील होण्यासाठी करावयाचा अर्ज. | रु. १० |
| | | धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे कोणतीही चौकशी, अपील किंवा इतर कार्यवाही चालविण्यासाठी सादर केलेला मुखत्यारनामा किंवा वकालतनामा. | रु. १० |
| | | या अधिनियमाखालील प्रती मिळविण्यासाठी धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडे करावयाचा अर्ज. | रु. ५ |
| | | धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यास सादर केलेला इतर कोणताही अर्ज किंवा विनंती अर्ज. | रु. १० |

शामुना—ए-१८२३-भासंमुं-१०-२०१५–७,००० प्रती-पीसी४*